सूरज गाताडे

# वृत्र



# वृत्र

# हे पुस्तक विनामूल्य आहे

# पण फ़ुकट नाही

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे प्रकाशन कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# वृत्र

सूरज काशिनाथ गाताडे

ई साहित्य प्रतिष्ठान

वृत्र

सूरज काशिनाथ गाताडे
स्क्रिन रायटर्स सोसिएशन मेम्बरशीप नंबर - २१८३१
रा. पेठ वडगांव, ता. हातकणंगले, जिल्हा - कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६ ११२
ई-मेल आडी - surajgatade26@gmail.com
मोबाईल व व्हॉट्सऍप - 9890137797
फेसबुक - http://www.facebook.com/suraj.gatade.140
इन्स्टाग्राम - http://www.instagram.com/surajgatade26

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

**e**sahity@gmail. com

**e**Sahity Pratishthan

**e**leventh floor

**e**ternity

**e**astern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

App : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.

प्रकाशन : २० जानेवारी २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे .

प्रस्तावना -



नमस्कार, मी सूरज काशिनाथ गाताडे. 2020 च्या या नवीन वर्षात आपल्यासाठी एक नवीन मिस्ट्री-थ्रिलर घेऊन आलो आहे. ईसाहित्य वरचं हे माझं 'दहावं' पुस्तक. खरं तर दहावं पुस्तक हे 'डॉक'चं असावं असं मला वाटत होतं. त्याप्रमाणे मी लिहीतही होतो, पण काही कारणास्तव ते अर्धवटच राहील... मिस्टर वाघसाठी पण खूप मागणी होत असूनही ही कथा मिस्टर वाघची देखील नाही. कारण मिस्टर वाघने मला आतून पूर्ण हलवून टाकलं आहे... मिस्टर वाघ मला खूपच त्रास देतो. जेव्हा जेव्हा मी त्याच्यावर काम करतो, तेव्हा तेव्हा तो मला आतून खाऊन टाकतो... मानसिक दृष्ट्या मी ढवळून निघतो त्या प्रोसेसमध्ये. खरं सांगायचं तर, मी तर या पॉईंटला आलो होतो, की शेवटची कथा लिहून मिस्टर वाघला संपवावा! इतका त्याने मला झपाटला आहे... म्हणून तूर्तास मिस्टर वाघला बाजूलाच ठेवण्याचा निर्णय घेतला. पण या कथेने तर मिस्टर वाघहून जास्त त्रास दिला. असो. आशा आहे ही कथा मिस्टर वाघच्या कथांइतकीचा आपल्याला आवडेल.

मध्यंतरी मिस्टर वाघ मधून बाहेर पडण्यासाठी त्याचा काऊंटपार्ट असणारे डॉक, यांच्या कथेवर मी काम चालू केलं... वास्तविक ही कथा 2017 लाच डोक्यात पूर्ण तयार होती, पण ती अर्धी लिहून तशीच पडली होती... आणि आता 2-3 महिन्यांपूर्वी लिहायला घेतल्यावर पुन्हा एकदा एका कामामुळे ती अर्धवट राहिली...

आणि मग मधल्या काळात ही कन्सेप्ट सुचली ती लिहून काढली... (डॉक नक्कीच नाराज असतील... बाकीचे कॅरेक्टर्स मागून येऊन त्यांच्या कथा पूर्ण होऊन प्रकाशित होतात, पण त्यांची दुसरी कथा पुढेही सरकेना... असो...)

"वृत्र - दि लास्ट असाईंमेंट" ही कथा सुचली, ती पूर्ण तयार होऊनच. म्हणून हीच आधी घेऊन आलोय. आणि दुसरी आणखी गंमत म्हणजे ही पहिल अशी कथा ठरली, जिच्यासाठी मला जास्त रिसर्च करावा लागला नाही. हा... लिहिताना जे सुचलं होतं त्यात थोडा बदल नक्कीच करावा लागला, पण ही कथा माझ्यासाठी इतर कथांपेक्षा साधी वाटत असून हिला तयार व्हायला मात्र इतरांपेक्षा जास्तच वेळ लागला... सगळी कथा डोक्यात तयार असून ती कागदावर (मोबाईलवर) त्याच वेगाने काही उतरत नव्हती... कधी कधी मधेच 2-4 दिवसांचा गॅप जायचा... सगळं समोर होतं, पण लिंक्स काही लागत नव्हत्या. त्या कशा जोडायच्या ते समजत नव्हतं म्हणून खूप चिडचिड झाली... पण शेवटी कथा पूर्ण झालीच... आणि खूप मोठं ओझं डोक्यावरून उतरल्या सारखं वाटलं... कथा लिहून दोन आठवड्यांच्या वर झाला तरी अजूनही मोकळेपणा आणि तृप्ती जाणवते आहे...

मी वृत्र या नांवाच्या इतक्या प्रेमात आहे, की या नावाच्या अजून 3-4 कन्सेप्टस् माझ्याकडे तयार आहेत. पण त्या थोड्या जटील आहेत. प्रस्तुत कथा ही सर्वात शेवटची आहे... पण ही त्यांतील सर्वांत सॉफीस्टीकेटेड कथा नक्कीच आहे. म्हणून ही लिहूनच काढली... माफ करा प्रस्तावनेतच मी कन्फ्युजन क्रिएट केलंय, पण कथा वाचून आपल्याला समजेल मी ही कथा सोपी, तरी अवघड आहे असं का म्हणालो ते... आपल्याला ही कथा आवडेल याची खात्री आहे!

नवीन वर्षाचे माझ्याकडून वाचनप्रेमींना हे गिफ्ट आवडेल अशी मी आशा करतो. आपल्या अभिप्रायच्या प्रतिक्षेत... अनेक आभार... धन्यवाद...!

सूरज काशिनाथ गाताडे.

पत्ता - चिंगळे गल्ली, पेठ वडगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६ ११२
ई-मेल आडी - surajgatade26@gmail.com
मोबाईल व व्हॉट्सऍप - 9890137797
फेसबुक - http://www.facebook.com/suraj.gatade.140
इन्स्टाग्राम - http://www.instagram.com/surajgatade26

ही कथा आहे, अवस्यु व सुमेध यांच्या जीवन प्रवासाची... पण त्यांच्या संघर्षात भरडली जाते, ती विदुषी; अवस्युची लाडकी मुलगी... आणि तिच्या सोबत बरेच लोक आपला जीव गमावतात... पण एवढं होऊन त्यांच्यातील संघर्ष अंतिम बिंदू गाठतो का...? आणि त्यावेळी ते एकमेकांना कसे सामोरे जातात ते या कथेत पहायला मिळेल. सो एन्जॉय द ट्रुथ!

## सूरज काशिनाथ गाताडे यांची यापूर्वीची प्रकाशित पुस्तके (अनुक्रमे)

१) द डेथ ऑफ लिंकन्स् मदर (सायंटिफिक क्राईम थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/death_of_lincolns_mother_suraj_gatade.pdf

२) डेथ विल (मिस्टर वाघची पहिली कथा - सायंटिफिक सायकॉलॉजिकल क्राइम थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/death_will_suraj_gatade.pdf

३) दे किस्ड् बाय मिस्टेक (रोमँटिक कॉमेडी/ट्रॅजेडी)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kiss_surajgatade.pdf

४) द पॅरासाइट (सायन्स फिक्शन)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/parasite_suraj_gatade.pdf

५) फ्लेम (म्युसिकल - फॅन्टसी/सायकॉलॉजिकल/ट्रॅजेडी/लव स्टोरी या चार विविध कथा प्रकारांचा कथा संग्रह)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/flame_suraj_gatade.pdf

६) अ हेवी प्राईझ् - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ahp_suraj_gatade.pdf

७) डेडली मिटिंग्स् - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/थ्रिलर)


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/deadly_meeting_wagh_suraj_gatade.pdf

८) एजंट - X - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/थ्रिलर)



http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/agent_x_suraj_gatade.pdf


९) तू माझा सांगाती - (सायन्स फिक्शन)


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/tu_majha_saangaati_suraj_gatade.pdf


सूरज गाताडे
द पॅरासाईट

सूरज गाताडे
दि डेथ ऑफ लिंकन्स मदर

अ हेवी प्राईझ

सूरज गाताडे
दे
किस्स
बाय मिस्टेक

सूरज गाताडे
डेथ विल

सूरज गाताडे
फ्लेम

सूरज गाताडे
डेडली मीटिंग्ज

सूरज गाताडे
X

सूरज गाताडे
माझा
सांगाती

# "वृत्र - दि लास्ट असाईनमेंट!"

**(सायकॉलॉजिकल/एक्शन/मिस्ट्री/थ्रिलर, लेखक - सूरज काशिनाथ गाताडे)**

**(स्क्रीन रायटर्स् असोसिएशन मेंबरशिप नंबर - 21831)**

**प्रस्तुत वाचकांना समर्पित...**

## १. क्षेम...

**कोल्हापूर जिल्हा... कोल्हापूर शहराच्या आसपासचंच एक निमशहरी खेडं... गांव... आल्हाददायक सकाळ... आणि... ती अधिक मनमोहक करणारी, सूर्य नारायणाला आळवणारी श्रवणीय राग भैरवी आसमंतात भरली होती... संत तुकाराम यांचा अभंग... "शेवटची विनवणी"**

=============

**शेवटची विनवणी । संतजनीं परिसावी ।।**

**विसर तो न पडावा । माझा देवा तुम्हांसी ।।**

**पुढे फार बोलो काय । अवघे पायां विदित ।।**

**तुका म्हणे पडिलों पायां । करा छाया कृपेची ।।**

=============

या अभंगा इतकाच अभंग असा सूर ज्या घरातून ऐकू पडत होता, त्या घराचा मालक...

अवस्यु - वय पन्नासच्यावर. साधारण दिसणारा व्यक्ती. विशेष असं त्याच्यात काहीच नाही. गाणं अजूनही चालू आहे. तो नेहमी प्रमाणे बाकीची घरगुती कामं पण करतो, जसं की केर काढणे, भांडी धुणे, कपडे वॉशिंग मशिनला लावणे, इ.

ही कामे झाल्यावर अवस्युने नाश्ता तयार करायला घेतला.

रियाजाची खोली - विदुषी - अवस्युची मुलगी. वय २५, अत्यंत सूंदर... निरागस, पण तितकीच हुशार! ती नेहमी प्रमाणे रियाज करत होती. आतापर्यंत वातावरणात गुंजारव करणारा अभंग हा तीच गात होती...

अवस्यु किचनमध्ये काम करत असताना बाहेरून कचरा गाडीचा आवाज आला. स्वच्छतेची माहिती देणारी अनाऊन्समेंट बंद झाली. अवस्यु घरातील कचरा गोळा करून घराबाहेर घेऊन गेला. विदुषीला डिस्टर्ब होऊ नये म्हणून ड्रायव्हरने नेहमी प्रमाणे अनाऊन्समेंट बंद केली आहे हे बाहेर आलेला अवस्युने जाणले व ड्रायव्हरला स्मित करून अभिवादन केले गाडीतील मास्क लावलेला ड्रायव्हरने त्याला सल्युट केला.

"रोज तुम्ही इथं आला, की अनाऊनसमेंट बंद करता त्यामुळे गल्लीत लोकांचा किती गोंधळ उडतो माहिती आहे?" स्मित करत अवस्यु ड्रायव्हरला म्हणाला.

"माहीत आहे साहेब, पण ताईसाहेबांच्या इतक्या गोड गण्यासमोर आमचा भोंगा कशाला म्हणून बंद करतो. आणि इथं आम्हाला थोडं का होईना, पण त्यांचं गाणं लाईव्ह ऐकायला मिळतंय... ते आमचं भाग्यच! ही संधी आम्ही कशी सोडणार?" अवस्युच्या स्मितहास्याला स्मित हास्यानेच उत्तर देत कचरा गाडीचा ड्रायव्हर अवस्युला म्हणाला,

"उगाच आमच्यामुळे ताईसाहेबांच्या रियाजाला डिस्टर्ब नको म्हणून बंद करतो आणि लोकांना काय; दंगा करायला कारणच लागतं. रोजची वेळ माहीत आहे, तयारीत रहायला नको त्यांनी?"

यावर अवस्युने हसून नुसती मान डोलावली. गाडीसोबत मागे असलेला एक अठरा - एकोणवीस वर्षांचा मुलगा अवस्युकडून कचऱ्याचे डबे घ्यायला पुढे सरसावला. त्याला 'असू

दे' म्हणून अवस्यु स्वतः पुढं झाला आणि ओला, सुका कचरा त्या त्या कम्पार्टमेंटमध्ये टाकू लागला. हे करत असतानाच तो त्या मुलाशी देखील आपुलकीने बोलला...

"काय रे नवीन वाटतं? नांव काय?" अवस्युने गाडीसोबत चालत असलेल्या मुलाला विचारलं.

मुलाने तोंडावरचा मास्क काढला,

"राजन मुसळे! आजपासूनच चालू केलंय." तो म्हणाला.

"कॉलेजला जातोस की नाही?"

"हो. बीए फस्टला आहे."

"कुठलं कॉलेज?"

"आंबेडकर."

"चांगलं आहे. अभ्यासात काही लागलं तर सांग. हं? तिथं सगळे माझ्या ओळखीचे आहेत."

"होय!"

"चांगला अभ्यास करायचं आणि काही तरी मोठं होऊन दाखवायचं. समजलं?"

"होय."

"काही अडलं तर नक्की साहेबांना सांग! साहेब नक्की तुला मदत करतील!" ड्रायव्हर मागे पाहून मध्येच म्हणाला.

"काय व्हायचं काय आहे?" अवस्युने मुलाला विचारलं.

"स्पर्धा परीक्षा द्यायची आहे त्याला." मात्र ड्रायव्हरनेच उत्तर दिलं.

"पण नेमकं काय बनायचंय?" अवस्युने पुन्हा विचारलं.

"अजून ठरवलं नाही..." मुलगा संकोचून म्हणाला.

"असं करू नको बाळा. नक्की काय करायचं आहे ते ठरव आणि त्या दृष्टीने अभ्यास कर. आणि अगदी पैशाची जरी गरज पडली, तरी सांगायचं. पण नीट अभ्यास करायचा. आपल्या आई-वडिलांच्या अपेक्षा आपल्यावरच असतात. तू जबाबदार आहेस हे दिसतंय तुझ्याकडं बघून. तू मोठा होशील विश्वास आहे माझा!" अवस्युने गोड स्मित केलं.

"थँक्यू सर!" मुलाने आभार मानले.

एव्हाना अवस्यु कचरा टाकून बाजूला झाला होता. काही शेजारी देखील येऊन कचरा टाकून गेले होते. ड्रायव्हरने अवस्युला पाहून पुन्हा आदरपूर्वक मान डोलावली व गाडी पुढे नेली. पुन्हा अनाऊनसमेंट हळू आवाजात सुरू झाली आणि अवस्यु घरात परतला.

अवस्युने आत येऊन दार बंद केलं व किचनमध्ये गेला. बेसिनला हात स्वच्छ धुवून घेतले. विदुषीचा रियाज एव्हाना संपलेला होता. तीही किचनमध्ये आली. अवस्युने चहा कराहायला घेतला होता. त्याला काम करताना पाहून विदुषी मात्र रागावली. त्यावेळी अवस्यु दोघांसाठी नाश्ता सर्व्ह करून घेत होता. काढून घेतलेल्या पोह्यांवर अवस्यु चवीसाठी लिंबू होता. कोथिंबीर व खोबऱ्याचा किस टाकून त्याने ते गार्निश केले.

"कितीवेळा सांगितलंय ही कामं तुम्ही करत जाऊ नका म्हणून! मी केलं असतं ना?!" विदुषी रागाच्या स्वरात अवस्युला दरडावत म्हणाली!

"तुला रियाजाला वेळ मिळावा म्हणून करतो. आणि तू सासरी गेलीस की मलाच करावं लागणार आहे ना. की घेऊन जाणार आहेस मला तुझ्या संगं?" अवस्युने तिचा राग डायव्हर्ट व्हावा म्हणून तिची मस्करी केली.

पण यामुळे तिच्या रागाचा पारा न ओसरता त्याने आणखीनच उचांक गाठला,

"रोज तोच विषय काढणं गरजेचं आहे का?" ती ओरडली.

"हे मी पण म्हणू शकतो, रोज तेच बोलणं गरजेचं आहे का? गप्प हा नाश्ता करायचा. तुझे स्टुडंन्ट्स येतील इतक्यात." विदुषी ज्या तीव्रतेने बोलली तेव्हढ्यात शांतपणे अवस्यु विदुषीला म्हणाला.

बोलीं काही उपयोग नाही हे समजून विदुषी डायनिंग टेबलच्या खुर्चीवर बसली.. अवस्यु प्लेट्स घेऊन आला.. एक विदुषी समोर ठेवली. आणि त्याचीही प्लेट टेबलवर ठेऊन किचन ओट्याकडे जाऊन चहा मग्समध्ये घेवून परत टेबल जवळ आला. मग्स टेबलावर ठेवून अवस्यु विदुषी जवळ बसला.

"मी कितीही ठरवलं, तरी माझं तुमच्यासमोर काही चालत नाही..." विदुषी लटक्या रागाने म्हणाली.

आणि विदुषीने खायला चालू केलं. तिच्या या वाक्यावर अवस्यु खळखळून हसला.

"म्हणूनच मी तुझा बाप आहे." तो तिला म्हणाला.

आणि अवस्युही खाऊ लागला...

"मला अजिबात आवडत नाही तुम्ही ही कामं केलेली." विदुषी नाराजीने बोलली.

"आणि मलाही आवडत नाही तुला ही कामं करायला लावणं. मी काय एक ग्रंथपाल. माझ्याकडं वेळच वेळ असतो. पण तुला तुझा रियाज आहे, मग क्लास पण घ्यायचे असतात. ते पण तुझ्या विद्यार्थ्यांच्या वेळेनुसार तुला एडजस्ट करावं लागतं. क्लासेस घरातच घेत असलीस तरी तुला वेळ मिळत नाही हे माहितेय मला. रेकॉर्डिंग्स्, कार्यक्रम असतातच. मग केली मी घरातली कामं तर बिघडलं कुठं? अवस्यु तिला समजावण्याच्या सुरत म्हणाला.

"पण मी घरात असताना... मी वेळ एडजस्ट करत जाईन ना? आतापर्यंत केलंतच ना? तुम्ही प्लिज थांबवा हे सगळं." विदुषी संकोचत म्हणाली.

हे ऐकून अवस्युने विदुषीला गप्प होऊन खाण्याची खून केली. मग विदुषी पुढे काही न बोलता विदुषी खाणं संपवते. चहा देखील घेते. ती प्लेट व मग उचलू लागते तोच...

"मॅम!" बाहेरून एका मुलीचा आवाज आला...

अवस्यु हसला...

"जा. मी आवरतो इथलं." अवस्यु विदुषीला म्हणाला.

विदुषीने अवस्युकडे पाहिले. अवस्यु पुन्हा हसला. विदुषीने नाराजीने प्लेट खाली ठेवली व ती बाहेर निघून गेली. अवस्युनेही त्याचे पोहे व चहा संपवला व रिकाम्या प्लेट्स आणि मग बेसिनकडे घेऊन गेला. तो प्लेट्स धुवू लागला. विदुषीच्या रियाजाच्या खोलीतून दुसऱ्या गाण्याचा आवाज पुन्हा चालू झाला. यावेळी विदुषी सोबत विदुषीच्या विद्यार्थिनीचा देखील आवाज येऊ लागला....

----------

अवस्यु लायब्रेरीयन म्हणून करत काम असलेले कॉलेज...

अवस्यु लायब्रेरीमध्ये शेल्फवरील पुस्तकांची नोंद घेत असताना त्याचा मोबाईल वायब्रेट झाला. त्याने खिशातून मोबाईल काढून मेसेज वाचला. त्याचे डोळे चमकले. आनंदाची एक लकेर त्याच्या चेहऱ्यावर उमटलेली स्पष्ट दिसू लागली. तो लगबगीने लायब्रेरी बाहेर गेला.

आलेला मेसेज वाचल्यानंतर अवस्युने कुणाला तरी फोन लावला...

"टार्गेट इज कन्फर्म्ड्! प्रोग्राम इस फायनलाईड्स फॉर टूनाईट!" चमकणाऱ्या डोळ्यांनी अवस्यु पलीकडील व्यक्तीला म्हणाला.

एवढंच ऐकून पलिकडला फोन कट झालेला होता, पण अवस्यु अजूनही त्याच विचारात होता. त्याचवेळी एक विद्यार्थी त्याच्याजवळ आला.

"सर, बारावीचं फिसिक्स टूचं पुस्तक आहे का?" विद्यार्थ्यांने आपल्याच विचारात गढलेल्या अवस्युला विचारलं.

यामुळं अवस्युचं समाधीचक्र भंगलं...

"अं?" अवस्यु भानावर आला...

"बारावीचं फिसिक्स टूचं पुस्तक?" विद्यार्थ्यांने पुन्हा विचारलं.

"बघूया चल." अवस्यु अनवधानाने म्हणाला.

डोक्यात तोच कसला तरी विचार चालू होता... त्यातून त्यानं दिलेल्या या उत्तराने विद्यार्थी चक्रावला. अवस्यु ग्रंथालयात गेला. मुलगा कन्फ्युज एक्सप्रेशनने खांदे उडवत त्याच्या मागून प्रवेशला...

संध्याकाळची वेळ, एक एसयूव्ही घराबाहेर थांबलेली होती. विदुषी अवस्युला काही इन्स्ट्रक्शन्स देत होती. अवस्यु देखील एका लहान मुलाप्रमाणे तिचं ऐकून घेत होता. सांगून झाल्यावर मिठी मारत विदुषीने त्याला बाय केलं आणि ती गाडीत जाऊन बसली. तिचं लगेज गाडीत टाकून ड्रायव्हरने गाडी चालू केली. विदुषीने गाडीतून त्याला बाय केलं. अवस्युने देखील विदुषीला हात हलवून बाय केलं. ती गाडी निघून गेली. आणि मग अवस्यु एक्टिव्ह झाला. तो लगेच खिशातून मोबाईल काढला व कॉल केला...

"फिल्ड् इज क्लिअर. अटॅक!" अवस्युने डोळे बारीक करून गंभीरपणे ऑर्डर दिली.

आणि तो स्वतःच्या घरात प्रवेशला. अवस्युने दार बंद करून घेतलं. राजवर्धन; वय जवळपास अवस्यु इतकंच. डोक्यावर टक्कल. थोडा स्थूल खिडकीतून आत येत होता... त्याच्या हातात कसलीशी पिशवी होती. अवस्यु लगेच त्याची गन घेऊन त्याच्याकडे धावला. त्याच्या कनपट्टीवर गन रोखून अवस्युने त्याला सावकाश आत घेतलं.

"खबरदार, जर काही हुशारी केलीस तर! गप्प आत ये!" अवस्युने त्याला हुकूम केला.

राज घाबरला...

"तू... तू हे काय करतोयस?" राज म्हणाला.

"काही बोलायचं नाही! सांगतोय तसं करायचं फक्त!" अवस्युने गनची बॅरल त्याच्या डोक्यावर प्रेस केली.

राजला घेऊन अवस्यु सोफ्याजवळ आला.

"जे काही तुझ्याजवळ आहे हे टी-पॉयवर ठेव आणि शांतपणे निघून जा!" अवस्युने त्याला आदेश दिला.

"शीट! याला काय अर्थ आहे? एक तर तुझ्या मुलीपासून लपवून जोखीम घेऊन सगळा इंतजाम आम्ही करायचा आणि मजा तुम्ही एकट्यानं मारायची!" राज नाराजीने किंचाळलाच.

अवस्युने गन खाली केली आणि मोठ्याने हसला....

"फुकटची सोडवत नाय ना?" अवस्यु राजला चिडवायला म्हणाला.

राज पिशवीतून दारूची, सोड्याची बाटली काढून टी-पॉयवर ठेऊ लागला...

"फुकटची? तुझ्या डेंजर मुलीपासून लपवून हे उपद्याप करायचे हे काही कमी जोखमीचं नाही! हेच माझं काँट्रिब्युशन समज! जा ग्लास घेऊन ये!" थोड्या अधिक नाराजीने अवस्युकडे पाहत म्हणाला.

अवस्युने दाराला अडकवलेल्या पिशवीतून ग्लास काढून राजकडे फेकले. राजने ते झेलले.

"आधीच तयारी करून बसलायस की लेका" राज खुशीत येऊन म्हणाला आणि तो पेग बनवू लागला. त्याचवेळी अवस्युने हातातील वॉटर गनमधील पाणी राजच्या तोंडावर मारू लागला...

"अरे गप्प की. गप्प की!" राज झिटीने म्हणाला.

पण अवस्यु पाणी मारतच राहिला. राज पेग बनवायचं थांबला.

"मित्व्! मी जाईन बरं का?" तो वैतागणे म्हणाला. हे ऐकून अवस्युने राज पेग बनवत असलेल्या ग्लास मध्ये पुन्हा पाणी मारतो.

"दारू सोडून? जाऊ शकशील?" अवस्युने स्ट्रेट फेस ठेऊन त्याला प्रश्न केला.

राजने एकच बनलेला पेग स्वतःसाठी घेऊन स्वतःला सोफ्यावर झोकून दिलं.

"एवढं कष्ट केल्यावर नक्कीच नाही." तो म्हणाला.

"आणि मला?" अवस्युने राजला विचारलं.

"सेल्फ सर्व्हिस. केला असता मी. पण तू बस की पाणी मारत!" राज म्हणाला.

मग अवस्युने आणखी एकदा राजच्या चेहऱ्यावर पाणी मारलं व स्वतःसाठी पेग बनवू लागला. त्याला बेसावध बघून राजने अवस्युच्या हातून ती वॉटर पिस्टल हिसकावून दूर फेकून दिली. अवस्यु ग्लास हाती घेऊन मागे रेलून बसला.

"मला एक कळत नाही... जेव्हा जेव्हा असा काही तरी प्रोग्रॅम करायचा असतो तेव्हा तू पोलीस किंवा आर्मीमॅन अंगात शिरल्यासारखा का बोलतोस?" घोट घेऊन तोंडात घोळवत राजने अवस्युला विचारलं.

अवस्युने तोंडाचा ग्लास बाजूला घेतला,

"मग? विदुषी पासून लपवून हे सगळं करणं म्हणजे मिशनपेक्षा कमी आहे की काय?" त्यानं राजला विचारलं.

"हो! तेही आहेच!" म्हणत अवस्युला चिडवण्यासाठी राज हसला व म्हणाला,

"साला अव्या! कधी कधी कळतच नाही, की तू तिचा बाप आहेस की ती तुझी आज्जी!"

हे ऐकून अवस्युने त्याच्यामागे त्याने लपवलेली दुसरी वॉटर पिस्टल काढून राजच्या तोंडावर परत मारलं.

"तुझ्या तर! गप्प की!" राज वैतागाणे ओरडला.

रुमाल काढून राजने तोंड पुसले व संपलेला ग्लास तो पुन्हा भरू लागला. अवस्यु पुन्हा वॉटर पिस्टलने राजच्या ग्लासमध्ये पाणी मारू लागला. यावेळी खरंच राजचा पारा चढला

आणि तो सगळं तसंच ठेऊन आत आलेल्या खिडकीकडे चालू लागला... अवस्युने उठून त्याला पकडलं...

"एक तर तुझ्यासाठी सगळं मॅनेज करा आणि तू असं करतोस. मुलीसमोर बरा शांत आणि आदर्शवादी असतोस. कॉलेजमध्ये सुद्धा संस्कारी आणि तत्ववादी असल्यासारखा फिरत असतोस. आमच्यासमोरच काय होतं?!" राज नाराजीने म्हणाला.

अवस्यु राजला त्याच्या जाग्यावर पुन्हा घेऊन आला. आणि स्वतः राजसाठी पेग बनवू लागला...

"जे मी विदुषी समोर वागतो ते खरं आहे आणि जे तुझ्यासमोर वागतो तेही तितकंच खरं आहे. मित्र ही एकच जागा मोकळं होण्यासाठी असते नाही का?!" अवस्यु राजला म्हणाला.

अवस्युने राजला ग्लास दिला व आपला ग्लास घेऊन पूर्व जागी मागे सरकून बसला.

"जबाबदाऱ्या सांभाळता सांभाळता कधी कधी वाटतं, सगळ्या चिंता गुंडाळून टाकू आणि जरा लहान मुलांसारखं वागू. म्हणून आपलं..." अवस्यु पुढं म्हणाला.

"लहान मुलं दारू पित नाही." नाराजी अजून न सरलेल्या राजने अवस्युला टोमणा मारला.

"आता तू आज्जीबाई होऊ नको!" अवस्युचा राजवर प्रतिवार.

अवस्यु घोट घेण्यासाठी ग्लास तोंडाजवळ नेला तोच बेल वाजली. अवस्यु सोबत राज देखील दचकला.

"कोण असेल?" घाबरलेल्या राजने अवस्युला विचारलं.

"कदाचित तुझी बायको." राजला अधिकच घाबरवण्यासाठी अवस्यु म्हणाला.

"सरळ बोलायचंच नाही असं ठरवलंयस काय आज? तुझी मुलगी पण असू शकतेच की!" राज चिडून म्हणाला.

"ती नसणार. एका म्युसिकल प्रोग्रॅमसाठी कलकत्त्याला गेलीये परवा रात्री येईल. थांब मी बघतो." असं म्हणत अवस्युने मुख्य दार उघडलं. आणि तो जागीच गोठला...!

समोर विदुषीच उभी होती. बाहेर अंधार पडत आला होता...

"काळ्या जीभंचा कुठला..." अवस्यु तोंडातल्या तोंडात पुटपुटला.

पण त्याच्या बोलण्याची तीव्रता इतकी होती, की मनातल्या मनात न बोलता त्याचे ओठ थरथरलेच आणि हे विदुषीला पुसटसं ऐकू आलं...

"अं?" पण काही समजलं नसल्याने तिनं पुन्हा अवस्युला विचारलं.

"विदू, बाळा तू..." गोंधळलेलं खोटं हसू घेऊन अवस्यु कसाबसा उद्गारला.

"ऑर्गनाईझर्सनी पाठवलेलं फ्लाईटचं तिकिट घ्यायचं राहिलं. तुम्ही पॅकिंग केलं की कायम असा गोंधळ करता." विदुषीने परत येण्याचं कारण सांगितलं.

"एक्साईटमेंटमध्ये राहील असेल?" खोटं हसू चेहऱ्यावर घेऊन अवस्यु पुन्हा पुटपुटला. पण पुन्हा तीच इंटेनसिटी. म्हणून परत विदुषीला ऐकू गेलंच! आणि यावेळी जरा स्पष्टच!

"कसली एक्साईटमेंट?" विदुषीनं विचारलं.

"तुझ्या शोची!" अवस्यु गोंधळून हसत म्हणाला.

"हा..." अवस्यु खरं बोलतोय असं वाटून विदुषी उद्गारली...

"बरं थांब इथंच. मी आणून देतो." अवस्यु गडबडीने विदुषीला म्हणाला.

"असू द्या मीच घेते." विदुषी घरात पाऊल टाकत म्हणाली.

"नको थांब बाळा!" अवस्युने तिला आत येण्यापासून घाईने रोखलं.

"का?" विदुषीने दचकून विचारलं.

"तू घरात आलीस, की मग पुन्हा जायची तुझी इच्छा व्हायची नाही." आवस्यु बळेच तिला समजावण्याच्या सुरात म्हणाला.

"माझ्यासोबत असं काही होत नाही. आणते मीच." अवस्युला बाजूला करून आत शिरत विदुषी म्हणाली.

अवस्यु डोळे घट्ट मिटून दारातच उभारतो. काय करावं त्याला समजत नव्हतं. आणि अचानक विदुषीची मोठी हाक त्याला ऐकू आली...

"बाबा!!!"

अवस्यु अगदीच गलितगात्र झाला.. पण काही पर्याय नाही हे लक्षात घेऊन आत गेलाच.

राज अपराध्यासारखा विदुषीसमोर उभा होता. लपवता येईल तेवढं आपल्या मागे लपवून घेत. याचा काही उपयोग नाही हे तो जाणून होता, तरी हा केविलवाणा धाडसी प्रयत्न त्याने केला होता. अवस्यु येऊन त्याच्या जोडीला खाली मान खालून उभारला. खोडकर मुलं पकडली गेल्यावर जशी आईसमोर उभारतात अगदी तसे दोघं विदुषी समोर उभारले होते. विदुषीच्या रागाला सीमा उरलेली नव्हती. तिने सगळ्यांत आधी पर्समधील फोन काढून एक कॉल केला,

"नमस्कार, मी विदुषी बोलते. माफ करा मी या प्रोग्रामला नाही येऊ शकत." ती पलीकडील व्यक्तीला सांगते.

अवस्यु काही बोलण्याचा प्रयत्न केला, पण विदुषीने हात उंचावून त्याला गप्प बसण्यास सांगितलं. तो तक्षणी गप्प झाला. शब्द देखील त्याच्या तोंडून बाहेर फुटला नाही.

"काळजी करू नका. मी तिकिटाचे पैसे व मानधन रिपे करेन. मला माहित आहे हे खूप अनप्रोफेशनल आहे, पण इथं एक अधिक महत्त्वाचा प्रोग्रॅम मला करायचाय. होप तुम्ही समजून घ्याल. मी माझी रिप्लेसमेंट पाठवते हवं तर. धन्यवाद!" असं म्हणत तिने अवस्युकडे कटाक्ष टाकला.

विदुषीने फोन कट केला आणि ती रागीट चेहऱ्याने अवस्युकडे वळली.

"प्रोग्रॅम कॅन्सल करण्याची काय गरज होती?" अवस्यु गिल्ट घेऊन म्हणाला.

"हो म्हणजे तुम्ही हे करायला मोकळे नाही का? तरीच म्हंटलं माझा प्रोग्रॅम किंवा रेकॉर्डिंग असलं की तुम्ही इतके खुश का होता? सोबत चला म्हंटलं तर यायचं मात्र होत नाही." विदुषी रागाने म्हणाली.

"तसं नाही बाळा तुझा गैरसमज होतोय..." अवस्यु तिला समजावण्याचा प्रयत्न करू लागला...

पण याचा आता काही उपयोग नव्हता!

"अजून काही स्पष्ट व्हायचं बाकी आहे का गैरसमज व्हायला?" विदुषी वैतागणे म्हणाली.

आणि बोलत असतानाच तिची नजर समोरील डब्यावर पडली. तिने तो घेऊन उघडून पाहिला आणि जास्तच रागावली...!

"हे पण आहे का? छान हं बाबा! छान!" विदुषी अधिकच संतापली.

"हे... हे राजाचं आहे. होय ना राजा?! माझ्यासाठी नाही काही..." अवस्यु स्वतःला वाचवण्याचा नाहक प्रयत्न करत बोलला.

तिथं राजाला मात्र हो म्हणावं की नाही म्हणावं सुचत नव्हतं...

"कोणाला मूर्ख बनवताय बाबा? कितीदा सांगितलं माझ्या घरात मला नॉनव्हेज चालणार नाही म्हणून!" विदुषी अवस्युला म्हणाली.

आता मात्र अवस्युला हे सहन झालं नाही,

"बास! आता लय झालं. जे काही नियम लावायचे ते तुझ्या घरी. सासू-सासऱ्यांना आणि तुझ्या नवऱ्याला! मला नाही. हे माझं घर आहे! सारखं आपलं हे करू नको ते करू नको!" तो रागावून म्हणाला!

"विषय कुठलाही असला तरी तुम्हाला माझं लग्नच कसं सुचतं ओ? तुम्हाला काय वाटतं, की नेहमी सारखं तुम्ही माझ्या लग्नाचा विषय काढला, की मी विषयापासून भरकटेन?" असं म्हणत विदुषीने अवस्युचा ब्लेमगेम त्याच्यावरच उलटवला. काही तरी विचार करून सेकंदातच ती पुन्हा उद्गारली,

"थांबा!"

आणि ती टेबलवरचं सगळं गोळा करून बाहेर घेऊन गेली. ती बाहेर गेल्याचं पाहून राजने अवस्युची कॉलर पडकली.

"अरे थांबव तिला. सकाळी पैसे द्यायला तू विसरलास म्हणून आज बिल मी दिलंय. आणि तिनं हे टाकून दिलं, तर तू काही मला पैसे द्यायचा नाहीस!" राज अवस्युला अधीरतेने त्याच्याही नकळत कॉलर वरची पकड घट्ट करत बोलला.

"हिंमत असेल तर जा! तू अडव! मी कधीच धारातीर्थी पडलोय!" अवसयुने शांतपणे राजला उत्तर दिलं.

यांच्या आता बोलून काही उपयोग नाही हे लक्षात येऊन राज विदुषी मागे बाहेर पळला.

"आता जे जे होईल, ते ते पहावे" या उक्तीला जगण्याची मनाची घट्ट तयारी करून अवस्युने स्वतःला सोफ्यावर झोकून दिलं.

घराबाहेर विदुषीने सगळं कचरापेटीत टाकून दिलं. राज तेथे पोहोचला.. ते पाहून तो जागीच थांबला.

"अगं डबा तरी सोडायचास!" राज ओरडला.

पण विदुषीने कलश दिलं नाही. विदुषी तिला न्यायला आलेल्या गाडीकडे गेली.

"माझा शकत न्यायचा डबा होता!" राज पुन्हा ओरडला.

पण विदुषीने काहीच प्रतिक्रिया दिली नाही. की तिने मागे त्याच्याकडे पाहिलं देखील नाही...

मग होप्स सोडून राज कचरपेटीकडं लक्ष देऊन तिथंच उभारला...

विदुषी गाडीतकडे आलेली पाहीन ड्रायव्हर खाली उतरला. त्याने विदुषीसाठी दार उघडले.

"माफ करा दादा, काही कारणामुळे मी येऊ शकत नाही. ऑर्गनाईझर्सशी बोलले आहे मी प्लिज मला माझं लगेज देत का?" विदुषीने त्याला विचारले.

"हो." ड्रायव्हर उद्गारला व दार बंद करून त्याने डिक्की उघडली.

त्याने डिक्कीतील विदुषीची बॅग तिला दिली.

"थँक्स! आणि झालेल्या त्रासाबद्दल सॉरी!" विदुषी स्माईल करून ड्रायव्हरला म्हणाली.

"नाय काय नाय. असू दे! येतो." ड्रायव्हर हसून म्हणाला.

विदुषीने पुन्हा स्माईल केले. ड्रायव्हर गाडीत बसून निघून गेला. विदुषी घराकडे वळली. राज अजून कचरपेटीकडे पाहत उभा होता.

"काका, मला वाटतं तुम्ही या आता. काकी वाट बघत असतील! त्यांनाही तुमच्याशी काही बोलायचं असेल नाही?" विदुषी राजला म्हणाली.

आणि राजच्या बोलण्याची काही वाट न पाहता ती आत निघून गेली. राज कचरापेटीकडे पाहतच उभा राहिला.. मन चलबिचल, की 'बाटली त्यातून काढू की नको? डबा त्यातच राहू देऊ का?' शेवटी 'राहूच दे' म्हणून हात झटकून निघून गेला...

विदुषी आत आली. अवस्यु सावरून बसला. विदुषी वाटेतच बॅग सोडून त्याच्या समोर येऊन उभा राहिली.

"साळसूदपणाचं नाटक करण्याची गरज नाही. तुम्ही दार उघडल्यावर मला वास आलाच. म्हणून मीच मुदाम आत आले. बरंच झालं तुम्ही तिकीट द्यायला विसरलात. माणूस आपणच खणलेल्या खड्यात पडतो म्हणतात ते हेच!" विदुषी त्याला रागावत म्हणाली.

"आता हे जरा जादा होतंय बाळा. एवढं काही झालेलं नाही..." अवस्युने आपला विरोध दर्शवला.

"अजूनही सॉरी म्हणायचं सोडून तुम्ही हे बोलताय बाबा?" विदुषी अविश्वासाने म्हणाली.

"त्च्! सॉरी!" अवस्युने शरणागती पत्करली.

"मी कितीदा सांगितलंय बाबा? तुम्ही दारू पिलेलं, नॉनव्हेज केलेलं मला अजिबात आवडत नाही!" विदुषी असहाय्यतेने उद्गारली.

"मिट इज अ गुड सोर्स ऑफ प्रोटीन!" चिडलेल्या विदुषीला शांत करण्यासाठी अवस्यु चेष्टेच्या सुरत म्हणाला.

"प्रोटीनसाठी वेगळे सोर्स पण आहेत. त्यासाठी मांसाहार केलाच पाहिजे असं नाही! आणि दारू? त्यातून कोणतं न्यूट्रिशन मिळतं तुम्हाला?" विदुषी वैतागणे म्हणाली.

"सोडा! अन्न पचायला बरा असतो!" अवस्युने पुन्हा मस्करीचा राग आळवला.

"बाबा! बी सिरीयस!" विदुषी अक्षरशः ओरडलीच!

आता मात्र प्रकरण निस्तरण्यासाठी अवस्यु गंभीर झाला,

"सॉरी! पण तू इतका इशू का करत आहेस हेच समजत नाही!" तो विदुषीला म्हणाला.

पण यामुळे प्रकरण हाती येण्या ऐवजी ते अजूनच चिघळण्याची वेळ आली,

"म्हणजे? एक तर नको सांगितलेलं असताना तुमचं हे खाणं-पिणं चालू आहे. त्यावर तुम्ही खोटंही बोलता!" अतीव चिडलेली विदुषीने स्वतःला सावरलं व पुढं बोलली,

"शेवटचं सांगते बाबा! दारू, मांसाहार बंद म्हणजे बंद!" ती अवस्युला दरडावलं!

"हो गं माझी वेगनबाई!" अवस्युहात जोडून तिला म्हणाला.

हे ऐकून आता मात्र विदुषी हसू अनावर झालं. अवस्यु देखील हसायला लागला..

थोड्यावेळाने...

"वेळ असेल तर तू जाऊ शकतेस अजूनही!" अवस्यु विदुषीला म्हणाला.

विदुषी हसायची बंद झाली व बॅग ओढत तिच्या खोलीत निघून गेली. आपण पुन्हा माती खाल्ली हे लक्षात येऊन अवस्युने कपाळावर हात मारून घेतला.

दुसऱ्या दिवशी, विदुषीचं नेहमी प्रमाणं गाणं... अवस्यु किचनध्ये काम करत होता. आज जरा लवकरच रियाज सोवून विदुषी किचन मध्ये आली. डायनिंग टेबलच्या खुर्चीवर बसली. अवस्यु नाश्ता प्लेट्समध्ये काढून चहा व नाश्ता घेऊन तिच्याजवळ आला. प्लेट्स ठेऊन खुर्चीवर बसला.

"बाबा, तुम्ही कव्हरअप करायला तरी ही कामं करत नाही ना?" घास घेत विदुषीने अवस्युला विचारलं.

"तुझ्यावर प्रेम आहे म्हणून करतो." अवसयुने तिची शंका निरसन्याचा ओरायत्न केला.

"मी आजपासून मेड अपॉईंट करतीए. कारण माझं पण तुमच्यावर प्रेम आहे." अवस्युच्या उत्तराचा काही ओरिमान न होऊन कोरड्या चेकऱ्याने विदुषीने आपला निर्णय सूनावला.

"माहीत आहे बाळा, पण..." अवस्युने तिला समजण्याचा प्रयत्न केला.

"नो अर्गुमेंट्स! माझं ठरलंय!" विदुषीने चर्चेचा अंत केला.

आणि तिने पंढ काही न बोलता शांतपणे नाश्ता संपवला. पाणी पिऊन चहा घेतला व बाहेर जाऊ लागली. दारापासून मागे अवस्युकडे पाहलं.

"लव यु बाबा..." लटका राग बाजूला सारून स्मित करत विदुषी अवस्युला म्हणाली.

"लव यु बाळा." अवस्यु स्मित करत म्हणाला.

चेहऱ्यावरील टेन्शनची लकेर नाहीशी झाली. तो मनमोकळं हसला.

"खाऊन घ्या." विदुषी त्याला म्हणाली.

"हो!"

तो खाऊ लागला. विदुषी गेली. काहीवेळाने तिच्या व तिच्या विद्यार्थिनींचं गाणं चालू झालं. अवस्युचं खाणं झाल्यावर तो प्लेट्स धुवू लागला...

अवस्यु टूव्हीलरवरून कॉलेज पार्कींग एरियाकडे आला. गाडी पार्क करत असताना एक विद्यार्थी त्याच्या जवळ आला, जो बऱ्याच वेळेपासून त्याचीवात पहात तेथे उभा होता.

"सर..." अवस्युचे लक्ष वेधून घेण्यासाठी तो विद्यार्थी संकोचून एवढंच उद्गारला.

"बोल की." गाडी स्टँडला लावत अवस्युने त्या विद्यार्थ्यांला बोलण्याची परवानगी दिली.

"एक काम होतं..." विद्यार्थी पुन्हा संकोचत उद्गारला.

"म्हणूनच बोल म्हंटलं. काय सांग." अवस्यु त्याच्याकडे वळला.

"तुम्ही जरा प्रिन्सिपल सरांशी बोलाल... फी द्यायला जरा उशीर होणार आहे. पण त्यांनी डेडलाईन दिलीय. काही ऐकून घ्यायला तयार नाहीत..." विद्यार्थ्यांने अवस्युला गळ घातली.

"चल." अवस्यु त्याला म्हणाला.

आणि तो कॉलेज कडे चालू लागला. विद्यार्थी त्याच्या मागे घाईने धावला...

अवस्यु त्या विद्यार्थ्यांला घेऊन प्रिन्सिपलच्या केबिनकडे आला.

"आत येऊ सर?" दारावर नॉक करत अवसयुने विचारलं.

"या!" आतून प्रिन्सिपलचा आवाज.

अवस्यु विद्यार्थ्यांला सोबत येण्याची मानेने खूण करून आत गेला. विद्यार्थीने त्याला फॉलो केले.

प्रिन्सिपलच्या डेक्स जवळ येऊन दोघे उभारले. विद्यार्थी संकोचून थोडा मागे... खाली मान घालून...

"बोला." प्रिन्सिपलने फाईल मधून मान वर न काढताच अवस्युला बोलण्यास संमती दिली.

"याची फी भरायची होती." म्हणत अवस्युने वॉलेटमधून पैसे काढून ते मोजून टेबलवर ठेवले.

प्रिन्सिपलने वर पाहिले. त्यांची विद्यार्थ्यांवर पडली,

"तू जा." ते विद्यार्थ्यांला म्हणाले.

विद्यार्थ्यांने अवस्युकडे पाहिले. अवस्युने त्याला जाण्यास खूण केली व त्याला आसवस्त केले. विद्यार्थी हे समजून निघून गेला.

"किती जणांच्या फी भरणार आहात? एवढा तुमचा पगार तरी आहे का?" प्रिन्सिपलनी अवस्युला विचारलं.

"पोरं शहाणी आहेत. परत करतात." अवस्यु स्मित करत म्हणाला,

"शिक्षण संस्था चालवत असताना पैशांसाठी विद्यार्थ्यांना आपणच शिक्षणापासून वंचीत ठेवत असू तर ते पाप नाही का? शिकवण्यासाठीच तर आपण या संस्था चालवतो." अवस्युने आपले म्हणणे पूर्ण केले.

"अहो हे आपल्याला कळतं. संचालकांना पैशांशीच मतलब असतो त्याला आपण काय करणार?" प्रिन्सिपलने पुन्हा विरोध दर्शविला.

"पण यामुळे या मुलांना देखील पैशांशिवाय कोणाची कामं करू नयेत अशी सवय लागू नये म्हणून जमेल तेवढं करतो. भ्रष्टाचाराची बीजं अशीच रुजली जातात." अवस्युने अर्गुमेंट केली.

"तुम्ही फी गोळा करण्याला भ्रष्टाचार म्हणता?" प्रिन्सिपल चकित झाले.

"नाही! पण पैशांपेक्षा शिक्षण वर हे नक्कीच मानतो. आणि फी भरायला पैसे नाहीत म्हणून कोणी शिक्षणापासून दूर राहू नये इतकंच वाटतं." अवस्युने मत स्पष्ट केले.

"या." प्रिन्सिपलने अवस्युचा निरोप घेतला.

बहुदा अजून त्यांना अवस्युचे मत पटले नसावे... ते आपल्या कामाला लागले. अवस्यु लायब्रेरीकडे निघाला...

कालच अवस्युचा मित्र राज अवस्युची वाट बघत लायब्रेरी बाहेरच उभा होता. अवस्यु त्याच्याजवळ पोहोचला.

"काय काय हवाल?" राजने अवस्युला विचारलं.

"मस्त. तुझ्याकडं?" अवस्यु हसत म्हणाला.

"लय हाल झाले. विदुषीने रात्री फोन करून माझ्या बायकोला सगळं सांगितलं. मग आमची पार्वती दुर्गा व्हायची थांबते होय?" राज कळवळून म्हणाला.

अवस्युच्या हास्याचा स्फोट झाला. त्यामुळे राज चिडला,

"हसतोय काय लेका! तू कसं जमवलंस ते सांग!" राज अवस्युला म्हणाला.

अवस्युने त्याच्या गळ्यात हात टाकला व त्याला जवळ कवटाळून घेतले.

"युद्ध हरत असताना शरणागती पत्करणं शहणपणाचं. म्हणजे पुढची रणनीती आखायला वेळ मिळतो. लगेच आपली चूक कबूल करावी. भांडणाचं मूळच संपतं." अवस्युने आपली स्ट्रॅटेजी सांगितली.

"म्हणजे पुन्हा आपला प्रोग्रॅम फायनल?" राज आनंदाने किंचाळलाच.

पण आजूबाजूचं भान ठेवत त्याने स्वतःला सावरलं. पण अवस्यु मात्र गंभीर झाला,

"आता नाही. आता खरंच नाही! माझ्या काळजीमुळं विदुषीनं तिची स्वप्न त्यागावीत असं मला नाही वाटत. बघितलंस ना? काल शो सोडून ती घरीच थांबली!" मूड बदलत तो पुढं म्हणाला, "वहिनींबरोबर भांडत बसला असशील ना?"

"हो तुला कसं कळलं?" राजने आश्चर्याने विचारलं.

"टन्नू दिसतोय कपाळावर!" अवस्यु हसत म्हणाला.

राजने अवस्युकडून स्वतःला सोडवून घेतलं व फोन काढून सेल्फी कॅमेऱ्यात स्वतःला पाहू लागला,

"होय की रे! सकाळपासून लक्षातच नाही आलं. तरी म्हंटलं दुखतंय का?"

"बरोबर आहे. आरशाचा तुझा कधी संबंधच येत नाही." म्हणत राजला चिडवण्यासाठी अवस्यु पुन्हा खुदकला.

राजने अवस्युकडे रागाने पाहिलं. अवस्यु हसायचं थांबला. राजने नजर बाजूला घेतली. एक टोपी घातलेला मुलगा त्याला दिसला. राजने त्याला हाक मारली,

"ए इकडं ये रे!"

मुलगा त्यांच्याजवळ आला.

"सर... मी मी काही नाही केलं सर." गैरसमज होऊन तो राजला म्हणाला.

"माहीत आहे. तुझी टोपी दे." राज कड्या आवाजात त्या मुलाला म्हणाला.

काही न बोलता मग मुलाने टोपी काढून राजला दिली.

"संध्याकाळी जाताना घेऊन जा. निघ. सरळ वर्गात जायचं. इकडं तिकडं फिरताना दिसल्यास तर बघ!" टोपी घालत राज मुलाला म्हणाला.

मुलगा नुसतीच मान हलवून इकडे तिकडे न बघता त्याच्या वर्गाकडे निघून गेला. राज अवस्युकडे वळला,

"बरं चल जातो. एक्स्ट्रा पिरियड आहे."

आणि तोही त्याच्या वर्गाकडे निघून गेला.

## २. यज्ञ...

याचवेळी कोल्हापूर शहरात पासून ३३.६ किलोमीटरवर... शाहूवाडी तालुक्यातील बांबवडे गांवात...

सुमेध दहा वर्षांपूर्वी सोडलेलं आपलं घर न्याहाळत डोळ्यांत आसवं घेऊन उभा होता... त्या घराच्या भिंतीना स्पर्श करून घडून गेल्या घटनांनाच जणू तो स्पर्श करू पाहत होता... पण हे शक्य नाही हेही तो जाणून होता... बराच वेळ तिथे तसा काढून कडू-गोड आठवणी पुन्हा मनात भरून तो तेथून हलला...

दुसऱ्या गल्लीत, नरेंद्र/नंदू उपाशे; एक वयस्कर, पण अंगाने पुष्ट माणूस त्याच्या गॅरेजमध्ये बाईक दुरुस्त करत बसलेला होता. एक माणूस त्याच्या समोर येऊन उभा राहिला. नंदूने त्याच्याकडे पाहिलं. आणि पाहतच राहिला... काही वेळ आठवून मग नंदूचा चेहरा आनंदाने भरला...

"ज... जग्या..." नंदू आनंदाने पुटपुटला.

नंदू गुडघ्यावर हात ठेवून उठून उभारू लागला. तोच त्या माणसाने त्याला हात देऊन उभारण्यास मदत केली आणि त्याला मिठीत घेतलं.

"होय काका. मी! पण आत्ता माझं नांव सुमेध आहे." तो माणूस म्हणाला.

जगदीश/सुमेध - वय : २५, वेल ड्रेस्ड्. चेहरा व डोळ्यांत भाव अगदीच निरागस. काकाला भेटून त्याच्या डोळ्यांत पाणी होतं. पण तरी ओठांवर स्मित. डोळे मिटून घेतल्याने डोळ्यांत

साठलेलं पाणी हनुवटीवर एकत्र येऊन ओघळलं. नंदूही हसू चेहऱ्यावर घेऊन घट्ट डोळे मिटून त्या माणसाला कडकडून बिलगला.

"कुठं होतास बाळा. दहा वर्षं गेली..." भाव विभार झालेल्या नंदूने सुमेधला विचारलं.

"कामात होतो..." इतकंच त्याला पुरेसं वाटणारं सुमेधने उत्तर दिलं.

"मग आता झालं ना?" बाजूला होत नंदूने विचारलं.

"नाही! आता खरी सुरवात आहे!" सुमेध गंभीरपणे म्हणाला.

"बरं आत्ता आलायस, तर चल; आत चल." नंदू सुमेधला त्याच्या झोपडी वजा घरात नेत म्हणाला.

नंदू आत आला. मागून सुमेध. सगळं नव्यानं पहात असल्यासारखा...

"अगं ऐकलं का? बघ कोण आलंय?" आनंदाने ओरडत नंदूने आपल्या बायकोला हाक दिली.

त्याची बायको बाहेर आली. नंदूच्या जवळपासच वयोवृद्ध.

"कोणाय?" तिने पृच्छा केली.

त्याचवेळी तिची नजर सुमेधवर पडली.

"आपला जगदीश आलाय साहेब होऊन." नंदू तिला अभिमानाने म्हणाला!

"जगदीश!" तिचा चेहराही आनंदाने भरला.

सुमेध तिच्यापाशी आला. तिने त्याच्या चेहऱ्यावरून हात फिरवला,

"आलास बाळा... कुठं गेलेलास रे..." तिनं गहिवरून विचारलं.

"काही शिकायला गेलो होतो..." आताही त्याने त्याला पुरेसं वाटणारंच उत्तर त्याच्या काकीलाही दिलं.

"आता नाही ना जाणार...?" काकीनं पुन्हा प्रश्न केला.

"फक्त शेवटचं काम काकी! याच्या तयारीतच इतकी वर्षं काढली. हे काम झालं, की मी मुक्त होईन. आणि परत येईन तुमच्या जवळ. कायमचा! आत्ता आशीर्वादासाठी आलोय!" चेहऱ्यावर आलेला मृदू भाव क्षणात मागे सारत गंभीरपणे सुमेध म्हणाला.

काकीला काही समजलं नाही. पण समजून घेणं कदाचित तिला त्यावेळी महत्त्वाचं देखील वाटलं नसावं.

"बस जेव आता." ती त्याला एवढंच म्हणाली.

आणि सुमेधच्या डोळ्यांत अचानक पाणी तरारलं... आपल्या लोकांना भेटल्यावर आणि या आपुलकीच्या बोलण्याने इतक्या वर्षांचा अविर्भाव कुठे तरी गळून पडला.

"हो." पाणावलेल्या डोळ्यांनी सुमेध एवढंच उद्गारला.

"जा बस." काकीनं आपल्या लाडक्या पुतण्याने डोळे पुसले आणि पदराने आपले डोळे कोरडे कटर ती आत निघून गेली.

एव्हाना नंदू कॉटवर बसला होता.

"ये इकडं." त्यानं सुमेधला जवळ बोलावलं.

सुमेध मागे नंदूकडे गेला. नंदू त्याला जवळ बसवला.

"काका..." तो संकोचून बोलला.

"बोल की." नंदू म्हणाला.

"एक काम होतं." पुन्हा सुमेधचा संकोच.

"हा."

सुमेधने मोबाईल काढून एक फोटो नंदूला दाखवला,

"हा हार चोरीला गेलाय अशी पोलिसात तक्रार करायची आहे."

नंदूने मोबाईल हातात घेऊन फोटो नीट पाहला,

"तुझा आहे?" त्याने सुमेधला विचारलं.

"होय!"

"खरंच चोरीला गेलाय?" नंदूने पुन्हा विचारलं.

"नाही." सुमेधने स्पष्ट केलं.

"मग?" सुमेधच्या उत्तराने नंदू गोंधळला होता.

"पप्पांसाठी!"

सुमेधचं एवढंसं उत्तर नंदूसाठी पुरेसं होतं. पण हे ऐकून नंदूचे डोळे टचकन पाणावले.

"पण कसं?" नंदूने प्रश्न केला.

"ते माझ्यावर सोडा! विश्वास आहे ना माझ्यावर?" सुमेधने सांगणं टाळलं.

याचं कारण नंदूवरचा अविश्वास नव्हता, तर त्याचा प्लॅन जितक्या कमी लोकांना माहीत असेल तेवढे त्याच्यासाठी श्रेयस्कर होतं शिवाय यामुळे नंदू आणि त्याचं कुटुंब सुरक्षित राहणार होतं...

"होय रे बाळा..." म्हणत सुमेधच्या पाठीवर हात ठेवून नंदूने त्याच्याविषयी आपला विश्वास दर्शवला.

मग सुमेधने त्या हाराचे बिल काढून त्याला दिले,

"हे बिल. पोलिसांनी बघायला मागितलं तर म्हणून. तुमच्याकडं एवढा महाग हार आला कसा विचारलं, तर पुतण्यानं भेट म्हणून दिलाय म्हणून सांगा. बिल माझ्या जुन्या नांवानं आहे. त्यामुळं मलाही काही प्रॉब्लेम येणार नाही!"

"बरं." बिल घेत नंदू म्हणाला.

"यात या हाराचा फोटो आहे. हाराचा फोटो मागितला, तर हे त्यांना द्या. यात फोटो आहे म्हणून सांगा." सुमेध म्हणाला.

आणि खिशातून मेमरी कार्ड असलेलं कार्ड रीडर काढून त्याने ते कार्ड रीडर मोबाईलला ओटीजीने अटॅच करून हाराचा फोटो सुमेधने नंदूला दाखवला व कार्ड रीडर नंदूच्या हाती दिलं.

"बरं! आणि काय?" नंदूने कार्ड रीडर घेत विचारलं.

"नाही. एवढंच करा." सुमेध त्याला म्हणाला.

मग खिशातून पैशांचे बंडल काढून त्यानं नंदूच्या हातात ठेवलं.

"आणि हे काही पैसे ठेवा. नाही म्हणू नका." सुमेधने नंदूला इनसिस्ट केलं.

नंदूने मग ते पैसे घेतले व म्हणाला,

"बरं. थांब जेवण झालंय का बघतो."

सुमेधने गंभीरपणे मान डोलावली...

आणि दोघे सोबत जेवू लागले...

"भार्गव, अथर्व कुठं आहेत?" जेवता जेवता सुमेधने आपल्या चुलत भावांची चौकशी केली,

"आपल्यापासून कुठंच दिसले नाहीत..."

या प्रश्नावर नंदूने दुर्दैवी स्मित केलं,

"आपापल्या आयुष्यात व्यस्त आहेत!" तो म्हणाला.

पुढं काय बोलावे हे न समजल्याने मग सुमेधने आपले जेवण संपले आणि आपल्या काका-काकूंच्या निरोप घेतला.

"लवकर ये!" काकी पुन्हा गहिवरून म्हणाली.

सुमेधने देखील गहिवरून होकारार्थी मान डोलावली. काकीनं त्याच्या चेहऱ्यावरून प्रेमाने हात फिरवला. आणि सुमेध तेथून बाहेर पडला...

अवस्युच्या घरी, संध्याकाळी...

अवस्युने त्याची टू-व्हीलर पार्क करून घराची बेल वाजवली. विदुषीने नवीन अपॉइंट केलेल्या मेडने दरवाजा उघडला.

"तुम्ही?" गोंधळलेल्या अवस्युने तिला विचारलं.

"मी नीलिमा. मी आज पासून इथं काम करतीये." नीलिमाने उत्तर दिलं.

"ओह!" अवस्यु आत आला,

"विदुषी कुठाय?" त्याने नीलिमाला विचारलं.

"मॅडम त्यांच्या अकॅडमीत गेल्यात." नीलिमा उत्तरली.

"हो. त्यांचा आज कसला कार्यक्रम होता. बरोबर..." अवस्यु आठवून बोलला.

"साहेब तुम्ही आवरून घ्या मी चहा करते. काही खायला करू का?" नीलिमा अवस्युला म्हणाली.

"हो. आलोच. थँक्स."

अवस्यु त्याच्या खोलीत गेला. नीलिमा किचनमध्ये तिच्या कामाला लागली. काही वेळाने पुन्हा बेल वाजली. नीलिमाने कढईचा व चहाचा गॅस कमी करून दार उघडले. विदुषी आत आली.

"बाबा आले?" विदुषीने नीलिमाला विचारलं.

"होय. खोलीत आहेत." नीलिमाने विदुषीला सांगितलं.

"मी आलेच." विदुषी तिला म्हणाली.

"तुमच्यासाठी चहा वाढवू?" नीलिमाने विचारलं.

"हा प्लिज." स्माईल करून विदुषी तिला म्हणाली.

आणि तीही तिच्या खोलीत गेली. नीलिमाही किचनमध्ये गेली.

अवस्यु येऊन सोफ्यावर विसावला. समोर पडलेलं पुस्तक घेऊन डोळ्यांवर चष्मा चढवून वाचू लागला. काही वेळात नीलिमा त्याच्यासाठी चहा घेऊन आली.

"साहेब, चहा."

"विदुषी आलीये का?" कप घेत अवसयुने नीलिमाला विचारलं.

"होय." नीलिमाने उत्तर दिलं.

"तिचा चहा पण इथंच घेऊन ये. संगच घेतो." अवस्यु नीलिमाला म्हणाला.

"होय साहेब."

नीलिमा आत निघून गेली. अवस्यु कप टी-पॉयवर ठेऊन पुन्हा वाचू लागला. इतक्यात विदुषी देखील बाहेर आली.

"गुड इविनिंग!" तिने अवस्युला ग्रीट केलं.

"गुड इविनिंग!" वर तिच्याकडे बघत स्मित करून अवस्यु म्हणाला.

विदुषी त्याच्यासमोर सोफ्यावर बसली.

"शेवटी तू तुला हवं तेच केलंस!" अवस्यु विदुषीला म्हणाला.

"यामुळं आपल्याला एकमेकांना जास्त वेळ देता येईल." अवस्यु नाराज होण्याआधीच हे म्हणून विदुषीने त्याची नाराजी दूर केली.

"मी म्हातारा रिकामाच तर असतो. तूच व्याप वाढवून ठेवलेस." अवस्यु चष्मा काढत म्हणाला.

"मला तर इथं कोणी म्हातारा दिसत नाहीये. माझे बाबा अजूनही खूप फिट आहेत." विदुषी लडिवाळपणे म्हणाली.

"कोणी तरी मला गूळ लावतंय बहुतेक?" अवस्यु तिला चिडवण्यासाठी बळेच म्हणाला.

"बाबा..." विदुषी खोटेच कळवळून म्हणाली.

विदुषीच्या या प्रतिक्रियेवर अवस्यु हसला.

"बोल, मग काय प्लॅन करूया रात्री? फिल्म, नाटक, गाण्याचा कार्यक्रम, की वाचनाचा? त्याने विचारले.

"वाचन! मी लहान असताना आपण एकत्र किती वाचायचो. तुम्हीही किती छान-छान पुस्तकं मला वाचून दाखवायचात." विदुषी खुश होत म्हणाली.

"डन! चहा, पुस्तक आणि आपण! भारी मैफिल जमेल आज! एक पुस्तक वाचून दाखवतो. भारी आहे. आवडेल तुला." अवस्युने रात्रीचा प्रोग्रॅम सेट केला.

नीलिमा नाश्त्याच्या २ प्लेट्स व विदुषीसाठीचा चहा ट्रेमधून घेऊन आली. टी-पॉयवर ठेऊन जाऊ लागली.

"ताई, तुमचा चहा देखील घेऊन या इथेच. छान गप्पा मारू." विदुषी तिला म्हणाली.

"होय. करून आणते..." नीलिमा पुन्हा स्वयंपाक घराकडे वळली.

"काय असेल ते एकत्रच करत जा. आपण वेगळे नाही." जाणाऱ्या नीलिमाला विदुषी बोलली.

"होय..." म्हणत नीलिमा निघून गेली.

विदुषी तिचा कप उचलून चहाचा घोट घेऊ लागली.

"मग? अकॅडमीच्या कार्यक्रमाचं काय ठरलं?" अवस्युनेही त्याचा कप उचलला.

विदुषीने त्याच्याकडे पाहिले आणि त्याला तिच्या नव्या कार्यक्रमाबद्दल सांगू लागली...

कुठल्या तरी ऑफिसमध्ये रात्री, डार्क रेड लाईट पूर्ण खोलीभर पसरली होती. ऑफिस आहे, पण कशाचं आहे ते मात्र समजत नव्हतं. खोलीत एका बाजूला मांडलेल्या सोफ्यावर ५०+ वय असलेला विनय राजमाने बसला होता. हातात स्कॉचने भरलेला ग्लास. टेबलवर बाटली. आणि त्यासाठी लागणारं इतर साहित्य, उदा. आईस् बकेट इ. त्याच्या बसण्यातूनच तो किती आत्मप्रौढी मिरवणारा व्यक्ती असावा हे स्पष्ट दिसत होतं. आपल्या वैभवाचा माज त्याच्या तोंडावर सरळ दिसत होता, पण तरी आपण किती नम्र व दयाळू आणि मदतीची भावना ठेवणारे आहोत हा अविर्भाव. याच्या समोर सुमेध बसला होता. विनयने ग्लास पुढं करून सुमेधला ऑफर केली. सुमेध नाही म्हनाला. मग विनय घोट घेतला.

"काम झालं?" स्कॉच घसा जाळत खाली उतरल्यावर विनयने विचारलं.

"नाही अजून. पण होईल लवकर." सुमेधने स्पष्ट केलं.

"माणसं विश्वासातली आहेत ना?" विनयचा आणखी एक प्रश्न.

"त्याची काळजी नको. माझीच माणसं आहेत. शिवाय गरजेचं तेवढंच सांगितलंय. काही धोका होणार नाही. त्यांनी केस रजिस्टर केली, की काम चालू होईल." सुमेधचं पुन्हा स्पष्टिकरण.

"गुड! पण त्यांना काम लवकर करायला सांग!" असा हुकूम देऊन विनयने आणखी एक मोठा घोट घेत स्कॉचने तोंड भरले.

सुमेध होकारार्थी मान डोलावली आणि विनयची परवानगी घेऊन त्याने ती केबिन सोडली.

त्याच रात्री अवस्युच्या घरी, त्याच्या घरगुती लायब्रेरीमध्ये अवस्यु विदुषीसाठी पुस्तक वाचत होता... विदुषी गोधडी घेऊन ऐकत दिवाणावर पहुडली होती. वाचता वाचता अवस्यु पान पलटण्यासाठी थांबला. तेवढ्यात विदुषी म्हणाली,

"किती मस्त वाटतंय असं ऐकायला. अजूनही लहान असल्यासारखं वाटतंय." अचानक तिला काही सुचलं. ती उत्सुकतेनं "अरे हा!" म्हणत उठून बसली.

"काय झालं?" तिच्याकडं पाहत अवस्युने विदुषीला विचारलं.

"बाबा, आपण काही पुस्तकं तुझ्या आवाजात रेकॉर्ड करूया? आपण तुमचं ऑडियो बुक्सचं एप चालू करू." विदुषीने एक्साईटमेंटमध्ये तिला सुचलेली कल्पना बोलून दाखवली.

"काही तरीच काय? मी काय प्रोफेशनल नाही." अवस्यु तिची आयडिया बाजूला सारत म्हणाला.

"पैशांसाठी नाही म्हणत मी. तुमच्या आवाजात गोष्टी ऐकणं कोणाला आवडणार नाही... मला खात्री आहे हे एप खूप चालेल." विदुषी तिची कल्पना पुढं रेटू लागली.

पण लक्ष न देता अवस्यु पुढं वाचू लागला.

"प्लिज बाबा, प्लिज..." विदुषी विनंती करू लागली.

"इतकं सोपं नाही बाळा ते... लेखक, प्रकाशक याच्या परवानग्या काढाव्या लागतील, राईट्स विकत घावे लागतील, मग कॉंट्रॅक्ट्स आले... खूप किचकट काम आहे हे तुला माहीत आहेच." अवस्यु तिला समजावण्यासाठी म्हणाला.

"मग आपण पब्लिक डोमेनमध्ये असलेली बुक्स आधी घेऊ ना. रिस्पॉन्स मिळेल तसं मग इतर पुस्तकांचे राईट्स खरेदी करू... विदुषी कंविन्सिंग्ली अवस्युला म्हणाली.

अवस्यु काहीच बोलला नाही. हसून फक्त विदुषीकडे पाहत राहिला.

"प्लिज ना बाबा..." विदुषीने लडिवाळपणे पुन्हा विनंती केली.

"बरं बघू!" अवस्यु हसून तिला म्हणाला.

"थँक्स बाबा. मी उद्यापासूनच सगळी अरेंजमेंट सुरू करते!" अवस्यु आनंदून बोलली.

अवस्युने स्मित ओठांवर घेऊन मान डोलावली व पुढं वाचू लागला...

दुसऱ्या दिवशी सकाळी बांबवडे पोलीस स्टेशनला...

सुमेधचा काका नंदू रिक्षातून उतरून पोलीस स्टेशनच्या दिशेने चालत गेला. दरम्यान त्याने सुमेधला फोन लावला.

"पोलीस स्टेशनमध्ये जातोय." नंदू मोबाईलमध्ये सुमेधला म्हणाला.

"हो. ठीक आहे. तक्रार झाली की मला मिसकॉल द्या. मी परत फोन करतो. फोन उचला, थोडावेळ चालू ठेवा आणि हार सापडलाय सांगून बाहेर पडा! माझ्याच बागेत चुकून राहिला होता म्हणून सांगा." पलिकडून सुमेधने त्याला सूचना दिली.

"होय. जातो." फोन कट करून नंदू पोलीस स्टेशनमध्ये प्रवेशाला.

नंदू समोरील डेस्कवर असलेल्या हवालदाराला संकोचत बोलला,

"सायेब, तक्रार करायची आहे..."

"आत दोन नंबर खोली तिसरी टेबल." हवालदारने नंदूला वाट दाखवली.

"थँक्यू!" नंदू आभार मानून आत गेला.

इकडं तिकडं पाहत, शोधत चालू लागला. त्याला टेबल सापडलंय असा भाव त्याच्या चेहऱ्यावर उमटला व त्या दिशेने तो चालू लागला.

खोली नंबर दोन, टेबल नंबर तीन जवळ...

"बोला." नंदू समोर आलेलं पाहून हवालदार त्याला म्हणाला.

"त... तक्रार करायची होती..." नंदू घाबरत त्या हवालदाराला म्हणाला.

"तेच म्हणतोय बोला! बसा समोर. नांव काय?" हवालदार नंदूला आवाजात जरब ठेऊनच बोलला.

"नरेंद्र उपाशे." बसत नंदूने त्याचं नांव सांगितलं.

"काय तक्राराय?"

"एक हार चोरीला गेलाय." थोडं घाबरत नंदू म्हणाला.

"कसला?"

"साज होता."

"कितीचा?"

"एक तोळ्याचा."

"कुणावर संशय?"

"संशय? नाही..." चाचपत नंदूने हवालदाराला उत्तर दिलं.

"मग चोरीच झाली कसं म्हणता? हरवला पण असू शकतो!" हवालदार आवाज चढवत म्हणाला.

"अ... असंल..." नंदू पुन्हा चाचपत म्हणाला.

"असंल म्हणजे? तुम्हाला नक्की माहीत नाही?"

नंदू पुरता गोंधळला. त्याची ती अवस्था पाहून हवालदार त्याला म्हणाला,

"चिठ्ठी, पावती काही आहे का?"

हा... आहे की." म्हनूत नंदूने खिशातून पावती काढून हवालदाराला दिली.

हवालदाराने ती नीट पहिली. बिल जगदीश उपाशेच्या नांवाने. बिलावर हाराची व खरेदीदाराची सगळी माहिती व घेतलेली तारीख.

हवालदाराने बिल पावती पाहून ती नंदूला परत केली.

"हा जगदीश उपाशे कोण?" हवालदाराने नंदूला विचारलं.

"माझा पुतण्या आहे. त्याच्या काकीसाठी म्हणजे माझ्या बायकोसाठी घेतलेला त्यानं."

"कुठं असतो तो?"

"कामाला परगांवला आहे. दसऱ्यात आलेला तेव्हा घेऊन दिलेला त्यानं. त्याचं लग्न झाल्यावर त्याच्याच बायकोला द्यावा म्हणून माझी बायको जपून ठेवायचा म्हणत होती, पण कूठं गायब झाला काही कळेना..."

"खरं बोलतोयस?"

"होय... पण तुम्ही माझीच एवढी चौकशी का करताय?"

"नाही. तुझ्याकडं बघून वाटत नाही, की तुझ्याकडं एवढा महागडा हार असंल म्हणून."

"गरीब माणसं पोटाला चिमटा काढून हौस भागवतात..."

"ते पण आहेच. काही फोटो बिटो हाराचा?"

"आहे की..." म्हणत नंदूने खिशातून कार्ड रीडर काढून हवालदाराला देले,

"यात आहे."

"हवालदाराने कार्ड रीडर घेऊन ते सिपीयूच्या यूएसबी पोर्टला कनेक्ट केलं. आणि स्क्रिनवर हाराचा फोटो शोधू लागला. हवालदार स्क्रोल करून पाहू लागला. बरीच गाणी त्याला त्यात दिसत होती. पण हाराचा फोटो काही सापडत नव्हता.

"कुठाय रे. सगळी गाणीच तर दिसतायत." वैतागून हवालदाराने विचारलं.

"असंल की साहेब त्यातच..." नंदू चपापून म्हणाला.

"असंल म्हणजे? ये इकडं ये. दाखव." हवालदार आणखीनच वैतागला.

नंदू उठून त्याच्या बाजूस गेला हवालदार स्क्रोल करत असताना फोटोसाठी तो नीट पाहू लागला. त्याची नजर लहान फोटोवर पडली.

"हा बघा साहेब, हा!"

हवालदाराने फोटोवर क्लिक करून फोटो मोठा केला.

"हाच का?" त्याने नंदूला विचारलं.

"होय साहेब हाच!" नंदूने पुष्टी केली.

हवालदाराने फोटो कॉपी करून पोलीस स्टेशनच्या कम्प्युटरला सेवा करून घेतला. त्याचवेळी नंदूने सुमेधला मिसकॉल केला. त्याला परत फोन आला. नंदूने फोन घेतला.

"हा सुमेध, तक्रार केली सांगायला फोन केलेला. बॅलन्स नाही म्हणून मिसकॉल दिला." नंदू मोबाईलमध्ये बोलला.

तिकडे सुमेध त्याच्या प्रशस्त खोलीत सोफ्यावर बसून होता. मांडीवर लॅपटॉप घेऊन तो मोबाईलवर बोलत होता...

"काका त्याची गरज नाही. हार सापडला. चुकून माझ्याच बॅगेत्न परत आला. काकीनं सांगितल्यावर मी पाहिलं, तर बॅगेत सापडला." सुमेध नंदूला म्हणाला.

नंदूने फोन बाजूला घेतला.

"माफ करा साहेब. पुतण्या म्हणतोय हार सापडला. त्याच्या बॅगेतच होता. चुकून तो परत घेऊन गेलाय." नंदू हवालदाराला आर्जवाच्या सुरात म्हणाला.

आता मात्र हवालदार खरंच वैतागला.

"दे फोन इकडं दे." हवालदार जवळजवळ किंचाळलाच आणि त्याने मोबाईल नंदूकडून हिसकवला.

"ये हिरो! आधी बघाय येत नाय काय? उगाच आम्हाला त्रास!" हवालदार सुमेधला म्हणाला.

सुमेधने हवालदाराचा आवाज ऐकून एक व्हॉइस मॉड्युलर डिव्हाईस मोबाईच्या पोर्टमध्ये अटॅच केलं.

"झोपला काय रे!" पलिकडून हवालदार पुन्हा ओरडला.

"नाही नाही साहेब. अचानक तुमचा आवाज ऐकला म्हणून जरा दचकलो..." सुमेध म्हणाला व अपराधीपणे पुढं बोलला,

"माफ करा साहेब तुम्हाला त्रास झाला. मी एक काम करतो. सापडलेल्या हाराचा तुम्हाला फोटो मेल करतो... म्हणजे तुमची खात्री पटेल..."

व्हॉइस मॉड्युलरमुळे हवालदाराला सुमेधचा आवाज वेगळाच ऐकू आला. पण अशी कधी सुमेधला ऐकलं नसल्याने त्याच्या हे लक्षात नाही आलं.

"घे ईमेलआयडी लिहून. Kpoliceservice@gmail.com" हवालदाराने सुमेधला इमेल आयडी सांगितला.

"थँक्यू साहेब. लगेच फोटो पाठवतो." सुमेधने मोबाईल वरून आभार मानले.

हवालदाराने वैतागाने फोन कट करून नंदूला दिला.

"फोटो पाठवतो म्हणालाय. कन्फर्म झालं, की जा. बस." हवालदार नंदूला म्हणाला.

नंदू पुन्हा समोर बसला.

"जरा बघत जा इकडं तिकडं. का लगेच पुलीस स्टेशन गाठायचं? कामं रस्त्यात बाबा." शांत होत हवालदार नंदूला सल्ला देत बोलला.

"होय साहेब. पण एवढी महाग वस्तू हरवली म्हणून मग तडख आलो." नंदूने चिंता व्यक्त केली.

"ते पन खरं म्हना. कवा तर अशी वस्तू घरात आलेली असती ती हरवल्यावर सैरभैर हुनारच. तरी बरं तक्रार अजून लिहिली नव्हती. नाही तर तुला लय ताप झाला असता..." कानात पेन खालून कोरत हवालदार आपल्या रांगड्या लेजात बोलला.

"होय..." नंदू कृतज्ञतापूर्वक उद्गारला.

"बघू आता तुझा पुतण्या फोटो कधी पाठवतोय."

दोघे वाट पाहू लागतात. एकेक क्षण नंदूसाठी तासासारखा जात होता.

इकडे सुमेधनेचं सगळं लक्ष लॅपटॉपमध्ये होतं. आधीच काढून ठेवलेले कोल्हापुरी साजचे फोटो सुमेधने हवालदाराने सांगितलेल्या ईमेल आयडीवर सेंड केला.

पोलीस स्टेशनमध्ये हवालदार कम्प्युटर स्क्रिनकडेच पाहत होता. मेल आलेला त्याला दिसला.

"मेल आला." हवालदार म्हणाला व त्याचा हात माऊसकडे सरकला.

हवालदाराने मेल ओपन केला व सुमेधने पाठवलेला फोटो डाऊनलोड करून घेतला. मग आधीचा सेव केलेला फोटो दुसऱ्या विंडोमध्ये उघडून दोन्ही फोटो नीट पाहू लागला.

"दोन्ही हार तर सेमच वाटतायत." स्क्रिनकडे पाहत हवालदार म्हणाला.

हे ऐकून नंदूचा लटकलेला श्वास मोकळा झाला.

"बाबा, तोच हाराय. निघ तू. पन पुन्ना काय हरवलं तर नीट शोध घ्या घरात. नाय सापडलं तर मग या इकडं आमी आहोतच सेवेसाठी." हवालदार पुढं म्हणाला.

"थँक्यू! थँक्यू साहेब! खूप उपकार झाले... येतो साहेब..." नंदू सचिंत हसला.

"या!" हवालदाराने मान हलवून संमती दिली.

निरोप घेऊन नंदू निघाला.

सुमेध त्याच्या खोलीत बसून लक्षपूर्वक लॅपटॉप स्क्रिन पाहत होता. काही तरी टाईप करत होता.

आणि स्क्रिनवर अचानक खूप सारे फोल्डर्स आपोआप कॉपी होवू लागले...

हे पाहत असताना सुमेधच्याही नकळत त्याच्या चेहऱ्यावर एक क्रूर स्मित तरळतं. लॅपटॉप खाली ठेऊन तो उठला. खोलीत असलेल्या मिनी फ्रिजकडे गेला. त्यातून सॉफ्ट ड्रिंकचा कॅन काढून ते ओपन करून घोट घेतला. त्याचा मोबाईल वाजला. सुमेधने कॉल रिसिव्ह केला.

"काही प्रोग्रेस?" अपेक्षेप्रमाणे विनयचा फोन होता.

"डेटा कॉपी होतोय. पण काम पूर्ण व्हायला बराच वेळ लागेल. पोलिसांचा डेटा काही लहान नसणार!" सुमेध विनयला म्हणाला.

"मग एवढ्या वास्ट डेटा मधून तू त्याला कसा शोधणार आहेस?" पलिकडून विनयचा प्रश्न.

ऐकत ड्रिंकचा घोट घेत सुमेध परत सोफ्यावर येऊन स्क्रिनकडे बघत बसला.

"मी क्रिएट केलेल्या क्लाऊड स्टोरेज सिस्टीमला सगळा डेटा सेव्ह होतोय. एवढा मोठा डेटा स्टोअर करायचा म्हंटल्यावर हार्ड ड्राईव्हसचा ढीग लावावा लागला असता..." सुमेधने विनयचं शंका निरसन केलं.

"मग?"

"सगळा डेटा आला, की मी बनवलेलं एआय तो डेटा स्कॅन करेल. मी केमिकल बॉम्ब्स्, किशोर उपाशे, अवस्यु आपटे, 2010 ब्लास्ट अशी काही विशिष्ट की-वर्ड्स सेट केली आहेत. ह्या की-वर्ड्स असलेल्या केसेस एआय बाजूला काढून सेव करेल. त्यामुळे मला स्वतः ते सगळं बघत बसण्याची गरज नाही."

"हुशार आहेस. मला अभिमान आहे, मी योग्य मुलाला मदत करतोय." विनयचं कौतुक करत विनय म्हणाला.

स्मिताची लकेर त्याच्या ओठांवर उमटली. नकळत त्याने फोन कट केला व ड्रिंकचा सिप घेत स्क्रिनकडे पाहत बसला. त्याच्या ग्लासेसवर आपण स्क्रिनवर चालू घडामोडी रिफ्लेकट होऊ लागल्या... त्याच्या ओठावरचं हास्य अजूनही लोपलेलं नव्हतं... आणि कसं लोपणार? त्याच्या ध्येयाच्या तो आता खूप जवळ होता... ज्यास्तHइ त्याने किती तरी वर्षे वाट पाहिली होती...

विनय त्याच्या फॅक्टरीत केबिनमध्ये बसला होता. त्याने इंटरकॉमवरून कोणाला तरी कॉल केला.

"प्रोग्रॅमवर लक्ष ठेव!" विनयने त्या व्यक्तीला हुकूम सोडला आणि रिसिव्हर रिप्लेस केला.

## ३. आहुती...

विदुषीच्या रियाजाची खोली. विदुषीच्या रियाज चालू होता. अवस्यु येऊन तिच्यासमोर बसला. पण गाण्यात तल्लीन असलेल्या विदुषीला हे लक्षात आलं नाही. काही वेळाने नीलिमा चहाचा ट्रे घेऊन आली. अवस्युने तिला आवाज न करण्याविषयी खूण केली व तिच्या हातून ट्रे घेतला. नीलिमा निघून गेली.

काही वेळाने विदुषीचा रियाज संपला.. तिने डोळे उघडले. समोर अवस्युला बसलेला.

"बाबा तुम्ही?" विदुषी स्मित करत उद्गारली.

"काय करायचं? माझा जॉब तू दुसऱ्याला देऊन टाकल्यास आता रोज सकाळी काय करायचं असा प्रश्न तयार झालाय. तुझा आवाज ऐकू आला म्हंटलं तुझं गाणं तरी ऐकावं. आजपासून हा नवीन नियम. दिवस प्रसन्न जाईल माझा..." अवस्यु खोट्या नाराजीने म्हणाला.

"रोज ऐकताच ना?" विदुषीचं हास्य अजूनही लोपलं नव्हतं.

"ते वेगळं. आजपासून समोर बसून ऐकणार माझ्या मुलीला!" अवस्यु प्रसन्न हसून म्हणाला.

आणि त्याने तिला चहाचा मग देऊ केला व आपण ही एक उचलला.

सुमेध अजूनही लॅपटॉप समोरच बसलेला होता. रात्रभर झोपला होता, की नाही कुणास ठाऊक... त्याचा मोबाईल वाजला. त्याने फोन रिसिव्ह केला. फोन नंदूचा होता.

"बोला काका." सुमेध फोन केलेल्या नंदूला म्हणाला.

"अरे, काल मी एक गोष्ट तुझ्यापासून लपवली. मला वाटलं तू रागवशील म्हणून नाही बोललो..." नंदू म्हणाला.

"काही प्रॉब्लेम झालाय का काल?" सुमेधने थंड राहूनच विचारलं.

नंदू त्याच्या गॅरेजमध्ये उभा होता.

"होय म्हणजे, त्या हवालदारानं तक्रारच लिहून घेतली नाही." नंदू इकडे तिकडे पाहत हळू आवाजात मोबाईलमध्ये बोलला.

"नो प्रॉब्लेम काका. आपलं काम झालंय. फक्त तुम्ही घाबरू नका. तुमच्यापर्यंत काही येणार नाही. याची काळजी घेतली आहे मी." सुमेधने त्याला आश्वस्त केलं.

"मला माझी भीती नाहीच रे बाळा. तुझ्यासाठी जीव घाबरा होतोय. पुन्हा तू लांब गेलास तर...?" नंदू चिंतीत स्वरात सुमेधला म्हणाला.

"काळजी नको काका. तसं नाही होणार..." सुमेधने नंदूला पुन्हा आश्वासन दिलं.

सुमेधने फोन बाजूला घेतला होता. तसाच त्याने तो फोन कट केला.

"कधीच नाही होणार!" सुमेध हरवल्यासारखा पुटपुटला.

त्याने पुन्हा लॅपटॉप स्क्रिनकडे पाहिलं. आणि त्याचे डोळे बारीक झाले. कशाचा तरी वेध घेण्यासाठी! स्क्रिनवर काही तरी ब्लिंक झालं आणि त्याच्या कपाळावर आट्या उमटल्या!

अनेक विंडोज एकमेकांवर ओव्हरलॅप होत होत्या. यात कुठेतरी त्याला हव्या असणाऱ्या व्यक्तीचा फोटो फ्लॅश झाला होता व त्याच्यावर देखील अनेक विंडोज येऊन आदळत होत्या. सुमेधने विंडोजचे ओव्हरलॅपिंग थांबवले. तो वरील विंडोज क्लोज करत गेला आणि तो एका फोटोवर थांबला. जी विंडो सगळ्यात वर स्थिर झाली; त्यात फोटो होता... 'अवस्युचा'!

अवस्यु, विदुषी आणि स्टुडिओ रेकॉर्डिस्ट रेकॉर्डिंग रूममध्ये होते. अवस्युला रेकॉर्डिंग व माईकबद्दल इन्स्ट्रक्शन दिलं जात होतं...

"ओके टेक करूयात? " रेकॉर्डिस्टने अवस्युला विचारलं.

"दडपण आल्यासारखं वाटतंय..." अवस्यु तोंड जड मनाने बोलला.

"घाबरायचंय काय बाबा त्यात? मला रेकॉर्डिंग करताना कधी पाहिलं नाही का तुम्ही?" विदुषी आश्चर्य करत म्हणाली.

"काचेच्या पलिकडून पाहणं वेगळं आणि इथं उभं राहणं वेगळं... हात पाय गळल्यासारखे वाटतायत...." अवस्युने आपली बाजू स्पष्ट केली.

"बाबा; तुम्ही हे करताय! बी ब्रेव बाबा! तुम्ही माझे बाबा आहेत आणि साध्या रेकॉर्डिंगला घाबरताय." विदुषी जरा कठोरपणे अवस्युला म्हणाली. अवस्युला धीर देणं हा त्यामागील तिचा विचार.

"अमिश, चल. बघू कसं बोलत नाहीत ते." आणि तिने रेकॉर्डिस्टला जवळजवळ ऑर्डरच दिली.

मग विदुषी व रेकॉर्डिस्ट अमिश रेकॉर्डिंग रूमच्या बाहेर आले. रेकॉर्डिस्टने आपली जागा घेतली. विदुषी त्याच्या बाजूला उभारली. रेकॉर्डिस्टचं सेट-अप झाल्यावर त्याने अवस्युला बोलण्यासाठी क्यू दिला. विदुषीने गोड स्माईल अवस्युला बेस्ट ऑफ लक्ष दिलं. अवस्यु वाचू लागला...

सुमेधचं काम अजून संपलेलं नव्हतं. तो अजूनही सोफ्यावरच बसून लॅपटॉपवर काम करत होता...

लॅपटॉपवर सुमेध त्याने शोधलेला अवस्युचा फोटो आधार कार्डच्या डेटाशी मॅच करत होता. डाव्या बाजूच्या एका विंडोमध्ये अवस्युचा पोलीस रेकॉर्डमध्ये सापडलेला फोटो होता. तर दुसऱ्या विंडोमध्ये एकामागून एक असे अनेक आयडेंटिटी इन्फॉर्मेशन फ्लॅश होत होते...

सुमेध काळजीपूर्वक त्याकडे पाहत होता...

स्क्रिनवर एक आयडेंटिटी इन्फॉर्मेशन पेज थांबलं. ते अवस्युचंच होतं. त्याची सगळी माहिती व पत्ता त्यावर होता! "MATCH FOUD" असं स्क्रिनवर Super Impose झालं!

"सापडला!" काही तरी मोठं मिळवल्याचा भाव त्याच्या चेहऱ्यावर उमटला.

सुमेधने अवस्युची माहिती असलेल्या पेजची प्रिंट काढली व ती घेऊन तो खोली बाहेर गेला.

विनय त्याच्या रूममध्ये मोबाईलवर बोलत होता... समोर नाश्ता मांडला होता.

"पुढच्या महिन्यात मोठी शिपमेंट आहे. सो बी प्रिपेर्ड!" त्याने पलिकडील व्यक्तीला इन्स्ट्रुक्शन्स दिले.

त्याचवेळी सुमेधने बाहेरून दार नॉक केलं.

"कोण?" विनयने ओरडून विचारलं.

"मी, सुमेध!"

"दार उघडं आहे ये."

विनयने फोन कट केला. सुमेध खोलीत प्रवेशला. विनयने नाश्ता चालू केला. सुमेध प्रिंट विनय समोर ठेऊन त्याच्या बाजूला बसला.

"सापडला?" विनयने अधीरतेने विचारलं.

"हो! अजूनही कोल्हापुरातच आहे. आजच संपवायचं म्हणतोय!" सुमेध कोरड्या चेहऱ्याने म्हणाला.

"तू नको. कोणी तरी माणूस पाठवू!" विनयने सुचवलं.

"नाही! याचसाठी जगतोय! आता हे मीच करणार!" विनयला सुमेधने आपला निर्णय सूनवला.

"जशी तुझी इच्छा! काही खाणार?" विनयने सगळं त्याच्यावर सोपावलं आणि नष्ट ऑर केला.

"अंहं! येतो!"

प्रिंट तिथेच सोडून सुमेधने खोली सोडली. विनय प्रिंट हाती घेऊन पाहू लागला.

त्यावर अवस्युची माहिती व फोटो.

"दहा वर्षं! दहा वर्षं गेलीत! पण आता ही मधली दहा वर्षं अश्शी गायब होतील!" असुरी स्मित ओठांवर घेऊन विनय क्रूर हसला.

रात्र झाली होती. विदुषी अवस्युशी फोनवर बोलत होती...

"बाबा, तुम्ही तर आता माझ्यापेक्षा पण बिझी झाले आहात." विदुषीने टोमणा मारत मस्करीच्या सुरात तक्रार केली.

"तूच तर कामाला लावलयंस. आता तक्रार करायची नाही." पलिकडून हसत अवस्यु बोलला.

"घरी कधी येताय?"

"वेळ लागेल. तू जेवून घे."

फोन चालू असतानाच बेल वाजते.

"बेल वाजतीये. थांबा जरा बघते कोण आहे."

विदुषी अवस्युला बोलून दार उघडयला गेली. फोन चालूच होता. समोर नीलिमा उभी होती. पण घाबरलेली.

"काय झालं?" विदुषीने नीलिमाला विचारलं.

तोच नीलिमाच्या मागून सुमेध बाजूला सरकला व विदुषी समोर आला. तशीच नीलिमावर मागून रोखलेली गन विदुषीवर रोखली गेली. हातात काळे लेदर ग्लव्ह्स्, तर गनला कम्प्रेसर लावलेलं होतं. ती गन बघून विदुषी पण खूप घाबरली व तिच्याही नकळत ती मागे सरकली. नीलिमाला सुमेधने पुढं ढकलले. ती त्या फोर्सने आत आली. सुमेध देखील मागून आला. त्यानं दार लावून घेतलं.

"क... कोण आहेस तू...?" विदुषीने घाबरत विचारलं.

"ते तुझ्यासाठी महत्त्वाचं नाही..." सुमेध शांतपणे तिला म्हणाला.

"हॅलो बाळा? काय झालं? कोण आहे?" पलिकडून अवस्युने चिंतीत होत विचारलं.

सुमेधचे लक्ष विदुषीच्या हातातील मोबाईलकडे गेलं. तिच्याकडून त्याने रिचा मोबाईल हिसकावून घेतला. भीतीने तिची ग्रीप सैल झालेली होतीच. त्यामुळे तिच्याकडून सुमेधला कोणताच रेसिस्टन्स झाला नाही. सुमेधने मोबाईल पाहला.

"बाबा!" सुमेधनं मोबाईल वरील नांव वाचलं.

त्यानं मोबाईल कानाला लावला.

"हॅलो?" अवस्युच्या आवाजाचा अंदाज घेण्यासाठी तो मोबाईलमध्ये बोलला.

"कोण?" चिंतीत सवरक्त अवस्युने विचारलं.

"हॅलो! अवस्यु?"

"होय. कोण?" अवस्यु अधीर होत चालला होता.

वेळ साधून विदुषी लॅन्ड्-लाईनपर्यंत पोहोचली. ती फोन उचलणार इतक्यात सुमेधच्या हे लक्षात येऊन त्याने फायर करून लॅन्ड्-लाईन फोडला. विदुषी किंचाळून मागे सरकली.

"वाट बघतोय!" एवढंच सुमेध अवस्युला बोलला आणि त्याने मोबाईल बाजूला घेतला.

"हॅलो! हॅ..." अवस्यु पलिकडून इम्पेशट्ली ओरडू लागला...

पण काही न ऐकता सुमेधने फोन कट केला! त्याने नीलिमाला जवळ येण्यासाठी खूण केली. नीलिमा घाबरत त्याच्याकडे सरकली.

"तुमच्या बाईसाहेबांना बांधा!" त्याने तिला ऑर्डर सोडली,

"काय आहे ना, त्या खूपच हुशार दिसतायत! आणि मला अवस्यु येईपर्यंत कोणाचीच कसलीच हुशारी नको आहे!" तो बोलला.

पण नीलिमा जागची हलली नाही. सुमेध गन तिच्या डोक्याला लावली आणि व्हीडून म्हणाला,

"कानांनी ऐकू येत नसेल तर आणखी एक होल पाडू? म्हणजे ऐकायला येईल? हं?"

"नाही नको... नको..."

ती आत जाऊन लागली...

"जरा मोठा दोर आण!" तो तिला म्हणाला,

"तुमच्या साहेबांना पण बांधावं लागणार आहे आल्यावर."

नीलिमा आत जाऊन दोरखंड शोधून घेऊन आली व विदुषीला बांधू लागली.

"असं नाही! खांबाला! आणि घट्ट बांध!" सुमेधने तिला टोकलं.

नीलिमा संकोचली. म्हणून मग सुमेधने तिच्या पायात जमिनीवर गोळी चालवली. दोघी अत्यंत घाबरल्या. मग नीलिमाने विदुषीला खांबाकडे नेऊन तिला खाली बसवलं व घट्ट बांधलं

आणि तिच्या बाजूलाच खाली मान घालून बसून राहिली, घामाने अगदी चिंब. दरम्यान सुमेध कर्टन्स ओढून घेतले...

आणि एक खुर्ची समोर घेऊन विदुषीचा फोन चेक करत  सुमेध बसला. त्यानं काहीवे फोन बघून विदुषीचंच एक गाणं प्ले केलं...

"तुझा बाप आपण येऊपर्यंत गाणी ऐकू." सुमेध म्हणाला.

बराच वेळ निघून गेला. गाणी लूपमध्ये चालूच होती. आणि अचानक...

अवस्यु दार जोरात ढकलून आत आला. तो एंटर झालेला लक्षात येताच सुमेध उठून उभा राहिला व समोरून तसाच धावत येणाऱ्या अवस्युला छातीवर मारून त्याने त्याला खाली पाडले. हे पाहून बांधलेली विदुषी दचकली आणि स्टन्ड् झाली. नीलिमा मात्र जोरात किंचाळली. अवस्युचं डोकं जमिनीवर अदळल्यानं त्याला चक्कर आल्यासारखं झालं. सुमेधने अवस्युच्या कॉलरला मागून पकडून त्याला विदुषीच्या दिशेनं ओढलं आणि गन खाली ठेऊन त्याचे हात मागे करून त्यालाही बांधलं. आता मात्र सगळं असह्य होऊन नीलिमाने पळून जाण्याचा प्रयत्न केला. सुमेधच्या हे लक्षात येऊन तो गन उचलून उठला, मागे वळला आणि त्याने नीलिमावर फायर केलं. ती कोसळली. सुमेध पुन्हा अवस्युपाशी बसला व त्याला बांधलेला दोर त्याने घट्ट केला. इतक्यात बाहेरून एक स्त्री तिच्या लहान मुलाला कडेवर घेऊन आत येऊ लागली.

"अगं विदू काय चालू आहे? किती मोठा आवाज येतोय बाहेर... टीव्ही चालू आहे का?" काही माहीत नसलेल्या त्या स्त्रीने आत येत विचारलं.

सुमेधने मागे पाहिलं. समोरचा प्रकार पाहून ती बिथरली होती. नीलिमाचा मृतदेह आणि अवस्यु, विदुषीला बांधलेलं पाहून ती स्त्री जागीच खिळली होती. पण क्षणात स्वतःला सावरून ती लगेच तिथून निघण्यास वळली. सुमेध तिच्यावर गन रोखली.

"दंगा न करता आत ये!" त्याने तिला आदेश दिला.

तो तिच्याकडे गेला. मागून तिच्यावर गन पॉईंट केली. दरवाजा बंद केला व तिला अवस्यु व विदुषीकडे लीड केलं.

"चल!" गन मागून डोक्यावर रोखत तो तिला बोलला.

बंदुकीच्या बॅरेलने त्याने तिला पुढं ढकलले. ती विदुषीच्या दिशेने चालली. मागून तो आला.

चाकू घेऊन उरलेला दोरखंड कापून त्याने त्या स्त्री व मुलाला देखील बांधून ठेवले. मग अवस्युला जाग येईपर्यंत सुमेधने वाट पाहत तोही तेथेच हात गुडघ्यांवर बांधून जमिनीवर बसून राहिला. हातात गन. बॅकग्राऊंडला विदुषीचं गाणं चालू. पण यावेळी वेगळं. काही वेळाने अवस्यु रिकव्हर होत शुद्धीवर येतो...

"क... कोण आहेस तू? हे का करतोयस?" मोठ्या कष्टाने अवस्युने त्याला पाहण्याचा ओरायत्न करत त्याला विचारलं.

"कळेल!" उठून उभारत सुमेध अवस्युला म्हणाला.

सुमेध नंतर आलेल्या स्त्री जवळ गेला. त्याने तिच्या डोक्यावर गन लावली. फायर केलं. ती जागीच मेली. तिचं मुल रडू लागलं... सुमेधने क्रूर स्मित केलं. त्याचं पुढंच टार्गेट हेच तर होतं! त्याने त्याच्याकडे पाहिलं. तो काय करणार आहे हे लक्षात येऊन...

"थांबव! प्लिज थांबव हे!" विदुषी रडत याचना करत ओरडली.

समोरची घटना पाहून अवस्यु पण हादरला होता. पण तरी त्याच्या चेहऱ्यावरची शांतता त्यानं ढळू दिलेली नव्हती. हे पाहून मग सुमेधने लहान मुलाच्या डोक्यात गोळी घालली. एका क्षणात मुलंही निपचित झालं!

"प्लिज..." आर्जव करत विदुषी असहाय्यतेने ओरडली.

पण अवस्यु त्याच्याकडे गप्प पाहत होता!

"काळजी करू नको. जास्त त्रास नाही सहन करावा लागणार. पुढची तूच आहेस!" सुमेध शांतपणे म्हणाला.

तो जे करत होता त्याचं त्याला काहीच वाटत नव्हतं! पण त्याचं हे वाक्य अवस्युला चांगलंच आदरवून गेलं!

सुमेधने पुढं सरकून विदुषीच्या डोक्यावर गनचे बॅरेल टेकवले. घाबरलेली विदुषी डोळे मिटून डोकं खाली करून अंग चोरू लागली. डोळ्यांतून अश्रू धारा असिमीत ओघळत होत्या...

"तिला काही करण्याची हिंमत पण करू नको!" अवस्यु अतीव रागाने ओरडला.

"आत्ता वाचा फुटली?" सुमेध अवस्युकडे चिडून पाहत ओरडला. म्हणाला,

"मघापासून तर गप्प होतास! हे हेच प्रुव्ह करतं, की तुला कोणाविषयी काहीच वाटत नाही! पक्का स्वार्थी आहेस तू अवस्यु! आत्ता... आत्ता समजलं? जवळच्या माणसाला काही झालं तर काय होतं? कसा जीव जळतो?!"

सुमेध ट्रिगर प्रेस करू लागला...

"नाही!" अवस्यु किंचाळला.

अवस्यु सुटण्यासाठी झटापट करू लागला. दरम्यान त्याच्या या धडपडीची मजा घेत सुमेधने ट्रिगर दाबला. चाप ओढला गेला. ***बँग!!!*** गोळीच्या आवाजाने वतावरणातली अगतिकता, विचलता सगळं शांत झालं. रक्ताच्या चिलकांडीसह विदुषी देखील निपचित झाली. रक्त जमिनीवर सांडलं गेलं, ***स्प्लॅश!*** विदुषीसह अवस्युची चाललेली धडपडही बंद झाली... बॅकग्राऊंड विदुषीचं गाणं तेवढं चालू होतं... यावेळी वेगळं...

अवस्युचा मोठ्याने श्वासोच्छ्वास चालू होता... धक्का बसलेला तो निपचित अविचल पडलेल्या विदुषीकडे अविश्वासाने पाहत होता. आता त्याला या दुःखतुन सावरण्यासाठी वेळही न देता सुमेधने त्याच्याकडे येऊन त्याच्या डोक्यावर गन ठेवली. पण काही तरी विचार करून त्याने गन मागे घेतली.

अवस्यु धक्क्यात होता. त्याला भिरभिरल्यासारखं होतं होतं...

"नाही!" सुमेध उद्गारला.

तो अवस्युपाशी एका गुडघ्यावर बसला. अवस्यु मात्र त्याच्याकडे न बघता मरून पडलेल्या विदुषीकडे पाहत होता; अविश्वासाने, असहाय्यतेने...

"दुखलं? वाईट वाटलं? वाटणारच! जेव्हा आपलं कोणी मरतं ना; असंच वाटतं! आपलं माणूस आपल्या समोर मेलं, की असंच वाटतं! आणि त्याहीपेक्षा दुःख तेव्हा होतं, जेव्हा कोणीतरी आपल्याच समोर आपल्या माणसाला मारून टाकतं! हो ना...?! हो... हो ना...?!" बोलताना सुमेध मध्येच काहीकाळ थांबला आणि पुढं म्हणाला,

"तुला वाटेल मी तुला जिवंत सोडेन हे दुःख भोगायला! पण मी इतका मेहेरबान नाही होणार तुझ्यावर! आणि तुला जिवंत सोडण्याइतका मी मूर्ख देखील नाही! तुला मारणार! पण असं झटकन नाही! तू मरशील, पण आपल्या मेलेल्या मुलीची छवी डोळ्यांसमोर घेऊन! म्हणून मी तुला..."

सुमेधने गुडघ्यांवर असलेल्या उजव्या हाताची मनगट सैल ठेवून अवस्युच्या उजव्या पायावर फायर केलं. अवस्यु विव्हळला. पण त्याचं लक्ष विदुषी पासून अजिबात ढळत नाही. त्याचे डोळे पाण्याने भरले.

"असं मारेन, की तू मरशील खरा, पण अतीव रक्तस्त्रावानं!" सुमेध बोलतच होता.

त्याने दूसरी गोळी डाव्या पायात, अवस्युच्या डाव्या मांडीवर बंदूक रुतवत चालवली. अवस्युने यावेळी डोळे घट्ट मिटून घेतले. पापण्यांच्या कडा पाण्याने भरल्या. त्याच्या तोंडून "आह!" बाहेर पडलीच! पण पुन्हा डोळे उघडून त्यानं विदुषीकडे पाहिलं. डोळ्यांतून अश्रू ओघळले.

"दुखलं?! मुलीच्या मृत्यू इतकं नक्कीच दुखलं नसेल. नाही?!" असं म्हणत सुमेधने पुन्हा फायर केलं. यावेळी डाव्या खांद्यावर.

"आह!!!" अवस्यु वेदनेने ओरडला.

"तुझा एकही वायटल ऑर्गन मी डॅमेज करणार नाही! तू मरशील तो एक्सेसिव्ह ब्लड लॉसने!" सुमेध अवस्युला पुढं म्हणाला.

आणि पुन्हा उजव्या खांद्यावर गोळी! आणि मग पोटात. अवस्यु उसळला. त्याची नजर अजूनही मेलेल्या विदुषीवर. मोठ्या कष्टाने तो डोळे उघडे ठेवण्याचा प्रयत्न करत होता... बॅकग्राऊंडला विदुषीनं गायलेलं वेगळं गाणं...

सुमेध दरवाज्याकडे गेला. आपली गन मागे खोचून घाईने तो अवस्युच्या घराबाहेर पडला.

सुमेध पळत बाहेर आला. हे अवस्युच्या घराच्या दिशेने येणाऱ्या त्याच्या शेजाऱ्याने पाहिले. सुमेध धावत जाऊन कारच्या मागील दरवाजा खोलून आत बसला. हे पाहून आपल्या पत्नी व मुलाला पहायला बाहेर आलेला अवस्युचा शेजारी जयेश काही तरी गडबड आहे हे जाणवून अवस्युच्या घराकडे धावला. तो आत शिरला.

अवस्युच्या घरात, जयेश घाईने प्रवेशाला व समोर नीलिमाला मेलेलं पाहून तो जागीच खिळला. त्याने इतस्थत: पाहिलं. त्याला त्याच्या उजव्या बाजूला त्याची बायको म्हणजे मघासची स्त्री, तिचं मूल मरून पडलेलं दिसलं आणि त्याच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला.

एका क्षणात सुमेधबद्दल सगळं विसरून जयेश स्त्री व मूलाकडे धावला. तो त्यांना कवटाळून रडू लागला. अवस्युच्या डोळ्यांची उघडझाप होऊ लागली होती. डोळे उघडे ठेवणे त्याला कठीण जात होते. तो त्याचे भान हरपत चालला होता... त्याचा तोल गेल्यासारखं होऊ लागलं. त्या अवस्थेत देखील तो त्या दाम्पत्याकडे, त्या निष्पाप मुलाकडे पाहत होता. ब्लिंक करून एक नजर त्याने विदुषीकडे वळवली. एका पॉईंटला अवस्युला शेजाऱ्याचं रडणं ऐकू येणं बंद झालं... त्याची नजर धूसर होऊन मिटली आणि त्याला फक्त विदुषीचं गाणं ऐकू येऊ लागलं. बाकी सगळं अगदी शांत... शांत...

तिकडे सुमेधची गाडी रस्त्यावर जोरात धावत होती. सुमेध पडून होता सीटवर. अंग चोरून एका अंगावर. हातात गन तशीच होती. त्याला कसला तरी त्रास होत होता, पण ते तो चेहऱ्यावर दाखवत नव्हता. पण त्याच्या विचलित अवस्थेत संथ होणारी हालचाल यातून त्याची तगमग दिसत होती...

# ४. भूत...

अतिशय घाबरलेला जगदीश 【लहानपणीचा १५ वर्षांचा सुमेध】 खाली पडला होता. त्याच्या समोर एक पोलीस पाठमोरा हाती सर्व्हिस रिव्हॉल्व्हर घेऊन कोणावर तरी ती ताणून उभा होता. पोलिसाच्या गनमधून फायर झालं व त्याने गन रोगलेली समोरील व्यक्ती खाली कोसळू लागली. त्या व्यक्तीने पकडलेला दुसरा एक पोलीस अधिकारी त्याच्या तावडीतून सुटला. हे पाहून धक्का बसलेल्या जगदीशने त्याच्याजवळ पडलेली गन घेऊन थरथरत त्या फायर केलेल्या पोलिसावर फायर केलं...

.

.

.

नदी काठावरच्या स्मशानात समोर एक चिता जळत होती. हातात हतकडी असणारा जगदीश धगधगत्या डोळ्यांनी त्या धुमसत असणाऱ्या चितेकडे पाहत होता. चेहऱ्यावर असिमीत राग...

.

.

.

ज्यूवेनाईल हाऊस; वॉर्डन जगदीशला केसाला धरून ओढत आत आला... त्यामुळे जगदीशला चालायचं नसतानाही त्याच्या पायांना वेग आला होता... जगदीश वॉर्डनच्या हातावर मारत होता. सुटण्यासाठीची त्याची ही धडपड होती. वॉर्डनने आणून त्याला एका खोलीत आदळले आणि निघून गेला. त्या खोलीत पंधरा ते अठरा वयोगटातील ५-१० मुलं आधीच होती. ते नवीन आलेल्या जगदीशकडे पाहत होते. त्यांतील एक त्यांचा लीडर वाटावा असा मुलगाही त्याच्याकडेच पाहत होता. उदय नांव याचं. तेथील सर्वांमध्ये उंचीने जास्त व धष्टपुष्ट. उदय जगदीशसमोर आला. त्याच्यापाशी बसला. त्याचे केस ओढून त्यानं जगदीशचं तोंडवर करून पाहिलं.

"कोण रे तू?" त्यानं जगदीशला विचारलं.

जगदीश काहीच बोलला नाही.

"कोण का असंना एवढं लक्षात ठेव, ही आकड इथं नाय चालायची! इथला राजा मी हाय! उदय! नांव आपलं. नीट लक्षात ठेवायचं! आणि गप माझं ऐकायचं! सांगतोय ते करायचं! आज तुझा पहिला दिवस, त्यामुळं आज तुला काई त्रास हुनार नाय! उद्या पास्नं माझ्या कामाला लागायचं!" म्हणत उदयने त्याला केसाला धरूनच उठवलं व जमलेल्या मुलांकडे ढकललं.

"स्वागत करा रे याचं!" उदय ओरडला.

त्या मुलाचा शब्द कोणी खाली पडू दिला नाही. जगदीश पुढं जाताच एकाने त्याला भिंतीवर ढकलून दिलं. जगदीश भिंतीवर आदळला. तो खाली पडणार तोच दुसऱ्याने त्याचं तोंड भिंतीवर जोराने दाबून ठेवलं. जगदीश स्वतःला सोडवण्याचा प्रयत्न करू लागला, पण तो मुलगा त्याच्यापेक्षा खूप पुष्ट असल्यानं त्याला ते जमलं नाही. त्या मुलाने मग जगदीशला मागे फेकून दिलं. जगदीश जमिनीवर आदळताच इतर सर्व त्याच्यावर तुटून पडले. त्याला लाथा-बुक्यांनी मारलं गेलं...

"बास! उदय पुन्हा ओरडला.

तसे सगळे थांबले. उदय चालत जाऊन जगदीश जवळ बसला. त्याने पुन्हा केस धरून जगदीशची मान उंचावली. जगदीश असह्य वेदनेने कळवळत होता.

"त्रास होणार नाही सांगून पण असं का केलं असं वाटलं असंल नाय तुला? पन हा त्रास नाय बाळा, याला टेरिट्री मार्क करनं म्हनत्यात! तुझ्या अंगावरच्या या जखमा ओरडून ओरडून हे सांगतील, की तू माझी प्रॉपर्टी आहेस!" जगदीशला आपली मालमत्ता घोषित करून उदयने जगदीशला झटकलं.

उदय उठून उभारला आणि पुन्हा ओरडला,

"फेका याला त्या कोपऱ्यात!"

त्याच्या आदेशावर त्वरित अंमलबजावणी केली गेली. चार मुलांनी जगदीशच्या हातापायाला धरून त्याला फिरकवलं. जगदीश अंधाऱ्या कोपऱ्यात भिंतीला थडकून जमिनीवर कोसळला. आता त्याला ओरडण्याची देखील जाणीव राहिलेली नव्हती, वेदनेने इतकं त्याचं शरीर सुन्न झालं होतं.

दुसऱ्या दिवशी व्यायामासाठी ग्राऊंडवर सगळे जमले होते. उदयच्या ग्रुप मधील मुलांनी ढोल बाहेर आणले होते. त्याच्या ग्रुप मधील दोघे एकएक ढोल घेऊन घेऊन उदय जवळ उभे होते. सर्वजण आपापले ग्रुप पकडून स्टाफची वाट पाहत होते. जगदीश सगळ्यांपासून दूर एकटाच बसून होता. दुसऱ्या एका ग्रुपचा लीडर अश्फाकची नजर जगदीशवर पडली होती. त्याने त्याच्या गँगमधील मुलाला जगदीशकडे जाण्याची खूण केली. तो मुलगा जगदीशच्या

दिशेने निघला. त्याचवेळी उदयच्या ग्रुप मधल्या एका मुलाला हा प्रकार दिसला. त्याने उदयला खुणवून त्या दिशेने बघण्यास सांगलं. उदय त्याच्या ग्रुपमधील एक मुलाकडे असलेली ढोल वाजवायची काठी घेऊन रागाने त्या मुलाकडे गेला व वाटेतच त्याला आडवलं.

"ऐ!! काय?" उदयने भीती दाखवत त्याला विचारलं.

"कुठं काय?" मुलानेही गुर्मीतच त्याला उत्तर दिलं.

इतक्यात हे पहात असलेला अश्फाक तिथं आला. त्याच्या ग्रुपमधील मुलं त्याच्या मागून आली. मग उदयच्या ग्रुप मधली मुलं काही तरी राडा होणार हे समजून घाईने उदयच्या मागे येऊन उभारली.

"काय झालं?" अश्फाक उदयाला साळसूदपणे विचारलं

"तुज्या माणसाला इचार!" उदय रंगमे म्हणाला.

"तेला काय ईचाइयचं? नवीन आलेल्या मुलाची चौकशी कराय चाललाय बिचारा. त्यात काय चुकलं?"

"तुझं काय चाललंय कळत नाय व्हय? लक्षात ठेव त्यो माझा हाय!"

"बिश्शीत टाकलेलं पैशे मालकाचे असतात. त्या बिश्शीचे नाही! समजलं?! पोरा!" अश्फाक उदयला म्हणाला.

"या नियमानं तर मग ते पैशे तुजे पण नाय होत! हे तू समजून घे! बाळा!!!" उदय अश्फाकच्या गालावर मारत म्हणाला.

आणि असं म्हणत उदयने अश्फाकची हनुवटी दाबली. उदयची ही कृती बघून अश्फाकच्या ग्रुप मधील मुलगा उदयला मारण्यासाठी पुढं झाला. अश्फाकने हात आडवा घालून त्याला अडवलं.

"यहाँ तो चाय से ज्यादा केटली गरम है!" उदय गुर्मीत स्मित करत उपहास केला.

उदयच्या ग्रुपमधील मुलं हसले. हे मात्र अश्फाकला सहन झालं नाही. त्याने उदयचा हात बाजूला झटकून त्याच्या हनुवटीवर एक जोराची ठेऊन दिली. आणि मग सगळ्यांची एकच जुंपली.

तेथे येत असलेले सेक्युरिटी गार्ड्स व स्टाफनी हा गोंधळ पाहला व त्या सगळे त्या दिशेने धावले. वॉर्डनने सगळ्यांना मारण्याचे आदेश सिक्युरिटीला दिले. तसे सगळे गार्ड्स मुलांवर तुटून पडले. सगळ्यांना आधी मनसोक्त मारलं गेलं. यात काही गावी ही नसलेल्या व बाजूला बसलेल्या जगदीशला देखील ओढलं गेलं. त्यालाही बेदम मारलं गेलं. आणि मग सगळ्यांना एकमेकांपासून दूर केलं गेलं. अश्फाकला मानगुटीला धरून गार्ड नेत असताना त्याने मागे जगदीशकडे पाहून कुटील स्मित केलं. इतका मार खाऊन देखील त्याला काही फरक पडलेला नव्हता. त्याच्या मग्रूर चेहऱ्यावर ते स्पष्ट दिसतं होतं. पण त्याच्या असं पाहण्याचा अर्थ काय हे जगदीशला मात्र समजला नाही. तो मात्र जमिनीवर पडून राहिला, असह्य वेदनांनी विव्हळत...

रिमांड होमच्या मागील बाजूस जगदीश कपडे धुवत होता. उदयच्या ग्रुप मधील एक मुलगा आणखी भरपूर कपडे घेऊन आला व जगदीशसमोर ते आदळले. जगदीश त्याच्याकडे पाहतच राहिला...

"बघतो काय ये! उदयचा हुकूम आहे!" त्या मुलाने जगदीशवर त्याचाही अधिकार अंकित केला.

आणि तो निघून गेला. जगदीश जळजळीत नजरेनं त्या जाणाऱ्या मुलाकडे पाहत राहिला काही वेळ आणि आवेशाने हातातील कपडे दगडावर आदळू लागला.

जेवणासाठीची रांग. उदय मात्र त्याच्या ग्रुपसह बाजूला उभा होता. तो जगदीशला शोधत होता. लांब कुठं तरी त्याला तो दिसला. जमिनीवरच बसलेला. रिकामं ताट बाजूला पडलेलं. उदयने जवळच्या मुलाला खुणावून त्याला घेऊन येण्यास सांगितलं. मुलगा जगदीशकडे पळाला.

"दादानं बोलवलंय!" तो जगदीशला म्हणाला.

जगदीश काहीच रिस्पॉन्स दिला नाही. मुलाने मागं उदयकडे पाहिलं. उदयने त्याला घेऊन येण्याची खूण केली. मग तो मुलगा जबरदस्ती जगदीशला हाताला धरून उदयकडे घेऊन आला.

"माजला का रं?" उदयनं आवाज चढवत जगदीशला विचारलं.

जगदीश काहीच बोलत नाही.

बोलायचं राहू दे. जा! माज्यासाठी जेवन घिऊन ये!" उदयने जगदीशला हुकूम सोडला.

"ताट दे रे तेला!" उदय दुसऱ्या मुलाला म्हणाला.

हाती ताट असलेल्या मुलाने ते ताट जगदीशसमोर धरले. जगदीशने ते हाती धरले नाही. यामुळे चिडून उदयने ते हिसकावून घेतले आणि जगदीशच्या छातीवर मारून दाबले. जगदीश ताटाला हात लावताच उदयने त्याचा हात मागे घेतला. ताट जगदीशच्या हाती राहील.

"निघ!" उदयनं फर्मान सोडलं.

जगदीश उदयवरची नजर स्थिर ठेऊन वळला. डोळ्यांत तीच आग. तो रांगेकडे पाहून चालू लागला व जाऊन तो सर्वांत मागे उभारला. हे पाहून उदयने त्याला हाक मारली.

"ऐ मौनी बाबा! पुढं. पुढं!" उदय ओरडला.

जगदीश मागे न पाहताच रांगेत सगळ्यांत पुढं गेला व त्याने वाढणाऱ्या मुलासमोर ताट धरले. पण त्याच्या आधी असलेला मुलाने त्याला ढकलून खाली पाडलं. जगदीश परत उदयकडे आला.

"अशानं मी उपाशी मरनं की लेका!" उदय जगदीशला चिडवण्यासाठी चिडून बोलला.

"मग?" सोबतच्या मुलाने कडी घालत विचारलं.

"मग काय? लक्षात घे! जर सत्ता तुमची आसल, तर तितं काय पन करा कोन ईचारारं?" हसून जगदीशकडे पाहतच उदय त्या मुलाला बोलला व मग जगदीशला बोलला,

"एक काम कर! वाढणाऱ्या मुलाला मार. जा! जेवनच आपल्या हातात असंल, तर..."

जगदीश जागचा हलला नाही. उदयने त्याला ढकलले,

"जा!!!"

"जगदीशचा तोल गेला. तो मागे ढकलला गेला. स्वतःला सावरत तो मागे वळला व पुन्हा रांगेकडे चालत गेला.

पुन्हा रांगेजवळ... जगदीश भाताने भरलेलं पातेलं उचलू लागतो. जेवण वाढणारा व घेणारा दोघांनीही हातातील पात्रे खाली ठेऊन जगदीशला मागे ढकलले व काहीजण त्याला मारण्यास पुढं सरसावले.

हे पाहून उदयच्या ग्रुप मधील एक मुलगा उदयला म्हणाला,

"हा जिंकणार आहे का बॉस?"

उदय खळखळून हसला. जगदीशला मार खाताना पाहत राहिला...

एका रात्री काही कल्पना नसताना अचानकच, एक सिक्युरिटी गार्ड येऊन कोपऱ्यात थंडीने कुडकुडत पडलेल्या जगदीशला खेचून घेऊन गेला. खोलीतील सगळे हे पाहत होतेच. हे पाहून एकजण गोंधळला देखील. त्यानं उदयकडे जाऊन त्याच्या कानात विचारलं,

"बॉस, कुठं?"

उदयने हसून विचित्र खूण केली आणि त्या मुलाचं शंका निरसन केलं. मुलगा काय समजायचं ते समजून गेला.

सिक्युरिटी गार्डने वॉर्डनच्या केबिनपर्यंत जगदीशला खेचत आणले.

केबिनमध्ये जगदीशला वॉर्डनच्या समोर उभा केलं गेलं.

"साहेब नवीन पोरगा!" गार्ड वॉर्डनला म्हणाला.

"पॅन्ट काढ!" वॉर्डनचा जगदीशला अनपेक्षित हुकूम!

जगदीशला कानावर विश्वास बसला नाही. तो वॉर्डनकडे पाहतच राहिला.

"काय म्हणतायत साहेब! ऐकलं नाही का?" गार्डने जगदीशला पुढं ढकलले.

तरी जगदीश तसाच उभा राहिला. वॉर्डनला त्याचं न ऐकणं सहन झालं नाही. त्याने जगदीशच्या कानशिलात मारली. जगदीश लांब भिरकावला गेला. त्याची शुद्ध हरपू लागली. आपल्या सोबत काय होतंय याची पुसटशी जाणीव त्याला राहिली फक्त. अंधुक दिसू लागलं. हलकंसं ऐकू येऊ लागलं...

गार्ड कडून जगदीशला उचलून टेबलवर वाकवलं गेलं... गार्ड बाजूला सरकला. वॉर्डन जगदीशच्या मागे येऊन उभारला.

जगदीशचा वेदनेने ओरडण्याचा आवाज खोलीभर घुमू लागला... एक क्षणाला असह्य होऊन मग जगदीशचा आवाज हळूहळू शांत होत गेला...

"हा क्लाएन्टकडं पण असंच वागला तर अवघड होईल. कोकेन द्या आणि पाठवा याला!" वॉर्डन बेल्टचे बक्कल लावत गार्डला बोलला.

"जी साहेब." गार्डने पडत्या फळाची आज्ञा मान्य केली.

इथं टेबलवर आडवा असलेल्या जगदीशचा चेहरा घामाने थबथबला होता. त्याचे डोळे धड बंद होत नव्हते, ना त्याला ते उघडे ठेवता येत होते. तो सहन न होणाऱ्या वेदनांनी अत्यंत थकलेला होता. गार्डने त्याला पॅन्ट चढवल्याचं आपल्याला जाणवलं मात्र...

मग गार्ड त्याला ओढत  तेथून घेऊन गेला...

जगदीशला एका रूममध्ये आणलं गेलं. गार्डने त्याला एका कॉटवर भिरकावून दिलं. जगदीश अजूनही अर्ध-शुद्ध अवस्थेतच होता. ड्रॉव्हरमधून सिरेंज आणि व्हाईल काढून गार्डने जगदीशला कोकेनचा हेवी डॉस दिला. त्याचे पाय बांधले. हात देखील मागील बाजूस बांधले व बांधलेले हात धरून पुन्हा त्याला फरफटत बाहेर घेऊन गेला... गार्डने त्याला असा धरलेला होता, की जगदीश हवेत अधांतरी होता व त्याचे पाय जमिनीला घासत होते...

रिमांड होमबाहेर, स्ट्रीट लाईट्सचा प्रकाश. गार्डने जगदीशला बाहेर आणून त्याला गाडीत मागील सीटवर फेकला व गाडी चालवू लागला...

जगदीश मागच्या सीटवर पडलेला. गार्ड ड्राइव्ह करत आपल्याला कोठेतरी घेऊन जातोय हे त्याच्या लक्षात येतं... पण यातून सुटण्याचा काही करण्यासाठी तो तितक्या शुद्धीत नाही...

गार्डची गाडी एका अनोळखी बगल्या बाहेर येऊन थांबली. गार्ड जगदीशला ओढत बंगल्यात शिरला व स्टेअरकेसवरून वर एका खोलीत घेऊन गेला...

एक स्थूल, बनियान घातलेली, फक्त टॉवेल गुंडाळला आहे असा माणूस आधीपासून त्या बेडरूममध्ये होता. गार्डने जगदीशला बेडवर फेकून दिलं. जगदीश पालथा पडला. त्याने बेशुद्धावस्थेत सुद्धा मागे काय चाललंय हे पाहण्याचा प्रयत्न केला. तेव्हा जगदीशने गार्डला त्या माणसाकडून पैशांचे बंडल घेताना पाहिले. गार्ड गेला व तो माणूस जगदीशकडे चालत आला आणि जगदीशचे डोळे मिटले... इतकावेळ शुद्धीत राहण्याचा प्रयत्न करणाऱ्या जगदीशच्या मेंदूने कोकेनच्या गुंगीसमोर गुडघे टेकले होते...

पहाटे कधी तरी जगदीशला पुन्हा आणून त्याच्या खोलीत टाकले. जागे असलेले काही जण त्याच्याकडे पाहत होते. जगदीश असहनीय वेदनांमुळे थंड जमिनीवर तसाच पडून होता.

"चला आपली नवी सोय झाली..." अर्धवट शुद्धीत असलेल्या जगदीशच्या कुणीतरी हे म्हटलेलं कानावर पडलं.

त्याच सोबत इतरांचा हसण्याचा आवाज... त्याच्या कानात खुमु लागला...

ज्यूवेनाईल होममधील एक मोठा हॉल, बरीचशी मुलं तिथं जमली होती. आपापल्या ग्रुपमध्ये विभागलेली. त्यांतील २ मोठे ग्रुप. उदय व अश्फाक व त्यांचे पंटर त्याच्या आजूबाजूला. नेहमी सारखा जगदीश मात्र दूर बसून. उदयने त्याच्या ग्रुप मधील एकाला खूणावले. त्या मुलाने जाऊन हॉलला कडी लावली व पुन्हा उदयकडे आला.

"माझ्याकडनं इस्माईल लढंल!" अश्फाकने जाहीर केलं.

"माझ्याकडनं त्यो!" उदय जगडीशकडे बोट केलं.

यामुळे उदयकडील एक मुलगा चिंतीत झाला

"बॉस! त्यो कसा? त्यो तर लगेच हारंल..." तो चिंतेने उदयच्या कानात फुसफूसला.

हे ऐकून उदयच्या चेहऱ्यावर हसू उमटतं. उदयची भेदक नजर अश्फाकच्या तितक्याच भेदक नजरेला भिडत होती. त्याच्याकडे न बघताच उदय ने हात उंचावून त्या मुलाला गप्प होण्यास सांगितलं. तो मुलगा घाबरून मागे सरकला.

"माझ्याकडनं हाच लढंल!" उदयने आपला फायनल डिसीजन डिक्लेअर केला.

उदयचा अंतिम निर्णय ऐकून त्याच्या ग्रुप मधील दोन मुलं जगदीशला उचलून जमावापाशी घेऊन आली. त्याला इस्माईलसमोर उभा केला गेला. बाकी सगळे मागे सरकले. दोन्ही बाजूला दोन मोठे गट पडले. डाव्या बाजूला अश्फाक खुर्चीत राजाच्या थाटात बसला, तर उजव्या बाजूला उदय खुर्चीच्या हातावर पाय टाकून अस्ताव्यस्त बसला. यातून आपण कसे सर्वश्रेष्ठ आहोत हे दर्शवण्याचा त्याचा विचार असल्याचं दिसत होतं. अश्फाक व उदय यांनी आपापले दाव लावले. काही ड्रग्सची पाकीटं, पैसे दोघांकडून मध्ये टाकले गेले.

या सर्वांमध्ये जगदीश व इस्माईल उभे. इस्माईल तब्येतीने जगदीशपेक्षा बराच हट्टाकट्टा. तो जगदीशला अगदीच मारू लागला. हे पाहून इतर मुलांमध्ये देखील बेटिंग चालू झालं. २-३ मुलं त्यांच्याकडून पैसे, ड्रग्स गोळा करू लागले.

जगदीशला मार खाताना पाहत असताना उदयच्या चेहऱ्यावर विजयाचं स्मित होतं. त्याने मघाशी त्याच्या कानात कुजबुजणाऱ्या मुलाला जवळ बोलावलं. मुलगा थोडा दबकतच त्याच्याकडे सरकला. थोडं खाली वाकला. उदयने त्याला मानेला धरून कवटाळले व बोलला...

"सगळ्याच लढाया ह्या जिंकन्यासाठी खेळायच्या नस्त्यात. जिंकनं हा माजा उद्देश नाय आत्ता. त्या पोराला कळलं पायजे, की इतं ह्र्यायचं आसं‌ल, तर तेला माज्या खाली रहाय लागंल. म्हनून हे! कळलं?" मग्रुरीने हसत उदय त्याला म्हणाला.

व उदयने त्या मुलाच्या डोक्यात टपली मारली आणि त्याला बाजूला भिरकावलं. समोर पाहिलं. जगदीश मार खातच होता... त्याच्या सुजलेल्या तोंडातून रक्त वाहत होतं...

टॉयलेट एरिया, एक मुलगा जगदीशला ओढत घेऊन आला व त्यानं त्याला भिरकावून दिलं.

"हे सगळं साफ करायचं!" त्यानं हुकूम सोडला.

जगदीश फक्त त्याच्याकडं पाहत उभा राहिला. त्याच्या अशा पाहण्यानं त्या मुलाच्या डोक्यात राग गेला. त्याने जगदीशचे जबडे जोरात दाबले.

"बघतो काय ये! त्या उदयचं बरोबर ऐकतोस! माझं ऐकाय आई मरत्या व्हय तुझी?!" तो म्हणाला.

जगदीशने काहीच प्रतिक्रिया दिली नाही. जणू त्याला काही फरकच पडला नाहीये.

"बघतो काय ये! डोळं खाली कर!" मुलगा अधिकच चिडला.

जगदीशने नजर खाली झुकवली नाही. म्हणून मग त्या मुलाने जगदीशचे तोंड पाण्याने भरल्या बॅरेलमध्ये बुडवले. जगदीश तडफडू लागला. थोडावेळ त्याला तसाच ठेऊन त्या मुलगा

जगदीशचे तोंड बाहेर काढले. गुडमरलेला जगदीश ठसकत खाली कोसळू लागला. त्या मुलाने त्याला पडू न देता उभाच ठेवला.

"आत्ता गप्प सांगितलेलं ऐकायचं! नाही तर मेलाच म्हणून समज! एक खून करून आलोय! दूसरा केला तरी तीच शिक्षा!" त्याने जगदीशला दरडावले.

आणि जगदीशला ढकलून तो निघून गेला. भिजलेला जगदीश भिंतीला थडकला. स्वतःला सावरत त्याने टॉयलेटकडे नजर टाकली...

.

.

.

जगदीश कपडे धुवत होता. त्याचं शरीर थोडं पुष्ट झालं होतं. अश्फाक तिथं आला.

"नांव काय?" अश्फाकने विचारलं.

जगदीशने अजूनही त्याचं मौन सोडलं नव्हतं. तो काहीच बोलला नाही.

"वर्षाच्या वर झालं, पण तू बोलायचं काय चालू नाय केलं... ठिकाय! प्रॉब्लेम नाय! वर्षात ७६ मुलं इथं आल्यात त्यातली निम्याहून जास्त माज्याकडं हायत. मला गरज पन नाय तुजी! पन एक काम हुतं. करणार काय?" अश्फाक त्याला पुढं म्हणाला.

जगदीश काही न बोलता आपल्या कामात व्यस्त होता.

"पैशे मिळतील!" अश्फाकने लालूच दाखवली.

पण जगदीश बदला नाही. काही बोलला नाही.

"इचार कर आनी सांग!" एव्हढंच सांगून मग कोणी पाहण्याच्या आत अश्फाक निघून गेला.

जगदीश धुतलेल्या कपड्यांची बादल्या घेऊन टेरेसवर गेला. मागून चिडलेला उदय घाईने त्याच्याकडे आला. त्याने जगदीशला भिंतीवर ढकलले. जगदीशच्या हातातील बादल्या खाली पडल्या. पुढं होऊन उदयने जगदीशची कॉलर पकडली.

"माजला का रं? काय गरज हुती त्याच्याशी बोलायची? काय म्हणत हुता त्यो?" उदय आग ओकत होता.

पण जगदीश उदयच्या डोळ्यांत पाहत गप्पच.

"सांगणार नसलास तरी मला म्हाइत हाय! खबरदार त्याला मदत करशील तर! नाय तर!"

म्हणत उदयने जगदीशला टेरेसच्या कठड्याच्या दिशेने जोरात वळवलं. जगदीशला खाली ढकलून देण्याच्या पवित्र्यात थोडावेळ त्याला तसाच धरला, पण अचानक उदयला काही तरी सुचलं. रागाने लाल झालेला त्याचा चेहरा हास्याने भरला.

"त्याच्यासाठी जे करणार हुतास, ते आता माज्यासाटी करशील!" उदय म्हणाला.

आणि पुन्हा त्याने जगदीशला भिंतीवर भिरकावले.

सगळे झोपल्यावर उदय जगदीशपाशी आला. जगदीश डोळे मिटून पडला होता. उदयने त्याला लाथाडून हलवले. जगदीश उठून बसला. वर पाहिलं. उदयने त्याला उभारण्यास सांगितलं. जगदीश उभारला. उदय रूम अनलॉक करून त्याला रूममधून बाहेर घेऊन गेला.

उदय जगदीशला खेचत मोकळ्या मैदानात घेऊन आला व शर्टच्या आतील बाजूस ठेवलेलं एक पॅकेज काढून त्याने जगदीशला ते घेण्यास भाग पाडलं.

"बाहेर एक माणूस उभा असंल. तेला न्हिऊन हे द्यायचं. आणि त्यो एक पाकीट दिल ते घिऊन यायचं! समजलं?" उदयने दबक्या आवाजात जगदीशला सूचना दिली.

जगदीश जाऊ लागला.

"एक मिनिट!"उदयने जगदीशला थांबवलं.

जगदीश मागे वळला. उदयने जगदीशचा शर्ट काढून घेतला.

"पळून जान्याचा अजिबात प्रयत्न करू नको! कारन जर तसं केलंस, तर ह्यो शर्ट वॉर्डनकडं जाईल आणि त्याची कुत्री तुला फक्त हुडकनारच न्हाईत, तर फाडून टाकतील!" उदयने जगदीशचा पळून जाण्याचा मार्ग बंद केला.

पण जगदीशला तरी पळून जायचं होतं का? नक्कीच नाही! तरी उदयनेसावधगिरी बाळगली होती.

उदयने जगदीशला कम्पाऊंडच्या भिंतीकडे ढकलले. जगदीश मागे त्याच्याकडे पाहत हळूहळू भिंतीकडे पावलं टाकू लागला. उदयने खिशातून एक छोटं प्लास्टिक पॅकिंग व

मोबाईल बाहेर काढला. त्यानं पॅकिंग फोडून त्यातील ड्रग चाखलं. जगदीश त्याला पाहतोय हे त्याच्या लक्षात आलं.

"बघतो काय ये! निघ!" त्याने जगदीशला दरडावलं.

उदयने संपलेली पुडी खिशात ठेऊन मोबाईल काढला व कोणाला तरी कॉल केला. जगदीश पुढं पाहून भिंतीवर चढला.

जगदीशने खाली उडी मारली. आणि तो मोकळ्या रस्त्यावर आला. आता त्याला रान मोकळं होतं उधळण्यासाठी. पण ते तो नक्कीच करणार नव्हता. अचानक गाडीचा आवाज आला. जगदीश थोडा सावध होऊन गाडी जाताना पाहत भिंतीलगद उभारला. गार्ड गाडी घेऊन जात होता. जगदीशने दुःखी होऊन खाली पाहिलं. आज आणखी कोणाला तरी घेऊन जात असल्याचं त्याच्या लक्षात आल्याशिवाय राहिलं नाही.

पण काही क्षणातच त्याला त्याच्या कामाची जाणीव झाली आणि त्यानं वर पाहिलं. झाडीतून एक माणूस समोर येऊन थांबला. त्याने फ्लॅशलाईट जगदीशच्या अंगावर पाडून जगदीशला इशारा केला. जगदीश सावधपणे इकडे तिकडे पाहत त्याच्याकडे आला. जगदीशने त्याच्याकडील पॅकेज त्या माणसाला हँडओव्हर केलं. त्या माणसाने पण हुडी जॅकेटच्या आतील एक पॅकेज काढून जगदीशला दिलं व निघून गेला. जगदीश मागे फिरला. तो रस्ता क्रॉस करत असताना एका गार्डने त्याला पाहिलं व पळत त्याच्याकडे आला. जगदीशने कुठेही जाण्याचा पेआयत्न केला नाही. तो वाटेतच उभा राहिला. जगदीशच्या हातातलं पॅकेज बघून गार्डचे एक्स्प्रेशन्स बदलले. त्याने ते पेपर गुंडालेलं पॅकेज हिसकावून घेऊन इम्पेशट्ली खोलले. त्यात पैसे होते. हे पाहून तर गार्ड अधिकच चिडला. जगदीशचं बखोटं धरून त्याला आत नेलं गेलं...

वॉर्डनच्या खोली बाहेर, गार्ड जगदीशला ओढत घेऊन आला. त्याने दारावर नॉक केलं. थोड्यावेळाने वॉर्डनने दार उघडले.

"काय आहे?" वॉर्डनने रागावून विचारलं.

गार्डने हातातलं पॅकेज दाखवलं, ज्यातून पैसे बाहेर दिसत होते. वॉर्डन आत झाला. हा गार्डला जगदीशला आत आणण्यासाठीचा संकेत. तो समजून गार्डने जगदीशला आत आणून आदळले व पॅकेज वॉर्डनच्या हाती दिलं.

"काय आहे हे?" वॉर्डनने जगदीशच्या पाठीवर पाय रुतवत विचारलं.

जगदीश विव्हळला, पण काही बोलत मात्र नाही.

"ठिकाय! याच्या इन्मेटला घेऊन ये!" वॉर्डनने गार्डला हुकूम सोडला.

गार्ड उदयला घेऊन येईपर्यंत वॉर्डन जगदीशला चिरडत उभारला. काहीवेळाने गार्ड उदयला घेऊन आला व त्याला वॉर्डन समोर फेकलं.

"या सरकार या! ड्रग पोहोचवायचे होते ते पोहोचवले?" वॉर्डनने संतापाने उदयला विचारलं.

"ह... होय सर..." उदय घाबरत बोलला.

"काय याला त्या कामाला पाठवला होतास?" वॉर्डनने चौकशी केली.

"नाय नाय सर... मी स्वतः गेल्तो. सकाळीच पॅकेज पोचवून आलोय." उदयने जगदीशकडे पाहिलं व घाबरत बोलला.

वॉर्डनने जगदीशवरचा पाय उचलून त्याच पायाने उदयच्या गालावर लाथ मारली.

"मग ह्यो राच्चा भाहीर काय करत हुता?!" वॉर्डन आपल्या राक्षसी अवतारात येत म्हणाला.

वॉर्डनच्या लथ्था प्रहाराने उदय बाजूला फिरकावला गेला. वॉर्डनने पुढं होऊन त्याचे केस जोरात ओढले.

"पैशे पण सापडलेत त्याच्याकडं!" वॉर्डन ओरडला.

"मला म्हाइत नाय सर... यानं सकाळी त्यातलं थोडं ड्रग चोरलं आसंल..." उदयने विव्हळत, ओरडत खोटं स्पष्टीकरण दिलं.

उदयचे केस जोरात खेचून वॉर्डनने दाणकन उदयचं तोंड जमिनीवर आदळलं.

"हा चोरी करोस्तोवर तू काय करत होतास?" वॉर्डन ओरडला.

उदयच्या नाका-तोंडतून रक्त वाहू लागतं. त्याचे दात खिळखिळे झाले. मग वॉर्डन जगदीशकडे वळला. त्याने त्याला केसाला धरून उठवला व टेबलवर भिरकावले. टेबलवरील त्याची काठी घेऊन वॉर्डन जगदीशला आवेशाने बेदम मारू लागला...

"चोरी करू वाटतंय? चोर्... चोरी करू वाटतंय?..." मारत वॉर्डन ओरडत होता.

गार्ड दोघांना घेऊन त्यांच्या रूमकडे आला व त्यांना खोलीत पटकले. गार्ड गेल्यावर... तोंड सुजलेला व नाकातून, तोंडातून रक्त वाहत असलेला उदय जगदीशकडे आला. त्यानं त्याचं तोंड दोन्ही हातांनी जोरात दाबून त्याला उठवलं.

"दोन वर्ष त्याचं ड्रग चोरून विकतोय! त्याला कळला नव्हता! साल्या तुझ्यामुळं! तुझ्यामुळं कळलं त्याला! तुझ्यामुळं... तुझ्यामुळं कळलं... तुझ्यामुळं..." उदय रागाने पण दबक्या आवाजात ओरडत होता, पण तरी तरी त्याचा आवेश खूप होता.

"तुझ्यामुळं... तुझ्यामुळं..." असं वारंवार म्हणत उदयने जगदीशचं डोकं मागे भिंतीवर आदळू लागला. यातच जगदीशने आपली शुद्ध हरपली...

.

.

.

एका हॉटेल रूममध्ये, अंधुकसा उजेड. जगदीश बेडला मागे टेकून बसला होता. चेहऱ्यावर काहीच भाव नव्हते. अंगाने आता पहिल्यापेक्षा खूपच धष्टपुस्ट झाला होता. कुठे तरी हरवल्यासारखा तो बसून होता. एक मध्यमवयीन स्त्री बाथरूममधून बाहेर आली. चेहऱ्यावरून श्रीमंत घरातली आहे हे सहज कळतं होतं.

"सिरेंज!" ती स्त्री बेडकडे येत जगदीशला म्हणाली.

तिचा आवाज कणभर पडताच जगदीश भानावर येत ड्रॉव्हरकडे वळला. त्याने सिरेंज व व्हाईल काढले. त्यावेळी टेबलवर पडलेल्या पेपरवर त्याची नजर पडली व पहिल्या पानावरील बातमीने त्याचं लक्ष वेधून घेतलं. त्यानं पेपर देखील घेतला. जवळ येऊन बसलेल्या स्त्रीला व्हाईल व सिरेंज देत तो बातमी वाचू लागला...

**मराठी बातमीपत्र - हेड लाईन -** "दोन वर्षांपूर्वी कोल्हापूर येथे झालेल्या बॉम्बस्फोट मालिकांचा सूत्रधार तनय राजमाने याची जेलमध्ये आत्महत्या!" आणि याबद्दल सविस्तर बातमी छापून आली होती.

जगदीशने पूर्ण बातमी वाचण्यासाठी हाफ फोल्डेड् पेपर फुल पेज उघडला. त्या बातमी खाली "सायबर क्राईम" संदर्भात बातमी त्याला दिसली. त्यात गुन्हेगार सापडला नसल्याचा उल्लेख होता. त्याने ती बातमी देखील इतित: वाचून काढली.

"लाईट्स!" ती बाई वैतागून ओरडली.

आणि मग जगदीशने लाईट्स विझवले.

लढण्यासाठी पुन्हा जगदीशला रिंगणात उभं केलं गेलं. जगदीशचं शरीर आता भलतंच धष्टपुष्ट दिसत होतं. अश्फाक कडून एकजण उतरवला गेला. दिसायला जगदीशच्या तोडीस तोड.

"तर आज हा पट्टया लढंल!" उदय अनाऊन्स केलं.

"दोन वर्ष फुकटचं खाऊन माजलाय म्हणून हा जिंकल असं वाटतंय व्हय?" म्हणत अश्फाक हसला.

"माझा नवीन गडी पैलवान हाय! तुझ्या माणसाची मुंडी मुरगाळतोय का नाय बघ!" तो म्हणाला.

"बघू!" उदय विश्वासानं उद्गारला.

हे ऐकून नवीन आलेला उदयकडील एक मुलगा उदयकडे सरकला. दिसायला सॉफीस्टीकेटेड घरातला...

"एज पर माय ओपिनियन, यु शुड नॉट सेंड हिम टू फाईट... इट्स हायली पोसीबील दॅट ही विल लूज..." त्या मुलाने आपला तर्क उदयला ऐकवला.

"ऐ इंग्लिश मिडीयम, समजल असं मराटी बोल!" उदय त्याला थोडं रागाने म्हणाला.

"हा हरण्याचे चान्सेस खूप आहेत." नवीन मुलगा संक्षेपित बोलला.

"तू उतरतो का मग? अं? उतरतो का?" हा बापाला शिकवालाय या अविभावत उदय त्या मुलावर डाफरला.

मुलगा भिऊन गप्प झाला. उदयने त्याच्या मानगुटीला पकडले व त्याला मध्ये ढकलले,

"जा उतर!" उदय ओरडला.

"तू असा मानुस बदलू शकत नाहीस!" अश्फाक कडील एका मुलाने आपला विरोध दर्शविला.

पण अश्फाक मात्र हसत होता. त्याने त्या मुलाला गप्प होण्यासाठी हात उंचावला.

"शाऱ्या... अरे आपल्यालाच बरं आहे! आपले जिकण्याचं चान्स वाढत्यात!" त्याने आपला तर्क त्या मुलाला बोलून दाखवला.

आणि दाव लावला. पैसे व ड्रग्स मध्ये फेकले. उदयनेही दाव लावला. पैलवान नवीन मुलाला मारू लागला. तो बेशुद्ध झाल्यावर मग पैलवान जगदीशच्या दिशेनं आला, जो अजून तेथेच खाली पाहत थोडं मागे उभा होता. पैलवान आपल्याकडे येतोय हे जाणवून जगदीशने धावत जाऊन पैलवनावर उडी घेतली व एकच वार करून त्याला निपचित केले. जगदीशने

खाली उडी मारली. त्याच्या सोबत पैलवान देखील जमिनीवर लँड झाला, पण पूर्णपणे आडवा. सगळेच अवाक् झाले. सगळेच शांत!

उदयचं वेड्यासारखं हसू ती शांतता भंग करते. त्याच्या चेहऱ्यावर जिंकल्याचा आनंद ओसंडत होता. पण त्याचं हे हसू जास्त काळ टिकून राहिलं नाही. जगदीश त्याच्याकडे वळला आणि त्याच्या खांद्यांवर उडी घेतली. डोक्यात वार करून त्याचं डोकं मागं जमिनीवर जोरात आदळलं व रोल होऊन तो उभा राहिला. उदयचं डोकं जमिनीवर आदळून डोक्यातून व कानातून रक्त वाहू लागलं. उदयच्या डाव्या-उजव्या बाजूला अश्फाक पर्यंत अर्धगोल करून उभी असलेली मुलं आश्चर्याने स्तब्ध होऊन पाहत होते. अश्फाक देखील चकित. सगळेच घाबरले होते. काही काळ स्तब्धता, पण मग उदयच्या टीम मधील मुलं सावरून जगदीशवर तुटून पडली. जगदीश सगळ्यांना मारण्यात व्यस्त झाला. हे पाहून अश्फाक मात्र मोठ्याने हसत या सगळ्याचा असुरी आनंद घेत होता. आणि इकडं २ वर्षांचा पूर्ण हिशोब जगदीश सगळ्यांकडून घेत होता. यातच मग दुसऱ्या ग्रुप मधली मुलं पण अश्फाक च्या इशावरून त्यात सामील होऊन उदयच्या ग्रुपवर तुटून पडली. काही जण जगदीशला मारायलाही सरसावले. आणि हीच त्यांची मोठी चूक ठरली. जगदीश त्यांच्याशी देखील लढू लागतो. आणि मग तो अश्फाककडे देखील वळला. त्याच्या छातीवर जोरदार लाथ मारून जगदीशनं खुर्चीसह त्याला खाली पाडलं. दोघांमध्ये जोराची जुंपली... इतर मुलं देखील एकमेकांना मारत होतीच. यात कित्येक जखमी, तर कित्येक मृत झाले. जगदीश पण अश्फाकला देखील ठार केलं!

हा गोंधळ ऐकून आतून बंद केलेलं दार बाहेरून तोडून गार्ड्स आत आले व तेही मुलांवर तुटून पडले. जगदीशने आलेल्या गार्ड्सची देखील गई केली नाही व त्यांना देखील वेड्यासारखे मारले. जगदीशने मारलेल्या एका गार्डच्या हातून त्याचा दंडुका खाली पडू लागला.

तो आवाज गाडीत अस्वस्थ पडलेल्या सुमेधच्या कानात घुमला आणि गाडी बंद झाल्याचा आवाज त्यात मिश्रित झाला. आणि हा आवाज सुमेधला वर्तमानात आणण्यास पुरेसा ठरला.

हाती गन असलेला, डोळे मिटून पडलेला सुमेध गाडी बंद झालेल्या झटक्याने शुद्धीत आल्यासारखा झाला. कपाळावर आठ्या आणत त्याने हळूहळू डोळे उघडले. तो सावरत उठला. दार उघडून गाडीबाहेर पडला.

सुमेधने गाडीचं दार बंद केलं व स्वतःचा तोल सावरत तो विनयच्या घराकडे चालत गेला. दरवाजा उघडून तो घरात प्रवेशकर्ता झाला.

पॅसेजवे मधून सुमेध विनयच्या खोलीकडे चालत होता. समोर विनयच्या बेडरूमचा बंद दरवाजा दिसत होता.

दरम्यान रिमांड होम/बालसुधार गृहातील त्याच्या शेवटची फाईट त्याच्या नजरेसमोर त्याला फ्लॅश होत होती. समोर येईल त्याला तो ठार करत होता. खाली बरेच जण जखमी होऊन, मरून पडले होते. हे चित्र पाहतच सुमेध विनयच्या खोलीपर्यंत पोहोचेपर्यंत पोहोचला.

शेवटच्या मेमरी फ्लॅशमध्ये, तो वॉर्डनला जबड्यावर एक पंच करून हॉलबाहेर पळून गेलेला त्याला आठवला. जाता-जाता मागे न वळता दार जोरात ओढले. दार मोठा आवाज करत बंद झालं.

इथे गनच्या बटने सुमेधने विनयच्या बेडरूमचा दरवाजा ठोठावला.

"उघडं आहे!" विनय आतून ओरडला.

उजव्या हाताने दाराचे नॉब फिरवून सुमेधने दरवाजा खोलला व आत प्रवेशला.

बेडरूममध्ये विनय ड्रिंक्स घेत बसला होता. सुमेध गन त्याच्यावर रोखून त्याच्याकडे चालत गेला. थोड्यावेळासाठी भीतीचे भाव विनयच्या चेहऱ्यावर उमटले. तोंडापर्यंत जाणारा ग्लास मध्येच थांबला होता. सुमेध त्याच्याकडे गेला व बाजूच्या खुर्चीवर बसला. गन खाली करून त्याने टी-पॉयवर ठेवली. हे पाहीन विनयने सुटकेचा निःश्वास सोडला.

"मिशन अकम्प्लिश्ड्!" विनय स्ट्रेट चेहऱ्याने भावनारहित म्हणाला.

हे ऐकताच विनयने चेहऱ्यावर आनंद आणत भीतीने सुखलेला घसा दारू पिऊन ओला करून घेतला.

"शेवटी तू तुझं ध्येय पूर्ण केलंसच!" उदय ग्लास खाली करत हर्षित होत म्हणाला.

सुमेधने खाली पाहत होकारार्थी मान डोलावली. जणू त्याच्यावर कसलंसं ओझं होतं. उदयने त्याच्या खांद्यावर हात ठेवला.

"बी काल्म् अँड चिल..." उदयने त्याला धीर दिला.

थोडावेळ गेल्यावर सुमेध सावरतोय हे लक्षात येऊन उदय मागे रेलून बसला. म्हणाला,

"मला आत्ता तो दिवस आठवतोय. ज्यावेळी तू पहिल्यांदा माझ्याकडं आला होतास. अशीच रात्र होती... असाच तू इथं याच ठिकाणी बसलेला... आणि मी या ठिकाणी..."

आठ वर्षांपूर्वी रिमांड होम मधीन पळून जगदीश थेट विनयच्या घरी आला होता. शरीरावर असंख्य जखमा होत्या. रिमांड होम मधील जगदीशच्या अंगात असलेले कपडे तेथे

माइमारी केल्याने फाटले होते. त्याचा तसा अवतार बघून तो धोका आहे असं समजून त्याला मारण्यासाठी विनयचे लोक पुढं सरसावले होते. विनयच्या माणसांसोबत जगदीशने हाणामारी चालू केली. त्यांच्याशी लढत तो घरात शिरला.

घरात, विनयचा एक माणूस लांब दांडा असलेला हातोडा घेऊन जगदीशवर धावून आला. जगदीशने त्याचा हतोड्याचा वार हवेतच थांबत त्याला ठार केले. खाली पडणारा हतोडा अधांतरीच झेलला होता. माणूस खाली पडून गतप्राण झाला. थोडावेळ सर्व गप्प. जगदीशने डोळे मिटून घेतो. आणि जेव्हा डोळे उघडले, तेव्हा त्याची नजर अजून दाहक व भेदक झाली होती. त्याने हातोड्याने उरलेल्या चार - सहा माणसांना चेचून काढले.

मग जगदीशने हतोडा खाली घेतला. सगळे खाली विखुरले होते. त्यांच्या रक्तात जगदीश न्हाऊन गेला होता, नजर समोर खिशात शांतपणे हात घालून उभ्या विनयकडे पाहत. विनय देखील कमालीचा थंड; जणू समोर जे झालंय त्याचा त्याला काहीच फरक पडलेला नव्हता. हातोडा जमिनीला टेकवला...

विनयची बेडरूम, जगदीशने हतोडा जमिनीवर टेकवला. त्या रात्रीच्या शांत वातावरणात, त्याचा ***खण्ण...!*** असा आवाज झाला. तीच खोली... विनयच्या डाव्या बाजूस रक्तस्नान केलेला जगदीश बसला होता! हतोडा सोबतच सोफ्याला उभा करून ठेवलाय. त्यावरून ओघळणारं रक्त जमिनीवर पसरत चाललं होतं...

"दोन वर्षं कुठं होतास?" एकदम स्ट्रेट फेसने विनयने जगदीशला विचारलं.

"रिमांड होम! स्वतःला ट्रेन करत होतो!" जगदीशने ही त्याच स्ट्रेट फेसने उत्तर दिलं.

"मग काय मला माराय आलायंस?" विनयने परत प्रश्न केला.

"डील करायला!" जगदीशने स्पष्ट केलं.

"कसली डील?" वियनने शांतपणे विचारलं.

"अवस्यु आपटे! त्याला मारायचाय!" सतरा वर्षांच्या जगदीशने आपला निर्णय सुनावला.

"आणि तुला वाटतं मला तुझ्या मदतीची गरज आहे?!" विनयने जगदीशची चेष्टा करण्यासाठी हसत त्याला विचारलं.

पण जगदीशला त्याच्या मस्करीचा काहीच फरक पडला नाही. तो तितक्याच निर्धाराने म्हणाला,

"माहीत नाही! पण मला तुमची गरज आहे!"

"म्हणजे?" विनयने विचारलं.

"शरीराची मशागत झाली, आता बुद्धीची करायची आहे!" जगदीश बोलला.

"माझ्याकडून काय हवंय?" विनय आता गंभीर झाला होता. पण जगदीशचा निर्धार त्याला अजून स्पष्ट झाला नव्हता, तो व्हावा म्हणा त्याने प्रश्न केला.

"शिक्षण! आणि संरक्षण!" जगदीशने चित्र स्पष्ट केले.

"मी तुझ्यात इन्व्हेस्ट का करावं? काय मिळेल मला?" विनयने शंकित होत आणि जगदीशला तुच्छ भाव देत विचारलं.

"अवस्युचा मृत्यू! तुमचे हात न बरबटता!" या वाक्याने जगदीशने त्याची योग्यता आणि हुशारी स्पष्ट केली.

"फेअर इनफ्!" विनय कंविन्स्ड् होऊन उद्गारला.

"देन एज्युकेट मी!" जगदीश त्याच इंटेनसिटीने उद्गारला.

"आणि त्याच दिवशी मी तुझं नांव 'सुमेध' ठेवलं. एक असं पवित्र यज्ञ, जे आपल्याला न्याय मिळवून देईल! आणि हे काम करून तुला निवडून मी चूक केली नाही हे तू सिद्ध केलंस!" आठवणतून बाहेर पडत विनय सुमेधला म्हणाला.

"थँक्स..." विनयच्या स्तुतीचा सुमेधवर काही परिणाम झाला नव्हता. तो विषादात असल्यासारखा उद्गारला होता.

"अवस्युला शोधण्यासाठी तू इतका खटाटोप का केलास? माझी माणसं सहज त्याला शोधू शकली असती! इवन पोलिसांडून आपण डिरेक्ट मदत घेतली असती!" विनय उत्सुकतेने म्हणाला.

"मला कोणताही ट्रेस मागे सोडायचा नव्हता! अवस्युचा शोध घेतला जातोय हे त्याला कोठून समजलं असतं, तर तो अलर्ट झाला असता! आणि मला ते नको होतं!" सुमेधने स्पष्ट केलं.

"सायबर सेलने तुला शोधलं तर?" विनयने त्याची शंका बोलून दाखवली.

"ते शक्य नाही! हार चोरीला गेल्याचा खोटा रिपोर्ट मी त्यासाठीच रजिस्टर करायला लावला होता. ईमेल थ्रू काही मॅलवेअर सिस्टीममध्ये इन्सर्ट झालाय का याचा जरी पोलिसांनी शोध घेतला, तरी एका तक्रारदारावर तितका दाट संशय नाही घेतला जाणार." सुमेधचं प्लॅनिंग किती काटेकोर होतं हे त्यानं दाखवून दिलं.

तरी विनयची शंका शमली नव्हती,

"पण रिपोर्ट तर रजिस्टर झालाच नाही!" त्याने विचारलं.

"तरीही गोष्ट आपल्या हक्कात आहेत. हवालदाराचा विटनेस तयार झालाच ना! आणि चोरीची तक्रार हा फक्त एक बॅक-अप आहे! हा, हे माझं स्पेक्युलेशन आहे, पण काही ट्रेस होणारच नाही याची देखील मी काळजी घेतली आहे! कारण प्रॉक्सी सर्व्हर आणि फेक ईमेल आयडीचा मी वापर केलाय. सायबर सेलने शोधलंच, तर दुसरेच लोक त्याच्या हाती लागतील." सुमेध शांतपणे म्हणाला. त्याला स्वतःवर पूर्व विश्वस होता हेच त्यातून स्पष्ट होत होतं.

विनय हसला. म्हणाला,

"तुझ्या बुद्धिमत्तेत केलेली इन्व्हेस्टमेंट वाया गेली नाही!"

आणि त्याने सुमेधची मांडी थोपटली,

"जा! खोलीत जा! आराम कर!" हसत विनय सुमेधला म्हणाला.

सुमेधने गंभीरपणे मान हलवली व तो त्याच्या खोलीतून बाहेर गेला. जाताना दार ओढून घेतले!

## ५. पुनरुज्जीवन...

"बाबा... बाबा... बाबा... बाबा..." घोर काळोखात कुठून तरी विदुषीचा आवाज गुंत होता...

खाडकन डोळे उघडले गेले. हॉस्पिटल!

अवस्युने उठण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्याच्या देखरेखीसाठी असलेल्या कंम्पाउंडरने त्याला पुन्हा झोपवण्याचा प्रयत्न केला, पण तो असफल होत होता...

"उठू नका. उठू नका. पडून रहा!..." अवस्युला बेडवर झोपवण्यासाठी कंम्पाउंडर पुन्हा पुन्हा ओरडून अवस्युला शांत करण्याचा प्रयत्न करत सांगत होता.

कंम्पाउंडर शक्तीनिशी त्याला कंट्रोल करण्याचा प्रयत्न करत होता, पण ते त्याला शक्य होत नव्हतं. तेवढ्यातूनही अवस्युने त्याला लावलेले इक्विपमेंट्स काढून टाकू लागले. सिच्युएशन हाताबाहेर जातीये हे लक्षात येऊन मग कंम्पाउंडरने इमर्जेन्सी अलार्म वाजवला. कंम्पाउंडर अवस्युला नियंत्रित करण्यासाठी जोर लावत होता. काही वेळातच डॉक्टर धावत आत आले.

"काय झालं?" डॉक्टरने अनेस्थेशिया व्हाईल मधून सिरेंजमध्ये भरत कम्पाउंडरला विचारलं.

"काय माहीत? अचानकच उठून सगळं काढून फेकायला लागलंत..." अवस्युला कंट्रोल करण्याचा प्रयत्न करतच होता.

डॉक्टरने घाईने अवस्युला अनेस्थेशिया दिला. भुलीमुळे अवस्युच्या हालचाली संथ होऊ लागल्या... आणि एका पॉईंटला तो बेशुद्ध झाला. त्याला नीट हॉस्पिटल बेडवर झोपवलं गेलं.

अवस्युला अनेस्थेशिया दिलेला डॉक्टर व अवस्युचा शेजारी जयेश, जो शेवटी अवस्युच्या घरी पोहोचला होता, दोघे डॉक्टरच्या केबिनमध्ये बसले होते. अवस्यु कोमातून बाहेर आल्याने डॉक्टरने त्याला बोलावून घेतले होते.

"तुम्ही त्यांना हॉस्पिटलला घेऊन आलात आणि तुम्हीच असे आहेत ज्यांना आम्ही त्यांचे रेलेटीव्ह म्हणून ओळखतो म्हणून तुम्हाला बोलवलं... मला वाटतं आपल्याला काही प्रॉब्लेम नसेल..." डॉक्टर त्याला म्हणाला.

"प्रॉब्लेम कसला डॉक्टर? बोला ना काय झालं?" जयेशने विचारलं.

"आपटे शुद्धीवर आलेत..." डॉक्टर चिंतेने म्हणाले.

"ही तर चांगली गोष्ट आहे." जयेश म्हणाला.

"त्यांची शारीरिक स्थिती जरी सुधारत असली, तरी मला भीती आहे, की ते मानसिकदृष्ट्या अजून रिकव्हर झाले नाहीत. आणि यात अजून किती वेळ लागेल सांगता येत नाही... म्हणजे त्यांना त्यांच्या मुलीची अजूनही चिंता वाटते. कदाचित त्यांनी ही फॅक्ट अजून एक्सेप्ट केलेली नाही, की त्यांची मुलगी मेली आहे. असंही असू शकतं, की बेशुद्ध होण्याच्या शेवटच्या क्षणात काय घडलं, हे ते विसरले असतील..." डॉक्टर पुन्हा चिंतेने म्हणाले.

"मी काय मदत करू शकतो डॉक्टर? विदुषीच्या मृत्यूची बातमी लपवावी लागणार आहे का?" जयेशने विचारलं.

"माझं मत वेगळं आहे, मला वाटतं तुम्ही त्यांना सांगावं खरं काय आहे ते!" डॉक्टर त्याला म्हणाले.

"पण डॉक्टर याचा विपरीत परिणाम झाला तर?" जयेशने चिंतीत होत विचारलं.

"आम्ही आहोत त्यांची काळजी घ्यायला. पण सत्य जेवढ्या लवकर त्यांना कळेल, तेवढ्या लवकर ते मेंटली देखील हेल्दी होतील असं माझं मत आहे. आणि तुम्ही हे करू शकता, कारण तुम्ही देखील या दुःखातून गेला आहात. तुम्हीच योग्य प्रकारे आपटेंना समजावू शकता हे पण कारण आहे, आम्ही तुम्हाला बोलावण्याचं." त्याला चिंतामुक्त करण्यासाठी डॉक्टरनी त्याला आश्वासन दिलं.

"ठीक आहे."जयेश मान डोलावर गंभीरपणे उद्गारला.

मग दरवाजा उघडून जयेश अवस्युच्या खोलीत आला. पण अवस्यु बेडवर नव्हता. जयेश खूप टेन्शनमध्ये आला. अवस्यु कुठे गायब झाला याचा त्याला विचार पडला. इतक्यात बाथरूमचा दरवाजा उघडल्याचा आवाज झाला. जयेशने त्या दिशेला पाहिलं. अवस्यु वॉकरचा आधार घेत बाथरूममधून बाहेर आलेला त्याला दिसला आणि तो रिलॅक्स झाला.

गुड मॉर्निंग! अवस्युने स्माईल करत बेडकडे येत जयेशला ग्रीट केलं.

जयेशने तणावपूर्ण स्मित केलं व तो अवस्युला बसण्यास मदत करू लागला.

"आमची विदुषी कुठं आहे? मी शुद्धीवर आल्यापासून एकदाही आली नाही हॉस्पिटलला. तिच्या हाकेमुळेच शुद्धीवर आलो, पण त्या दिवशी पासून बाईसाहेब गायबच! मान्य आहे बिझी असते." अवस्यु बेडवर बसत जयेशला विचारलं.

थोडं थांबून पुढं अवस्यु बोलला,

"बरंच आहे, माझ्याजवळ बसून राहण्यापेक्षा तिचं काम चालू आहे! आता बरा होतोय. येईन म्हणावं तिला मी लवकरच!"

अवस्युला सत्य कसं सांगावं हे जयेशला समजत नव्हतं. पण सांगावं तर लागणारच म्हणून,

"तेच सांगायचं होतं दादा... विदुषी... विदुषी आता आपल्यात नाही..." जयेश चाचपडत, संकोचत म्हणाला.

पण याचा अवस्यु‌ुवर काहीच परिणाम झाला नाही.

"मला डिस्चार्ज हवाय!" दुसरीकडे पाहत अवस्यु म्हणाला.

"पण तुम्ही अजून पूर्ण बरे झाले नाही आहात... तुमचं रिहॅबिलिटेशन सेशन्स पण बाकी आहे..." जयेश काळजीने म्हणाला.

"ते मला माहित नाही. मी स्वतः जाणाराय विदुषीला भेटायला. मला माहित आहे, ती घरी माझी वाट बघत असेल... मला... मला गेलं पाहिजे. किती दिवस एकटी राहणार बिचारी..." अवस्यु त्याच्या निर्णयावर ठाम होता.

"दादा..." जयेश कळकळीने ओरडला.

"तू प्लिज डॉक्टरशी बोल. नाही तर मी असाच निघून जाईन! खूप झालं या डॉक्टरचं! दहा दिवस झाले मी इथं आहे म्हणतोय, पण मला सोडत काही नाही..." अवस्युने विनंती करत जयेशला म्हंटलं.

जयेश पहातच राहिला, पण जागचा हालला नाही.

"का मी जाऊ?" जयेशवर प्रेशर टाकण्यासाठी अवस्यु उठत म्हणाला.

"दादा; विदुषी नाजीए आपल्यात! शुद्धीवर या!" आता मात्र जयेश ओरडला.

हे ऐकून अवस्युने उठून त्याचा कॉलर पकडली.

"काय बोलतोयस कळतंय का? तिनं स्वतः मला हाक मारली होती! जिवंत आहे ती! जिवंत आहे!" अवस्यु चिडून म्हणाला.

"आपला भ्रम होता तो दादा... मला माफ करा... मी... मी खरं बोलतोय..." दुःखी अंतःकरणाने जयेश बोलला.

हे ऐकून अतीव आवेशाने व धक्क्याने अवस्युने आपली शुद्ध हरपली आणि तो धाडकन बेडवर पडला!

**दहा वर्षांपूर्वी...**

कोल्हापूर डिस्ट्रिक्टचा सुप्रीटेंडेंट ऑफ पोलीस असणाऱ्या अवस्य◌ुने व त्याच्या टीमने एका केमिकल फॅक्टरीवर रेड मारली होती. प्रोटेक्शनसाठी त्यानं बुलेटप्रूफ व्हेस्ट घातलेलं होतं, ज्यावर "Police" असं ठळक लिहिलं होतं. त्याच्यावर हल्ला करणाऱ्या एका माणसाला त्याने खाली पाडलं आणि तो पडलेल्या माणसापाशी गेला. त्याच्याजवळ बसला. तो त्या व्यक्तीची चौकशी करणार इतक्यात दुसऱ्या रक माणसाकडून त्याच्यावर गोळी झाडली गेली. सावध होऊन अवस्युने ती गोळी डॉज केली व जलद आपली सर्व्हिस रिव्हॉल्व्हर बाहेर खेचून त्या दिशेने गोळी चालवत कव्हरसाठी जमिनीवर रोल होऊन एका मशीनमागे लपला. तो सावधपणे पुढं पाहत असतानाच मागून एका माणसाने येऊन त्याच्यावर गन रोखली. अवस्युने त्याला मारून खाली पाडले व त्याच्यावर रिव्हॉल्व्हर ताणली.

त्याचवेळी इतर दोन पोलीस येऊन आधीच्या पडलेल्या माणसाला व या माणसाला घेऊन गेले. जोश्वा, (डीएपी) अवस्युपाशी आला. सर्वांनीच बुलेट प्रूफ जॅकेट्स घातले होते. अवस्युचा मोबाईल वायब्रेट होऊ लागला... अवस्यु मोबाईल काढून नांव पाहिलं. त्याचे भाव बदलले.

"जोश्वा, इथून पुढं तू सांभाळ. दुसरं काम आलंय!" जोश्वाला अवस्युने आपले अधिकार सोपवले.

"इतकं अर्जंट काय?" जोश्वाने विचारलं.

अवस्युने त्याला मोबाईल दाखवला.

"ओह! बॉस!" जोश्वा हसत उद्गारला.

अवस्युने मान डोलावली व बाहेर गेला. जोश्वाने त्याला फॉलो केलं.

त्या केमिकल फॅक्टरीच्या बाहेर, अटक केलेल्या दोघांना पोलीस व्हॅनमध्ये टाकलं गेलं. जोश्वा व अवस्यु बाहेर आले. अवस्यु फोनवर बोलत त्याच्या पोलीस गाडी जवळ आला. जोश्वा त्याच्या गाडीकडे निघून गेला. गाडीत ड्रायव्हिंग सीटवर हवालदार. कॉल रिसिव्ह करत अवस्यु हवालदाराजवळ बसला.

"डोन्ट वरी बाळा, मी तासाभरात पोहोचतोय!" अवस्यु फोनवर म्हणाला.

"अर्धा तास? माझा परफॉर्मन्सच अर्ध्या तासात आहे. एक तासाने तुम्ही येऊन करणार काय?" पलिकडून विदुषी नाराजीने आणि त्याहून अधिक वैतागून म्हणाली.

अवस्युने जोरात हात हलवून हवालदाराला गाडी पळवण्याचा इशारा केला. हवालदार गाडी चालू करून चालवू लागला.

गाडीत...

"नाही रे बाळा! मी पोहोचतो म्हंटलं ना... पोहोचतो मी..." अवस्यु हसून म्हणाला.

आणि विदुषीच्या नाराजीला अजून तोंड द्यायला लागू नये म्हणून अवस्यु विदुषीचं पुढं काही ऐकून न घेता तो फोन कट केला.

गाडी रस्त्यावर वेगाने धावत होती.

"जवळ कुठं टॅक्सी किंवा रिक्षा स्टँड असेल तर तिथं सोडा." अवस्यु हवालदाराला म्हणाला.

"मी पोहोचवतो ना साहेब!" हवालदार म्हणाला.

"तुम्हाला माहितीय हेर्ले, पर्सनल कामासाठी गव्हर्नमेंट विहेकल वापरलेलं मला आवडत नाही." अवस्यु त्याला म्हणाला.

"होय, पण इतकी घाई कसली साहेब?" हवालदाराने विचारलं.

"अहो विदुषीचं गॅदरिंग आहे. आणि मी इथं कामात." अवस्यु बुलेट प्रूफ वेस्ट काढत बोलला.

"असंय होय. मग तुम्ही काही काळजीच करू नका. जवळच एक टॅक्सी स्टँड आहे." इमर्जन्सी किती मोठी आहे हे लक्षात येऊन हवालदार बोलला.

आणि हवालदाराने एक्सलेटरवर पायाने जोर दिला.

"तुम्हाला पण मुलगी आहे ना हेर्ले?" अवस्युने मागे पडलेला कोट घेऊन घालत विचारलं.

"होय." हवालदार म्हणाला.

"मग तुम्ही माझं भिणं चांगलंच समजू शकता." अवस्यु म्हणाला.

त्याच्या या वाक्यावर हवालदार खुदकला.

"चला. पण स्पीड लिमिट तेवढं क्रॉस करू नका. नाही तर आपणच गुन्हेगार व्हायचो..." अवस्यु देखील हसत म्हणाला.

विदुषीचं हायस्कुल ऑडिटोरियम, विदुषीचा परफॉर्मन्स चालू होणार होणार होता. स्टेजवर वादकांकडून सर्व सेट-अप होत होता. १५ वर्षांची विदुषी त्यांना मदत करत होती. अवस्यु कोणाला डिस्टर्ब होऊ नये याची काळजी घेत पुढील रांगेत त्याच्यासाठी राखीव असलेल्या खुर्चीत येऊन बसला. सर्व सेट झाल्यावर विदुषी मध्यभागी येऊन बसली. विदुषीचं लक्ष अवस्युवर गेलं. त्याने हसून तिला दोन्ही हातांनी थंब्स्-अप करून ओठांच्या हालचालीने "बेस्ट ऑफ लक" दिलं. अवस्युला आलेलं पाहून विदुषी कॉन्सन्ट्रेशनने सरस्वती वंदना गाऊ लागली...

============

**सरस्वति नमस्तुभ्यं वरदे कामरूपिणि ।**

**विद्यारम्भं करिष्यामि सिद्धिर्भवतु मे सदा ॥**

============

संध्याकाळी गॅदरिंगचा कार्यक्रम संपवून अवस्यु व विदुषी घरी जायला निघतात. विदुषीचं साहित्य, बॅग अवस्युने घेतली होती. दोघे टॅक्सीच्या दिशेने चालत होते.

"वेळेत आलात!" विदुषी म्हणाली.

हा टोमणा होता, की प्रसंसा हे मात्र अवस्युला समजण्या पलीकडे होतं. म्हणून...

"मग? माझी हिंमत आहे का तुझी ऑर्डर मोडण्याची?" म्हणत अवस्युने टोमणा मारला.

"तुम्ही इंडिरेक्ट्ली मला डिक्टेटर असं म्हणता आहात का?" विदुषीने खोट्या रागाने विचारलं.

"नाही गं! मी आत्ताच म्हणालो ना माझी काय हिंमत?!" अवस्युने तिची मस्करी केली.

"बाबा..." विदुषी अन्नॉइंग्ली ओरडली.

आणि तिनं हळुवार अवस्युच्या  दंडावर मारलं. अवस्यु खळखळून हसला. दोघे टॅक्सीत बसले.

"साहेब कुठं?" टॅक्सी ड्रॉयव्हर अवस्युला विचारलं.

"एसपी ऑफिस!" अवस्युने पत्ता सांगितला.

आणि टॅक्सी चालू होऊन धावू लागली...

टॅक्सी कॉर्टर्सच्या दिशेने धावत असताना दुरून कुठून तरी बॉम्ब ब्लास्ट झाल्याचा सौम्य आवाज झाला...

"ते काय होतं?" विदुषीने दचकून विचारलं.

"आणखी एक ब्लास्ट!" अवस्यु गंभीर होत म्हणाला.

अवस्यु घाईने आपला मोबाईल काढला. आणि कॉल लावला.

"हॅलो! कंट्रोलरूम, एसपी बोलतोय. माझं लोकेशन ट्रेस करून माझ्या आत्ताच्या लोकेशनपासून आसपासच्या एक किलोमीटरच्या अंतरावर काय झालंय का बघा. बॉम्ब ब्लास्ट झालाय असं वाटतंय!" अवस्यु मोबाईलमध्ये म्हणाला.

आणि त्याने फोन कट केला. अवस्युचा चेहरा चिंतेने व्यग्र झाला होता. त्याचा अचानक असा बदललेला मूड विदुषीला फावला नाही. ती त्याला धीर देऊ लागली,

"टेन्शन घेऊ नका बाबा..."

"कसं घेऊ नको बाळा? दुपारीच दोन व्यक्तींना पकडलं, वाटलं थांबेल सगळं. पण नाही! चालूच आहे... लॉ अँड ऑर्डर सांभाळणं माझं कर्तव्य आहे आणि वाटतंय मी यात फेल होत चाललोय..." अवस्यु निराश स्वरात म्हणाला.

"सगळं ठीक होईल बाबा..." विदुषीने पुन्हा धीर दिला.

अवस्युचा फोन वाजला. त्याने पटकन कॉल रिसिव्ह केला,

"बोला!"

"हो सर! गोकुळ शिरगांव एमआयडीसी एरिया जवळ हायवेवर एक ब्लास्ट झालाय. माईल्ड बॉम्ब होता, पण एक व्यक्ती मारला गेलाय! एमआयडीसी पोलीस तिकडे निघालेत." ऑफिसर पलिकडून म्हणाला.

"मला एग्जॅक्ट लोकेशन सेंड करा." अवस्युने इन्स्ट्रक्शन दिली.

व फोन कट केली. त्याच्या मोबाईलची मेसेज ट्यून वाजली. त्याने मेसेज बघितला. फोन खाली घेतला.

"गोकुळ शिरगांव एमआयडीसी एरियाच्या हायवेला घ्या." अवस्यु ड्रायव्हरला म्हणाला.

ड्रायव्हर गाडी दुसऱ्या लेनला घेऊन चालवू लागला.

एमआयडीसी हायवेला टॅक्सी आली. अवस्यु गाडीतून उतरला. दरवाजा बंद करून खिडकीत वाकला. मागे एक ट्रक जळलेल्या अवस्थेत पडला होता. लोक जमा झाले होते. पोलीस गाडी साईडला पार्क केलेली होती. काही मास्क व गल्व्ह्स् घातलेले पोलीस तिथं उपस्थित होते. जमावाला मागे हटवण्याचा प्रयत्न करत होते. जळलेला ट्रक आडवा असल्याने काही गाड्या हायवेवरच थांबल्या होत्या. तर काही थांबल्या होत्या, ते उत्सुकतेपोटी. सगळा गोंधळ चालू होता. अग्निशमन दल जळणाऱ्या ट्रकवर पाणी मारून तो विझवण्यासाठी प्रयत्न करत होते.

"घरी जा. काळजी करू नको. तुझ्या प्रोटेक्शनला आपले पोलीस आहेत तिथं." अवस्युने विदुषीला सूचना केली.

"तुम्ही पण काळजी घ्या." म्हणत विदुषीने चिंतीत भावमुद्रेने होकारार्थी मान डोलावली.

"हो!" अवस्यु तिला म्हणाला व त्याने ड्रायव्हरकडे पाहिलं,

"एसपी कॉर्टर्सला जाऊ द्या." अवस्यु पैसे देत ड्रायव्हरला म्हणाला.

टॅक्सी निघून गेली. अवस्यु मागे वळला. ब्लास्ट झालेल्या दिशेने गेला.

गोकुळ शिरगांव एमआयडीसी पोलीस स्टेशन इंचार्ज अवस्युकडे धावत आला. त्याने अवस्युला अल्युट केला. पण सल्यूटसाठी न थांबता तो ब्लास्टच्या ठिकाणी चालत राहिला. सब-इन्स्पेक्टर त्याच्या मागून घाईने चालू लागला.

"काही कळालं?" अवस्युने सब-इन्स्पेक्टरला विचारलं.

"चौकशी चालू आहे. लोक म्हणताहेत अचानकच स्फोट झाला." सब-इन्स्पेक्टरने स्पष्टीकरण दिलं.

"स्फोट अचानकच होतो. सांगून सवरून कुणी स्फोट घडवतं का? या स्टेटमेंट्सना काही अर्थ नाही. हायवेवर लोक येत जात असतात त्यामुळं कोणाला पक्की माहिती असेल याची खात्री कमी. त्यामुळं यांच्या चौकशीत वेळ घालवण्यापेक्षा ट्रॅफिक कमी करा. प्रत्यक्षदर्शी कोण असेल तर बघा, नाही तर गर्दी हटवा! जवळचे स्टॉल्स, टपऱ्या, ढाबे, अपार्टमेंट्स अशा ठिकाणी चौकशी करा म्हणजे काही कळेल. हायवेवर जेवढे सीसीटीव्ही आहेत सगळ्यांचे फुटेजेस गोळा करा. एव्हीडेन्स एसपी ऑफिसला जमा करा! आणि हा एरिया रेस्ट्रिक्टेड् करून घ्या." अवस्यु त्याला म्हणाला.

"ह... होय सर." सब-इन्स्पेक्टर चाचपडत बोलला.

"फॉरेन्सिकला कळवलंय?" अवस्युने विचारलं.

"हो सर. पोहोचताहेत ते." सब-इन्स्पेक्टर म्हणाला.

"कॅज्युएल्टी?" अवस्युने परत प्रश्न केला.

"एक. ट्रक ड्रायव्हर. बॉडीपार्ट्स् लॅबला पाठवले आहे." सब-इन्स्पेक्टर म्हणाला.

आणि पुढं होऊन त्याने इतर पोलीस व हवालदारांना गाड्या हटवण्याचा इशारा केला. पोलीस त्या कामात लागले. ट्रकवर मारलं जात असलेलं पाणी थांबवलं गेलं. अग्निशमन दलाची

गाडीही बाजूला झाली. आधीच तेथे तरतुदीत असलेल्या क्रेन ट्रकला बाजूला हटवलं. लोकांना तेथून हलवून आपापल्या गाड्या घेऊन जाण्यास सांगितलं जाऊ लागलं. बेमनानं लोक तेथून गाड्या काढू जाऊ लागले.

काही वेळातच जागा मोकळी झाली. हायवेवर "Restricted Area" चे बोर्ड लावले गेले.

दरम्यान अवस्यु ट्रकपाशी गेला. तिथं असलेल्या पोलिसांकडून  गल्व्ह्जची पेअर घेऊन त्याने ते हातात चढवले व ट्रक इग्जामिन करू लागला. गाडीतील तुकडे उचलून त्याचा त्याने वास घेतला.

"काय वाटतंय?" आधीपासून एग्जामिन करत असलेल्या ऑफिसरला अवस्युने विचारलं.

"सेम एक्सप्लोसिव्हचाच वापर केलाय असं वाटतंय. फॉरेन्सिक एग्जामिनेशन नंतर खात्रीशीर सांगता येईल. फॉरेन्सिक येतच आहे." ऑफिसरने मास्क बाजूला करून सांगितले.

"हो सब-इन्स्पेक्टर बोलले." अवस्यु म्हणाला.

अवस्यु ड्रायव्हर केबिन सगळी नीट पाहत असताना त्या एरियाचा इंचार्ज असलेला सब-इन्स्पेक्टर अवस्युकडे आला.

"सर!"

काही विचार करण्याची भावमुद्रेत अवस्युने मान डोलावली.

"सगळे रिपोर्ट्स हेडकॉर्टरला पाठवा. मी असेन तिथंच. तुमची गाडी घेऊन जाऊ ना?" अवस्यु सब-इन्स्पेक्टर म्हणाला.

"नक्कीच." सब-इन्स्पेक्टरने संमती दर्शवली.

"पाठवतो परत." म्हणत अवस्यु गाडीकडे वळला.

"हो सर!"

सब-इन्स्पेक्टर व जवळील सर्वांनी सल्युट केला. अवस्यु गाडीत बसून निघून गेला.

कोल्हापूर पोलीस हेडकॉटर - कसबा बावडा -

अवस्यु असलेली पोलीस गाडी आली. अवस्यु गाडीतून उतरला.

"थँक यू." त्याला घेऊन आलेल्या हवालदाराला अवस्यु म्हणाला.

"येतो." म्हणून हवालदार गाडी परत घेऊन गेला.

अवस्यु हेडकॉर्टरकडे चालू लागला...

चिंतीत असलेला अवस्यु दरवाजा उघडून त्याच्या केबिनमध्ये प्रवेशाला. समोर पाहतो, तर विदुषी बसलेली.

"तू इथं? तुला मी घरी थांबायला सांगितलं होतं." अवस्यु तिला काळजीने म्हणाला.

"इथून घर किती लांब आहे बाबा?" विदुषीने त्याला प्रतिप्रश्न करत ती जाणार नाही हे तिने स्पष्ट केलं.

अवस्यु येऊन खुर्चीत बसला.

"ते ठीक आहे बाळा, पण काही गोष्टी असतात ज्या सामान्य नागरिकांसमोर बोलता येत नाहीत." विदुषीला म्हणाला.

"पण मी तुमची मुलगी आहे." विदुषीने प्रोटेस्ट केलं.

"पण तू डिपार्टमेंटमध्ये इन्क्लुड नाहीस. त्यामुळे सामान्यच!" अवस्यु असून त्याच्या मतावर राहिला.

"मी प्रॉमिस करते, मी तुमच्या कामात काही अडथळा आणणार नाही. पण मला इथं थांबू द्या." विदुषीने आश्वासित करत म्हणाली.

"बाळा..." अवस्युने तरीही विरोध दर्शविला.

"प्लिज बाबा... मला तुमची काळजी वाटते ना... सतत बॉम्ब स्फोट चालू आहेत. तुम्हाला काही व्हावं असं नाही वाटत मला..." विदुषीने आपला हट्ट सोडला नाही.

"आणि तू कोणत्या संकटात सापडावं असं मला नाही वाटत!" अवस्युने ठाम निर्णय सांगितला.

त्यावर विदुषी फक्त त्याच्याकडे पाहत राहिली. अवस्यु काय ते समजला.

"तू ऐकणार नाहीस तर?!" त्याने विचारलं

"नाही! आमच्या एन्युअल फंक्शनला तुम्ही जसे आला होतात, त्यावरून वाटत होतंच तुम्ही कोणाशी तरी फाईट करून आला होता. आणि आता या अशा परिस्थितीत मी तुम्हाला एकटं सोडण्याचा प्रश्नच नाही!" विदुषी काळजीने म्हणाली.

"ठीक आहे तर मग. पण तुला विटनेस म्हणून रहावं लागेल. कोणत्याही नॉर्मल सिटीझनला सोबत राहण्यास मी अलाव्ह करणार नाही!" अवस्युने तिला अट ठेवत संमती दिली.

"थँक्स बाबा!" विदुषी हसत म्हणाली।

अवस्युने हेल्पलेसली मान डोलावली व बेल वाजवली. एक हवालदार आत आला.

"सर!"  सल्युट करत हवालदार म्हणाला.

"हिची स्टेटमेंट रेकॉर्डवर करा. हायवेवर झालेल्या ब्लास्टचा आवाज हिने ऐकलाय आणि क्राईम सिनवर देखील माझ्यासोबत आली होती."

"येस सर!"

"जा यांच्यासोबत. काय पाहिलंय व ऐकलंय ते नीट सांग." अवस्युने विदुषीला सांगितलं.

"हो!" विदुषी म्हणाली.

ती उठते. दाराकडे वळून चालली. हवालदाराने पुन्हा सल्युट केले. विदुषीसाठी त्याने दार उघडलं. विदुषी बाहेर गेली. हवालदारही तिच्या मागून गेला. अवस्यु दाराकडे पाहत राहिला. 'काय करावं?' हा प्रश्न त्याच्या चेहऱ्यावर...

मग अवस्यु आपलं काम पाहू लागला. काही वेळाने उठून बाहेर गेला...

अवस्यु केबिनमधून बाहेर वर्किंग एरियात विदुषीचं स्टेटमेंट घेत असलेल्या टेबलपाशी आला. हवालदार उठून उभा राहू लागला. अवस्युने त्याला इशारा करून बसण्यास सांगितलं.

"झालं?" अवस्युने विचारलं.

"हो." विदुषी म्हणाली.

"चल काहीतरी खाऊन घे." तो विदुषीला म्हणाला आणि त्याने हवालदारकडे पाहिलं,

"आज कोणालाही घरी जाता येणार नाही. सर्वांना तसं कळवायला सांगा घरी. आणि जेवून घ्या सगळेच."

"हो सर!"

"चल!" अवस्यु विदुषीला म्हणाला.

"थँक्स सर!" विदुषीने खुर्चीतून उठत हवालदाराला स्मित करत आभार मानले.

हवालदारानेही स्माईल केले. मग विदुषी अवस्यु सोबत बाहेर पडली.

बाहेर, अवस्यु विदुषीला हेडकॉर्टर बाहेर थांबायला सांगून त्याच्या निवासस्थानाहून त्याची गाडी घेऊन आला. विदुषीसाठी त्याने दरवाजा उघडला. विदुषी बसलो. गाडी धावू लागली...

अवस्यु गाडी चालवत होता; चिंतीत मुद्रा. बाजूला विदुषी बसलेली...

"तुला काय गरज आहे हे करण्याची? घरी बसली असतीस, तर मी निदान तुझ्या काळजीतून तरी मुक्त राहिलो असतो." अवस्यु चिंतेने म्हणाला.

"माझ्या काळजीचं काय? घरात बसून मी काळजी करत बसू?" विदुषी पुन्हा ओरोटेस्ट करत म्हणाली.

"तू ऐकत का नाहीस?" अवस्यु अनॉइंग्ली म्हणाला.

"कारण मी तुमची मुलगी आहे!" हे वाक्य मात्र विदुषी गोड हसून म्हणाली.

अवस्युकडे मग असहाय्यपणे मान डोलावण्या शिवाय हाती काही राहिले नाही.

अवस्युची गाडी कोल्हापूरच्या मध्य हायवेवर ट्रॅफिकमध्ये धावत होती...

अवस्यु व विदुषी रेस्टॉरंट जेवण करत होते.

काहीवेळाने डिएसपी जोश्वा तेथे आला. त्याने अवस्युला सल्युट केला. अवस्यु व विदुषीने त्यांच्याकडे बघितलं.

"इथं हे करण्याची गरज नाही रे. बोल. जेवणार?" अवस्यु जोश्वाला म्हणाला.

"अजून आपण ड्युटीवर आहोत. त्यामुळे मित्र म्हणून नाही, तर अधिकारी म्हणून मान देतोय." जोश्वा अवस्युला म्हणाला. त्याच्या या बोलण्यात टोमणा होता की काय कोण जाणे पण म्हणूनच अवस्यु हसला

"बोला!" तो जोश्वाला म्हणाला.

"इथं नको!" जोश्वा अवस्युला म्हणाला.

"बरं थांब!" म्हणत अवस्युने मॅनेजरला हाक मारली,

"मॅनेजर!"

मॅनेजर लगबगीने आला.

"येस सर?" तो नम्रतेने म्हणाला.

"कोणती फॅमिली रूम रिकामी आहे?" अवस्युने मॅनेजरला विचारलं.

"हा हो सर. चार नंबर." मॅनेजर म्हणाला.

"हे जेवण तिथं हलवा. आणि एक एक्स्ट्रा ताट पण पाठवा." म्हणत अवस्यु उठतो.

सोबत विदुषीही उठून उभा राहिली.

"हो सर." मॅनेजर स्मित करत म्हणाला आणि त्याने वेटरला हाक मारली.

अवस्यु रूमकडे चालू लागला. मागून जोश्वा व विदुषीही गेले.

फॅमिली टेबल रूम नंबर चार, अवस्यु दरवाजा खोलून आत येऊन बसला. जोश्वा व विदुषी देखील आत आले. विदुषीही बसली, पण जोश्वा उभाच राहिला.

"बस!" अवस्यु जोश्वाला म्हणाला.

जोश्वाने विदुषीकडे पाहिलं.

अवस्युकाय ते समजला.

"बोल रे. ती आता साक्षीदार आहे. काही प्रॉब्लेम होणार नाही." अवस्यु जोश्वाला म्हणाला

जोश्वा बसला.

"तुम्ही पकडलेल्या दोन व्यक्तींचा चौकशी दरम्यान मृत्यू झालाय. आणि..." जोश्वा बोलता बोलता थांबला.

कारण इतक्यात दार उघडतंय हे लक्षात येऊन अवस्युने हात उंचावून जोश्वाला गप्प केलं होतं. दार उघडणारा मॅनेजर होता. दोन वेटर्स एकामागून एक येऊन जेवणाची पात्रे ठेऊन निघून गेली.

"एन्जॉय युअर मील सर!" मॅनेजर हसून म्हणाला.

अवस्युने स्माईल केले. मॅनेजर दार ओढून निघून गेला. थोडावेळ जाऊ देऊन अवस्युने जोश्वाला बोलण्यास मानेने खूण केली.

"मला वाटतं तुम्ही हे पाहायला हवं!" म्हणत जोश्वाने मोबाईल काढून त्यातील एक व्हिडिओ उघडून अवस्युच्या हाती दिला.

"तू का थांबली आहेस? कर चालू कर." अवस्यु विदुषीला म्हणाला.

'व्हिडीओ पाहू नको' हा गर्भितार्थ विदुषी समजली. खाली पाहत जेवण करू लागली आणि अवस्यु व्हिडीओ पाहू लागला.

इंटेरोगेशन रूममधल्या सर्व्हीलीयन्स कमेराने कप्चर केलेल्या त्या व्हिडीओमध्ये, अवस्युने केमिकल फॅक्टरी मध्ये पकडलेल्या दोघांची जोश्वा चौकशी करत आहे. अचानक ती दोन्ही माणसं बसल्याजागी तडफडून, ओकत मरण पावली. पण हथकडी असल्याने ते खाली न कोसळता, खुर्चीत निष्प्राण पडून राहिले. जोश्वा तडख पुढं झाला. त्याच्या हाकेवरून बाहेरील दोन ऑफिसर्स पळत आत आले...

अवस्युने जोश्वाला मोबाईल परत केला आणि त्यानेही जेवण चालू केलं.

"फोरेन्सिक टेस्ट झाली?" जेवत अवस्युने जोश्वाला विचारलं.

जोश्वाने होकारार्थी मान डोलावली.

"बॉडीज बघायच्या आहेत?" जोश्वाने अवस्युला विचारलं.

अवस्युने विदुषीकडे नजर टाकली व परत जोश्वाकडे पाहिलं.

"नको राहू दे. रिपोर्ट!" अवस्यु जोश्वाला म्हणाला.

रेडिओ एक्टिव्ह पॉइस्निंग! पोलोनियम-210! एक मायक्रोग्रॅम देखील पुरेस आहे माणसाला मारण्यासाठी! पोलोनियमचे सर्वच आयसोटॉप्स माणसासाठी सर्वात घातक रेडिओटॉक्सिक आहेत म्हणे. त्यांच्या खोट्या दातांमधून ते सिक्रीट झालंय." जोश्वाने रिपोर्ट ब्रिफ केला.

आणि जोश्वाने कोटाच्या खिशातून पोलोनियम-210 चा रिपोर्ट काढून अवस्युला देतो. अवस्यु ते पाहू लागला. त्या रिपोर्टमध्ये पोलोनियम-210 च्या घातक असण्याची जवळजवळ सगळी माहिती होती.

"कोल्हापूरमध्ये हे कोठून आलं?" अवस्युने जोश्वाला प्रश्न केला.

"माहीत नाही!" जोश्वाने उत्तर दिलं.

अवस्यु पुन्हा रिपोर्ट नीट वाचू लागला.

"याचा इतर उपयोग?" वाचता वाचता अवस्युने पुन्हा विचारलं.

"फॉरेन्सिकला विचारून घेतो." जोश्वा म्हणाला.

"माझ्या माहिती प्रमाणं 210PO चा उपयोग काही औद्योगिक अनुप्रयोगांमध्ये केला जातो. जसं की स्टॅटीक एलिमिनेटर; जे रोलिंग पेपर, मॅन्युफॅक्चरिंग शीट प्लास्टिक आणि स्पिनिंग सिंथेटिक फायबर सारख्या प्रक्रियेत स्थिर वीज नष्ट करण्यासाठी डिझाइन केलेले डिव्हाइसेस आहेत. शिवाय फोटोग्राफिक फिल्मवरून धूळ हटवण्यासाठी व कम्प्युटर चिप्स बनवताना पण धुळीपासून त्याचं संरक्षण करण्यासाठी पोलोनियम-210 चा उपयोग होतो. स्पेस उपग्रहांमध्ये थर्मोइलेक्ट्रिक पॉवरसाठी हलके उष्णता स्रोत म्हणून पण हे वापरलं जातं." आत्तापर्यंत ऐकत असणारी विदुषी मधेच बोलली.

"या इंडस्ट्रीज कोल्हापूरमध्ये आहेत का ते शोधा. असतील तर त्यांची सगळी माहिती काढा. मालक, बोर्ड मेंबर्स, सप्लायर्स, कस्टमर, सगळ्यांची! आणि शहरातल्या सगळ्या डेंटिस्ट्सची पण चौकशी करायला सांग! कोल्हापुरात कोणी संशयित आढळला नाही, तर सर्चिंग एरिया वाढवा!" अवस्युने जोश्वाला इन्स्ट्रक्शन्स दिल्या.

"हो सर!"

म्हणत मग जोश्वाने विदुषीने सांगितलेल्या इंडस्ट्रीजची यादी व डेंटिस्ट्सची चौकशी करण्याविषयी मोबाईलमध्ये टाईप करून त्यांची माहिती काढण्यासाठीची ऑर्डर कंट्रोलरूमला सेंड केली.

"ऑफिसला पाठवलंय. माहिती मिळेल." जोश्वा पुढं म्हणाला.

"गुड! एमआयडीसी हायवे बॉम्ब ब्लास्टबद्दल काही?" अवस्युने जोश्वाला विचारलं.

"काही दिवसांपूर्वी झालेल्या उजळाईवाडी बॉम्ब स्फोटात जे मटेरियल युज झालं तेच. पोटॅशियम आणि सल्फर पावडर." जोश्वाने स्पष्ट केलं.

"क्रूड बॉम्ब्स्?" अवस्युने शंकीत होत विचारलं.

"होय." जोश्वाने त्याच्या शंकेला दुजोरा दिला.

"ते काय असतं?" विदुषीने गोंधळून विचारलं.

"ते तू जाणण्याची गरज नाही!" अवस्यु तिला म्हणाला.

"क्रूड बॉम्ब्स् हे इलेक्ट्रॉनिक्स आणि केमिकल पासून बनलेले असतात." विदुषी नाराज होऊ नये म्हणून मग जोश्वा तिचं शंका निरसन करण्यासाठी सांगू लागला.

अवस्यु त्याला "का?" असं इरिटेड एक्सप्रेशनने विचारलं. जोश्वाने त्याला हाताने "असुदे" अशी खूण केली आणि विदुषीकडे पाहून पुढे सांगितले,

"बेसिकली टाईम बॉम्ब्स्. याला डेटोनेशन, प्रेशर किंवा रेडिओ फ्रिक्वेन्सीची गरज नसते. अशा बॉम्ब्समध्ये हाय-ग्रेड एक्स्पोसिव्ह नसतात." आणि तो अवस्युला म्हणाला,

"मला तर हा ह्युमन बॉम्बचा प्रकार आहे असं वाटतंय!"

"मला नाही वाटत. तसं असतं, तर मग जीवित हानी जाणीवपूर्वक मोठ्या प्रमाणात घडवून आणली गेली असती. किंवा इंटेरोगेशन रूममध्ये मेलेल्या लोकांमध्ये बॉम्ब्सचे ट्रेसेस सापडले असते. त्यांचं मरणं हे पुरावे नष्ट करण्यासाठी घडवून आणलंय. यात इनवॉल्व्ह लोकांनी तोंड उघडू नये म्हणून हे चालू आहे. पोलिसांच्या हाती कोणी लागलं, की त्याला मारून टाकायचं. म्हणजे आपल्या हाती काहीच लागणार नाही. आपल्या मागावर कोणीतरी असलं पाहिजे. नाही तर आपल्यातील कोणी या लोकांना सामील तरी असलं पाहिजे!" अवस्युने आपला तर्क बोलून दाखवला.

"तुला खरंच असं वाटतं?" जोश्वाने थोडं नाराज होत विचारलं.

"माझ्या लोकांवर माझा विश्वास आहे. दुसरी शक्यता सत्य असणं शक्य नाही!" अवस्युने त्याची नाराजी लक्षात येऊन ती दूर केली.

"थँक्स!" जोश्वा म्हणाला.

"बाकी ऑफिसमध्ये बोलू. जेव. विदू वाढ याला." अवस्युने विषय थांबवला.

मग जोश्वा देखील अनोफिशियल झाला. मोबाईल खाली ठेऊन जोश्वाने सिगरेट काढली. एकामागून एक घडणाऱ्या गंभीर घटना आणि त्यामुळे जराही उसंत न मिळाल्याने आता तरी जरा कुठे निवांत होऊ म्हणून विदुषी समोर आहे आणि तिच्या समोर आपण सिगरेट ओढू नये

हे लक्षात न येता तो ती लायटर काढून सुलगावू लागला, पण ती तो सुलगावणार इतक्यात विदुषी टिशू पेपर घेऊन ती सिगरेट हिसकावून घेतली.

विदुषी असं काही तरी करेल याची खात्री असल्याने अवस्युने जोश्वाला 'रिगरेट नको' अशी ताकिद दिली नव्हती. तो हसत गोंधळलेल्या जोश्वाची मजा घेऊ लागला.

"हे पिणं पण बंद करा. तंबाखूमध्ये देखील पोलोनियम-210 असतं! कॅन्सर होण्यासाठी तेच मुख्य कारण आहे!" विदुषी अधिकाराने दरडावत जोश्वाला म्हणाली.

व तिने सिगरेट टिशू पेपरसह जवळ असलेल्या ट्रॅशकॅनमध्ये टाकून दिली.

"जेवून घ्या!" वाढत विदुषी कड्या आवाजत जोश्वाला म्हणाली.

"अवस्यु..." नाराजीने आणि त्याहूनही केविलवाण्या वाणीत जोश्वा कळवळीने मदतीसाठी अवस्युला आळवला.

अवस्यु त्याला मदत करेल या जोश्वाच्या आशेवर अवस्युने मात्र नाईफ व फोकने उत्तपमचा पीस तोडत,

"नो कमेंट्स! द बॉस इज ओलवेज राईट!" म्हणत पाणी सोडले.

आणि काट्याने घास तोंडी घेतला. विदुषीने पुढे काही न बोलता जेवण वाढून जोश्वाला दिले. जोश्वाने हात पुढं करून त्याला वाढलेले ताट घेतले. पुढं अवस्यु काही न बोलता जेवण संपवू लागला. विदुषी व जोश्वाही जेवण चालू केले.

जेवण उरकून विदुषी व अवस्यु रेस्टॉरंट बाहेर आले.

"विदू, तुला इतकं कसं माहीत? नाश्त्याला इंसायक्लोपीडिया खातेस की काय?" त्याच्या मागून येत विदुषीला चिडवण्यासाठी जोश्वा म्हणाला.

पण,

"पेरियॉडिक टेबल पाठ केलाय म्हणून माहितीए." न चिडता विदुषीने उत्तर दिलं.

"सायन्स आवडता विषय आहे तिचा! गाण्यानंतर जर काही तिला काही आवडत असेल तर ते विज्ञान आहे." कारकडे चालत अवस्यु जोश्वाला म्हणाला.

अवस्युने फुटपाथला लागून असलेल्या गाडीचा दरवाजा उघडला, तोच मागून येणाऱ्या जोश्वाने अवस्युपाशी येऊन त्याच्या कानात काही सांगितले. विदुषी पॅसेंजर सीटपाशी पोहोचली. तिने दरवाजा खोलला, पण अवस्यु व जोश्वा काहीतरी बोलताहेत हे लक्षात येऊन ती तशीच उभी राहिली.

"उजव्या बाजूला!" जोश्वा अवस्युच्या कानात कुजबुजला.

अवस्युने नकळत त्या दिशेने पाहिले. त्याला एक माणूस दिसला. दिसायला अंगकाठी साधारण, उंची साधारण. अंगात अत्यंत जुने कपडे. त्याच्या दाढीची खुरटे वाढली होती. तो मोबाईलवर बोलत दुसरीकडं पाहण्याचं नाटक करू लागला.

"मी इथं येताना आपल्या हेडकॉर्टरच्या पण बाहेर होता. आता इथं दिसतोय. कदाचित..." जोश्वा पुन्हा अवस्युच्या कानात कुजबुजला.

अवस्युने किशोरकडे जाण्यासाठी पाऊल टाकलं. जोश्वाने त्याला अडवलं. म्हणाला,

"आता नको. तो एकटा आहे, की त्याच्या सोबत कोण आहे माहीत नाही. त्यांनी अटॅक केला, तर आपल्याकडे बॅक-अप पण नाही. विदुषी सोबत आहे सो, नको. अजून काय करतोय पाहू..."

अवस्युला त्याचं म्हणणं पटलं. दरवाजा धरून उभ्या असलेल्या विदुषीला गाडीत बसण्याचा इशारा करून तो देखील गाडीत बसला. जोश्वा त्याने घेऊन आलेल्या पोलीस गाडीत बसला, जी अवस्युच्या गाडीच्या मागे उभी असते. दोन्ही गाड्या हलल्या...

एसपी ऑफिस बाहेर अवस्यु व जोश्वाच्या गाड्या आल्या. गेट मधून एंटर झाल्या. काही ऑफिसर्स त्यांच्याकडे आले. अवस्यु, विदुषी व जोश्वा त्यांच्या त्यांच्या गाडीतून उतरले.

"आजूबाजूला नीट लक्ष ठेवा. कोणाचीही संशयास्पद हालचाल जाणवली तर लगेच अटक करा!" जोश्वाने ऑफिसर्सना इन्स्ट्रुक्शन्स दिल्या.

"हो सर!" ऑफिसरने आदेश स्वीकारले.

आणि मग अवस्यु, विदुषी व जोश्वा आत निघून गेले.

अवस्यु त्याच्या केबिनमध्ये येऊन त्याच्या खुर्चीत बसतो. त्याच्या समोर जोश्वा बसला व त्यांच्या बाजूच्या खुर्चीत विदुषी विसावली. त्यांच्यासोबत आत आलेला एक ऑफिसर अवस्युच्या बाजूला उभारला व त्याने एव्हीडेन्स रिपोर्ट्स टेबलवर मांडायला चालू केलं. दोन वेगवेगळ्या लहान डीस्पोसीबल प्लॅस्टिक बॅगेत एक्रेलिक रेजिन व मेटलने बनवलेले दोन डेन्चर्स [कृत्रिम दात] पण ठेवले. अवस्यु आधी ठेवलेले काही पेपर्स घेऊन पाहत होता. जोश्वा देखील काही रिपोर्ट्स वाचू लागला...

"ट्रक ड्रायव्हरचा पीएम रिपोर्ट?" अवस्यु ऑफिसरला विचारलं.

"हा सर." ऑफिसरने हातातील गठ्ठ्यात रिपोर्ट शोधला व अवस्यु समोर धरला.

अवस्युने तो घेऊन पाहिला.

"एज एक्सपेक्टेड्! बरं हा कशाची शिपमेंट करत होता? म्हणजे हा त्या ब्लास्टमध्ये सामील होता, की...?" अवस्युने रिपोर्ट पाहत विचारलं.

"नाही सर. त्याचा दुर्दैवी मृत्यू झालाय. एक बॉक्स कुणीतरी रस्त्यावर फेकला होता. त्यात तो बॉम्ब होता. अन्फॉर्च्युनेट्ली तो बॉम्ब एक्सप्लोड होण्याच्या वेळी प्रोपेनने भरलेला याचा ट्रक तेथून पास होत होता. पण रहदारी जास्त नसल्याने डिस्ट्रक्शन मोठ्या प्रमाणात होण्याचं टळलं." ऑफिसर म्हणाला.

"बरं; गोकुळ शिरगाव एमआयडीसीच्या सब-इंस्पेक्टरला बोलावलं?" अवस्युने प्रश्न केला.

"हो सर. आलेत ते. बाहेर आहेत." ऑफिसर म्हणाला.

"पाठवा आत. आणि ट्रक ड्रायव्हरच्या नातेवाईकांशी संपर्क साधून मृतदेह लवकरात लवकर त्यांना सुपूर्द करा. आपल्या प्रोसेसचा त्यांना काही त्रास होता कामा नये. आणि सांगितलेल्या कंपन्यांची व डेंटिस्ट्सची लवकरात लवकर माहिती काढा!" अवस्युने त्याला सूचना केली.

"हो."

असं म्हणून ऑफिसर पुरावे प्लेस करण्याचं आपलं काम संपवून निघून गेला. काहीवेळाने सब-इन्स्पेक्टर आत आला. तो सल्युट करून उभा राहिला.

"एट इज! एक्सप्लोजन मोटिव्ह समजला?" अवस्यु त्याला म्हणाला.

"नाही सर!" सब-इन्स्पेक्टर म्हणाला.

"एक्स्टॉर्शनसाठी काही फोन?" अवस्युने विचारलं.

"नाही." ऑफिसर म्हणाला.

"चौकशीत काही कळालं?" अवस्यु.

"हा सर. बॉम्ब असलेला बॉक्स एका बाईकरसोबत असल्याचं दोनशे मीटर अलीकडील सीसीटीव्हीमध्ये सापडलं. त्यामुळं ती गाडी ज्या दिशेनं गेली त्या दिशेच्या व कोल्हापुरातील सर्व पेट्रोल पंप्सवर चौकशी केली. सीबीएसच्या पेट्रोल पंपवर त्यानं पेट्रोल भरलं होतं. तिथून त्याचं क्लोज फुटेज व गाडी नंबर मिळवला. सोबत तो बॉक्स देखील होता. आरटीओ मधून त्याची माहिती काढली. तो बांबवड्याचा असल्याचं समजलं. तेथील पोलिसांनी त्याची चौकशी केली, तेव्हा त्याच्या घरात काही विस्फोटक सामग्री सापडली आहे. ती सील केली गेली आहे व एव्हीडेन्स देखील जमा केले आहेत. महत्त्वाचं म्हणजे तो स्वतः केमिकल इंजिनिअर आहे." सब-इन्स्पेक्टरने खुलासा केला.

"घरात कोणी सापडलं?" अवसयुने विचारलं.

"नाही. घर बंद होतं. पण काही दिवस झालं घर मालकाचं वागणं संशयास्पद होतं असं शेजाऱ्यांनी सांगितलं. कुजलेल्या अंड्यांसारखा खूप उग्र वास येत असल्याचं समजलं म्हणून मग कुलूप तोडून पोलीस आत शिरले, तर तिथं सल्फर आणि पोटॅशियम व इतर एक्सप्लोसिव्ह एलिमेंट्स सापडले." सब-इन्स्पेक्टरने सांगितलं.

"पण प्योर् सल्फरला आणि पोटॅशियमला वास नसतो." जोश्वा शंकेने बोलला.

"माफ करा पुन्हा मधे बोलते, पण कदाचित काही कारणानं सल्फर ऑक्सिजनच्या संपर्कात येऊन सल्फर डायऑक्साईड तयार झालं असेल. ते खूप उग्र असतं. आणि त्याचा कुजलेल्या अंड्यासारखाच वास येतो." विदुषीने शंका निरसन केलं.

"हो असेल." जोश्वा विचार करत म्हणाला व तो सब-इन्स्पेक्टरकडे वळला,

"घराच्या मालकाच नांव?" जोश्वाने त्याला विचारलं.

"हा सर. त्या इसमाचं नांव किशोर उपाशे आहे. शेजारच्या गल्लीत असलेल्या त्याच्या भावाला आत घेतलाय. त्याच्याकडून काही कळेल. अजून तरी काही बोलला नाही. पण प्रयत्न चालू आहेत!" सब-इन्स्पेक्टरने जोश्वाच्या प्रश्नाला उत्तर दिलं.

"त्याला इथं आणलाय?" अवस्युने त्याला विचारलं.

"होय सर. ही दोघांची माहिती." सब-इन्स्पेक्टरने प्रिंटेड पेजेस अवस्युच्या टेबलवर ठेवली.

"धन्यवाद. या तुम्ही." अवस्यु सब-इन्स्पेक्टरला म्हणाला.

सब-इन्स्पेक्टर सल्युट करून निघून गेला. अवस्यु इंटरकॉमचा रिसिव्हर उचलला.

"बांबवडे पोलीस स्टेशनला कनेक्ट करा." अवस्यु इंटरकॉमच्या रिसिव्हर मध्ये बोलला.

काही वेळ गेल्यानंतर फोन कनेक्ट झालाय हे समजल्यावर अवस्यु बोलला,

"हा येस. एसपी बोलतोय. किशोर उपाशेच्या आणि त्याच्या भावाच्या..."

नांव कन्फर्म करण्यासाठी पेपर हाती घेऊन नांव वाचलं आणि पुन्हा रिसिव्हर मध्ये बोलला,

"नरेंद्र उपाशेच्या घरावर लक्ष ठेवून रहा!"

त्याने कागद टेबलवर टाकला.

"ओके सर!" पलिकडून बांबवडे पोलीस स्टेशनचा इंचार्ज असलेला सब-इन्स्पेक्टर बोलला.

अवस्युने त्याला "थँक्स" म्हणून रिसिव्हर ठेवला.

"जोश्वा, इंटेरोगेशन रूममध्ये मेलेल्या लोकांची आयडेंटिटी रिविल झाली?" अवस्यु थोडावेळ विचार करून व काही ठरवून बोलला.

"हो सर. कोल्हापूरपासून साडेसहा किलोमीटरवर असलेल्या गढमुडशिंगी गांवात ते रहात होते. त्यांच्या घरातून तीस देशी बॉम्ब्स् व काही देशी कट्टे वैगरे हत्यारे हाती लागली आहेत. तसेच तिथंही सल्फर, पोटॅशियम व इतर काही आयईडी, डायनामाईट्स, आरडीएक्स वगैरे सापडलेत. तळघरात सगळं लपवून ठेवलं होतं.  ग्रामीण इलाख्यात जंगलातील अवैध शिकारीसाठी हे वापरलं जातं. जे पूर्णपणे गैरकानूनी आहे. हे सगळं मटेरियल तुम्ही रेड मारलेल्या केमिकल फॅक्टरीशी संलग्न असल्याचं दिसतंय. आणि ती तर याच दोन माणसांची होती. म्हणजे ही लीड तर संपलीच!" जोश्वा थोडा नाराज होत म्हणाला.

"अजून नाही! यांच्या कोणाकोणाशी ट्रेड्स व्हायच्या ते शोधून काढा. यांचा कोणी पार्टनर किंवा इन्व्हेस्टर आहे का बघा. यांना काम देणारा कोणी आहे का शोधा." अवस्यु विषवासाने म्हणाला.

"हो..." अवस्युचा मुद्दा पटवून जोश्वा उद्गारला.

"वाटतंय बऱ्याच लोकांना एकत्र करून त्यांना बॉम्ब्स् बनवायचं प्रशिक्षण दिलं गेलंय आणि अशा लोकांचं मोठं जाळं आसपास तयार केलेलं दिसतंय..." अवस्युने त्याचा तर्क बोलून दाखवला.

तोच एक ऑफिसर आत आला.

"सर, बरेच रिपोर्टर्स आपल्याला भेटायला आलेत. आपल्याशी बोलायचंच असा हट्ट धरलाय!" तो म्हणाला.

"बाहेरूनच घालवा त्यांना. इन्वेस्टीगेशन पूर्ण झालं, की एसपी स्वतः बोलावतील म्हणावं त्यांना. तुम्हाला तोंड देत बसलो, तर कामं कधी करू म्हणावं? उद्या हेच आपल्याला निष्क्रिय ठरवतील... जा सांगा त्यांना एसपी कॉल देतील म्हणून. तोवर इकडं फिरकू पण नका म्हणावं आणि अजिबात आपले अंदाज बांधून काही बातमी करू नका म्हणून निक्षून सांगा! काय ते सत्य वेळ आली, की एसपी स्वतः सांगतील म्हणावं!" अवस्यु थोडं वावतागुं म्हणाला.

"ओके सर."

ऑफिसर जाण्यास वळला. अवस्युने त्याला हाक मारली,

"पार्थ!"

ऑफिसरअवस्य ुकडे वळला.

"हा सर?" त्याने विचारलं.

"त्यांच्याशी पोलाईट्ली आणि रिस्पेक्टफुली बोल. वैतागाणे बोलून गेलो, पण त्यांचाही आदर करायला हवाच!" अवस्यु स्वतःवर नियंत्रण आणत शांत होत ऑफिसरला म्हणाला.

"हो सर!"

ऑफिसर दार ओढून घेऊन गेला. मग अवस्यु अधिक चिंतीत झाला. व एव्हीडेन्स पाहू लागला. मग जोश्वा देखील पुराव्यांची विश्लेषण करण्यात मग्न झाला.

अवस्यु दरवाजा खोलून इंटेरोगेशन रूममध्ये आत आला. मागून जोश्वा देखील.

आत - नंदू उपाशे 【जगदीश/सुमेधचा काका】 याला बसवून ठेवला होता. सोबत एक ऑफिसर उभा होता. तो नंदूचे दात चेक करत होता. अवस्यु व जोश्वा आत आलेले पाहून ऑफिसर थांबला. अवस्युने फक्त खुणवून "काही मिळालं का?" म्हणून त्याला विचारलं. ऑफिसर मानेने "नाही" म्हणला. अवस्युने त्याला जाण्यास खूण केली. संकेत समजून ऑफिसर बाहेर गेला.

"नांव काय?" अवस्युने नंदूला विचारलं.

"नरेंद्र उपाशे." नंदूने आपलं नांव सांगितलं.

"मेकॅनिकल इंजिनिअर. राईट?" अवस्युने पुन्हा ओरशन केला.

"हो..." नंदू म्हणाला.

"बोला, तुमचा भाऊ कुठं मिळेल?" अवस्युने पृच्छा केली.

"खरंच माहीत नाही साहेब. आम्ही एकत्र रहात पण नाही..." नंदू कळवळीने म्हणाला.

"त्याच्याकडं फोन आहे?" अवस्युचा प्रश्न.

"आहे. मी नंबर दिलाय बाहेर." नंदू म्हणाला.

"जीपीएस द्वारे ट्रेस चालू आहे." जोश्वाने स्पष्ट केलं.

"तुमचा भाऊ सापडेपर्यंत तुम्हाला इथंच रहावं लागेल!" अवस्युने स्थिती स्पष्ट केली.

"होय साहेब..." मेनी करण्याशिवाय नंदूकडे काही पर्याय नव्हता.

अवस्यु व जोश्वा यांनी इंटेरोगेशन रूम सोडली.

"याच्यावर लक्ष ठेवा! रेकॉर्डसाठी याचे बायोमेट्रिक ट्रेसेस घ्या. सगळं चेकिंग करा. तोंडात अजून नीट तपासा. कुठं जखम आहे, का किंवा कुठं हिडन कम्पार्टमेंट करून ठेवली का बघा. कपडे आणि अगदी शरीरात सुध्दा! हा पण त्यांच्यात सामील असेल, तर याच्याकडे पोईसन असण्याची शक्यता आहे." मघाशी बाहेर आलेल्या व इंटेरोगेशन रूम बाहेर उभ्या ऑफिसरला अवस्यु म्हणाला.

"येस सर!" अवस्युचा आदेश स्वीकारून ऑफिसर पुन्हा इंटेरोगेशन रूममध्ये गेला.

अवस्यु व जोश्वा पुढं चालते झाले...

ऑफिसर्स काम करत असलेल्या ठिकाणी अवस्यु व जोश्वा आले. रात्री झाली होती, पण तरी सगळे जण वॉर सिच्युएशनवर काम करत होते... बाहेरून एक ऑफिसर धावत त्यांच्याकडे आला.

"सर, ताराबाई पार्कमधील साई डेंटल सर्व्हिसचा डेंटिस्ट मृत आढळलाय! त्याच्या ओपीडीचा तपास घेतल्यावर पोलोनियमचे ट्रेसेस सापडलेत!" ऑफिसरने माहिती पुरवली.

"आणखी एक लीड गेली!" जोश्वा वैतागणे उद्गारला.

अवस्युची केबिन... विदुषी अवस्यु व जोश्वासह केबिनमध्ये होते. एक ऑफिसर अवस्युच्या बाजूला उभा होता. अवस्यु त्याच्या समोरील कम्प्युटर स्क्रिनवर नजरा ठेऊन होता. तो पाहत होता, की इंटेरोगेशन रूममध्ये नंदूचे बायोमेट्रिक ट्रेसेस घेतले जात होते व नंतर ऑफिसर्सनी त्याला कपडे काढायला लावून एकजण कपड्यांचे व एकजण त्याचे काळजीपूर्वक चेकिंग करत होते. काम नीट चालू आहे हे पाहून अवस्युने स्क्रिनवरून नजर हटवली.

"या नरेंद्र उपाशेचा फोन जप्त केला असेलच?" अवस्युने जवळील ऑफिसरला विचारलं.

ऑफिसरने समोरील एव्हीडेन्समधून नंदूचा मोबाईल शोधला. अवस्यु समोर धरले.

"हा!"

अवस्यु मोबाईल घेऊन गॅलरी वैगैरे चेक करू लागला.

"नरेंद्रला किशोरला फोन लावायला सांगितला होता, त्याच्याकडून माहिती काढून घेण्यासाठी. पण किशोरने फोन उचलला नाही." ऑफिसरने क्लिअर केलं.

"तो उचलणार पण नाही!" अवस्यु मोबाईलमध्ये पाहत म्हणाला.

व अवस्युने मोबाईल जोश्वा समोर धरला. त्या मोबाईलमध्ये रेस्टॉरंट बाहेर पाळतीवर असणारा माणसाचा कुठेतरी काढलेला व अवस्युने झूम केलेला फोटो होता.

"हा तर..." जोश्वा आश्चर्याने उद्गारला.

बरोबर! याला आता शोधायलाच लागतंय!" अवस्यु शांतपणे म्हणाला.

व अवस्यु मोबाईल मागे घेऊन पुढील फोटो पाहू लागला.

एका फोटोत किशोर जगदीश सोबत, तर दुसऱ्या फोटोत नरेंद्र सोबत, तर तिघांचा मिळून एक फोटो, मग नरेंद्रच्या मुलांसोबत, मित्रांसोबत असे काही फोटोज्...

"हेडकॉर्ट्सचा एरिया पिंजून काढा. हा इथंच असला पाहिजे!" जोश्वा एकसाईट होत व त्यापेक्षा चिडून ऑफिसरला म्हणाला.

"त्याचा उपयोग नाही. याच्या भावाला जेव्हा आणलेला याने पहिला असेल, त्याचवेळी त्यानं पलायन केले असेल. त्यामुळं इथं याला शोधून वेळ आणि एनर्जी वाया घालवून काही उपयोग नाही." अवस्यु जोश्वाला म्हणाला व त्याने आपला रुख ऑफिसरकडे वळवला,

"याचा मोबाईल ट्रेस झाला?" अवस्युने ऑफिसरला विचारलं.

"स्विच ऑफ आहे. आणि याला शोधून काढायचं म्हणजे मोबाईल कंपनीला कोर्टकडून तसे ऑर्डर्स इशू करावे लागतील. आणि आता कोर्ट उद्याच चालू होईल. त्यामुळे... म्हणून शोधायला वेळ लागतोय." ऑफिसरने स्पष्टीकरण दिलं.

अवस्यु काहीवेळ विचार केला व म्हणाला,

"एवढा वेळ नाही. न्यायाधीशांना भेटा आणि काही होतंय का बघा. परिस्थितीचं गांभिर्य लक्षात घेऊन ते नक्की मदत करतील."

मग घड्याळ पाहून तोच पुढं म्हणाला,

"नाही तर थांबा, मीच कॉल करतो त्यांना!"

ऑफिस फोनवरून अवस्यु न्यायधीशाला फोन लावला...

"गुड इविनिंग सर, एसपी बोलतोय. माफ करा रात्री त्रास देतोय, पण सर एक इमर्जन्सी आहे." अवस्यु नयाधीशांना म्हणाला.

"काही नाही. बोला एसपी साहेब." न्यायाधीश बोलले.

"मोबाईल कंपनीसाठी ट्रॅकिंगची ऑर्डर काढायची होती. कोल्हापूरात चालू असलेल्या बॉम्ब ब्लास्ट्स संदर्भात आहे. उद्यापर्यंत नाही थांबू शकत! प्लिज जरा होईल हे काम?" अवस्यु विनंतीच्या सुरत म्हणाला.

"अहो प्लिज काय? नक्कीच होईल! मला कंपनी व कस्टमरचे डिटेल्स पाठवा." न्यायाधीश पलिकडून म्हणाले.

"हो सर! धन्यवाद! लगेच पाठवतो!" अवस्यु फोन ठेवला.

"नरेंद्रकडून किशोरचे मोबाईल, सिमकार्ड डिटेल्स घेऊन न्यायाधीशांना पाठवा. ते ऑर्डर काढतो म्हणालेत!" तो ऑफिसरला म्हणाला.

"हो सर!" ऑफिसर म्हणाला.

"एक कामच करा. नरेंद्रच्या मोबाईल्सचे डिटेल्स आणि इंटेरोगेशन रूममध्ये आत्महत्या केलेल्या दोघांचे मोबाईल डिटेल्स पण सायमल्टेनियस्ली काढा व संबंधित मोबाईल कंपन्यांसाठी पण न्यायाधीशांकडून ऑर्डर्स काढून घ्या. शिवाय आणखी एक ऑर्डर आपल्याला हवी असेल. यांनी सर्वांत जास्त कॉल्स कोणाला केलेत, किंवा कोणाचे कॉल्स रिसिव्ह केलेत याचे डिटेल्सही घ्या व ज्यांच्याशी त्यांचा जास्त संपर्क आलाय त्यांचेही फोटो, कॉल डिटेल्स व रेसिडेन्सील डिटेल्स कंपन्यांकडून मिळवा!" अवस्युने ऑफिसरवर काम सोपवलं.

"येस सर!" ऑफिसरने ते स्वीकारलं.

"बरं, या नरेंद्रच्या घराची झडती घेतली?" अवसयुने ऑफिसरला विचारलं.

"हो. पण काही संशयास्पद नाही सापडलं." ऑफिसरने खुलासा केला.

"तरीही त्याला चौकशीपासून दूर ठेऊ नका! लहानातील लहान इन्फॉर्मेशन पण आपल्याला सध्या गरजेची आहे! चौकशी करत असताना त्यांच्या हक्कांचं वायलेशन होणार नाही याची मात्र काळजी घ्या." अवस्युने स्ट्रिक इन्स्ट्रुक्शन दिली.

"हो."

म्हणून ऑफिसर लगबगीने बाहेर निघून गेला.

"स्विच्ड् ऑफ मोबाईल ट्रॅक करता येतो?" विदुषीने अविश्वासाने विचारलं.

"सिमकार्ड नसलं, तरी बरेच फोन नेटवर्क कनेक्शनसाठी शोध घेत असतात. त्यामुळे स्विच्ड् ऑफ हँडसेट्सना शोधणं कठीण असतं, पण अशक्य नसतं. बट अंगेन, इट डिपेंड्स ऑन हँडसेट ऑर द सॉफ्टवेअर इंस्टोल्ड् इन द हँडसेट!" जोश्वा तिची शंका दूर करण्यासाठी बोलला.

"पण आपण प्रयत्न करू शकतो. कुणी सांगावं तो अशा प्रकारे ट्रेस झालाच तर...?! शिवाय तो कधी ना कधी मोबाईल चालू करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसं जर त्यानं केलं, तर मग तो सापडणं तर अगदीच अवघड नाही." अवस्यु विश्वासाने बोलला.

"ते कसं?" विदुषीने विचारलं.

"त्याचा मोबाईल ज्या टॉवरचा सिग्नल पकडेल, त्याच्या लोकेशनवरून तो कुठं असेल हे कळण्यास मदत होईल. रेस्टॉरंट बाहेर हा कोणाशी तरी फोनवर बोलत होता. मला नाही वाटत तो आपल्याला संशय येऊ नये म्हणून नाटक करत असेल. तो खरंच कोणाशी तरी बोलत होता. त्या परिस्थितीत तो एकाच व्यक्तीशी बोलू शकतो, तो म्हणजे त्याचा सहकारी किंवा बॉस. बॉस असण्याची शक्यता जास्त. कारण तो कोणासाठी तरी काम करतोय हे उघड आहे. नाही तर तो स्वतः आपल्या मागावर का राहिला असता? असो, तर ज्या अर्थी तो सतत कोणाला तरी अपडेट्स देतोय, त्या अर्थी त्याला फोन कधी न कधी चालू करावा लागेलच असा माझा अंदाज आहे. उद्या सकाळपर्यंत तरी तो सिम बदलू शकणार नाही! त्यामुळे आज रात्रीत तो सापडण्याची शक्यता जास्त आहे आणि ही संधी आपण सोडता काम नये." अवस्युने म्हणाला.

"त्याने बॅटरी काढली नसली किंवा मोबाईल फेकून दिला नसला म्हणजे मिळवलं!" जोश्वाने आपली भीती बोलून दाखवली.

"लेट्स होप फॉर द बेस्ट!" अवस्यु होपफुली बोलला.

विदुषीची शंका दूर झालेली होती. गंभीर मुद्रेने तिने मान डोलावली. जोश्वानेही गंभीरपणे मान हलवली.

"चला कंट्रोलरूमला जाऊन थांबू." अवस्यु उठत म्हणाला.

आणि सगळे केबिन बाहेर पडले...

कम्प्युटर्स्, आणि बऱ्याच टॅपिंग, ट्रॅकिंग, इ. सिस्टिम्स इन्स्टॉल असणाऱ्या कंट्रोलरूममध्ये काही ऑफिसर्स् काम करत होते. त्यांच्या हालचालींत लगबग होती. एसपी अवस्यु मागून डीएसपी जोश्वा व सोबत विदुषी आत प्रवेशले. त्यांना पाहून सगळे उठून उभारू लागले.

"नो निड. कामं करा." अवस्यु ऑफिसर्सना म्हणाला.

सर्वांनी पुन्हा आपापली जागा घेतली.

"मोबाईल कंपनीकडून काही इन्फो?" अवस्युने विचारलं.

"कोर्टकडून परमिशन मिळाली, की लगेच स्ट्रेसिंगसाठी प्रयत्न करू म्हणालेत." एका ऑपरेटरने सांगितलं.

"गुड. लेट्स वेट देन..." अवस्यु म्हणाला.

विदुषी तिथली सगळी सिस्टीम कुतूहलाने पाहत होती. अवस्यु व जोश्वाच्या चेहऱ्यावर टेन्शन होतं. समोरील स्क्रिनवर ते डोळे लावून उभे होते. बऱ्याच वेळानंतर...

एक लाल डॉट स्क्रिनवर ब्लिन्क होऊ लागला. सगळेच अलर्ट झाले. सावरले.

"सर लोकेशन आलं!" कंट्रोल्सवर असणारा ऑपरेटर उत्साहाने ओरडला.

कंट्रोलरूमचा फोन वाजला. कंट्रोल ऑफिसरने घाईने कॉल घेतला,

"येस?" (बिट लॉन्ग पॉज) "ओके थँक यु!"

फोन ठेवला व तो अवस्युकडे वळला.

"किशोरचा मोबाईल ऑन झालाय. जो डॉट ब्लिन्क होतोय ते त्याचंच लोकेशन आहे!" ऑफिसर अवस्युला म्हणाला.

"गुड! माझ्या जीपीएसला पाठवा. बाकीच्यांची पण माहिती मिळवा. जोश्वा चल!" अवस्यु उत्साहाने म्हणाला.

आणि अवस्यु घाईने बाहेर पळला. जोश्वा त्याच घाईने बाहेर गेला. विदुषी देखील त्यांच्या मागून गेली...

यावेळी अवस्यु व जोश्वा एकाच गाडीत बसले होते. जोश्वा गाडी चालवत होता. अवस्यु त्याच्या बाजूला. मागील सीटवर विदुषी! नेव्हिगेशन स्क्रिनवर लोकेशन ब्लिन्क होतं होतं. सर्वांनी सीटबेल्ट लावले होते.

"हा मोबाईल जाणीवपूर्वक चालू केला असेल, तर? हा ट्रॅप देखील असू शकतो. प्रत्यक्षात तुला जाण्याची काय गरज नव्हती..." जोश्वाने आपली शंका बोलून दाखवली.

"शू! विदुषी आहे." अवस्यु हळू आवाजात जोश्वाला म्हणाला.

"म्हणूनच म्हणतोय." तरीही जोश्वा बोलला.

आणि काही विशेष नाही असं हास्य चेहऱ्यावर आणत त्याने रीअर व्ह्यूव मिररमध्ये दिसणाऱ्या विदुषीकडे पाहिलं,

"विदू बाळा, तू बरोबर येण्याची गरज नाही." तो तिला म्हणाला.

विदुषी डिफेंड करायला तोंड उघडते तोच...

"ती ऐकणार आहे असं वाटतंय तुला?" अवस्यु मध्येच बोलला.

जोश्वा काय समजायचं ते समजला व सीटमध्ये सिंक होऊन पुढं पाहून गाडी चालवू लागला...

रात्री रहदारी कमी असलेल्या हायवेवरून अवस्युची गाडी वेगाने पुढे सरकत होती... त्याच्यापासून काही अंतरावरून दोन-चार पोलीस गाड्या मागून जात होत्या...

"बॅक-अप टीम, स्टे क्लोज!" जोश्वाने बॅकअपसाठी सोबत असलेल्या ऑफिसर्सना वायरलेस वरून इंफॉर्म केलं.

जोश्वा चालवत असलेली गाडी स्पीडने पुढं गेली. मागून धावणाऱ्या गाड्यांचा स्पीडही वाढला व त्या अवस्युच्या गाडीच्या जवळ होऊ लागल्या...

गोलूल शिरगांव एमआयडीसी एरिया. अवस्युची गाडी थांबली. अवस्यु गाडीतून उतरत असताना त्याचा फोन वाजला.

"विदू, गाडीतच रहा. बाहेर अजिबात पडायचं नाही. सीटवर झोपून रहा." अवस्यु मागे वळून विदुषीला म्हणाला.

विदुषीने गंभीरपणे फक्त मान हलवली.. अवस्यु कॉल घेत गाडीतून उतरला.

"हा बोला!" अवस्यु मोबाईलमध्ये बोलत गाडीतून उतरला.

"सर आपल्याला हवी असलेली जवळपास सगळी माहिती मिळाली आहे." पलिकडून ऑफिसर बोलला.

"प्लिज ब्रिफमध्ये सांगा!" अवस्यु त्या ऑफिसरला म्हणाला.

"हा सगळा धागा दोनच व्यक्तींशी जुडतोय. नांवं तनय आणि विनय राजमाने. पण त्यांना ट्रेस करता येत नाही. कदाचित हँडसेट्स व सिम्स बदलले असतील." ऑफिसरने संक्षेपमध्ये सांगितलं.

"माझ्या मोबाईलला फोटो पाठवा. थँक्स बाय!" वसयु म्हणाला.

अवस्युने कॉल कट केला. काही वेळात मेसेजने अवस्युचा मोबाईल वायब्रेट झाला. मोबाईलवर एमएमएस आला होता. अवस्युने एमएमएस पहिला. विनय व त्याचा भाऊ तनय यांचे फोटो एका खाली एक. अवस्यु मेसेज बॉक्स मधून बाहेर आला.

इतक्यात जोश्वा देखील गाडीतून उतरून अवस्युकडे आला होता. बाकीच्या गाड्यांतूनही ऑफिसर्स उतरून अवस्युपाशी जमा झाले.

"काय?" जोश्वाने अवस्युला विचारलं.

"किशोर सोबतच आणखी दोघे सापडणार आहेत. कदाचित तेच मुख्य सूत्रधार असू शकतात." तो जोश्वाला म्हणाला.

आणि त्याने आपली गन होलस्टर मधून बाहेर काढली.

"चला!" आपल्या साथीदारांना अवस्यु म्हणाला.

"तीन-चार जणं इथं थांबा!" जोश्वा ऑफिसर्सना म्हणाला.

"नको!" अवस्युने थांबवलं.

"का?" जोश्वाने आश्चर्य करत विचारलं.

"इथं जास्त प्रोटेक्शन दिलं, तर त्यांचा संशय प्रामुख्यानं इथंच येईल आणि ते इथं हल्ला चढवतील. विदुषीला सुरक्षित ठेवायचं असेल, तर इथं कमी गार्डीयन्स ठेवणंच शहणपणाचं ठरेल. एकजण इथं लपून थांबू दे. बाकी सोबत या." अवस्यु म्हणाला.

खिडकीतून वाकून त्याने मोबाईल गाडीत असलेल्या विदुषीकडे दिला व तिला म्हणाला,

"घाबरू नको. परिस्थिती हाताबाहेर जातेय असं जाणवलं, तर एसपी ऑफिसला फोन कर. ओके?"

विदुषी मान डोलावली. तिच्या चेहऱ्यावर कमालीचं टेन्शन होतं.

"स्टे पुट!" अवस्यु विदुषीला म्हणाला.

विदुषी सीटवर झोपून राहिली.

"लेट्स गो!" अवस्यु सहकार्यांना म्हणाला.

मागे थांबलेला ऑफिसर तेथेच कव्हर घेऊन सावधपणे लपून राहिला. बाकी सगळे अवस्यु व जोश्वा सोबत गेले. मागे राहिलेल्या ऑफिसरने होलस्टर मधील गन बाहेर खेचली व लपलेल्या जागेवर उभा राहूनच काळजी व लक्षपूर्वक पहारा देऊ लागला.

तिकडे ऑफिसर्स गन उंचावून सावधपणे चालत होते. त्याच्या पुढं चालणारा अवस्यु त्याच्या नेव्हिगेशन डिव्हाईसमध्ये लोकेशन पाहत होता. एक डॉट त्यांच्या दिशेने येत असलेला त्याला लक्षात आलं. त्याने हात उंचावून सर्वांना होल्ड केलं. सर्वजण थांबले. सगळं शांत.

सर्वजण इकडे तिकडे पाहत होते. आणि अचानक समोरून किशोर आला. ऑफिसर्सनी त्याला घेरलं. किशोरच्या उजव्या हातात एक अंगठी होती.

"खबरदार! काही हालचाल करण्याची हिंमत करू नको!" अवस्यु किशोरवर गन पॉईंट करत त्याला म्हणाला.

"तुम्हाला जी माणसं हवी आहेत, ती मी तुम्हाला देऊ शकतो! फक्त माझ्या भावाला जाऊ द्या! त्याचा यात काही दोष नाही!" किशोर अवस्युशि निगोशिएट करण्यासाठी बोलला.

"ते बघू नंतर! आधी तू आमच्या हवाली हो!" अवस्यु किशोरच्या प्रपोसलला जास्त महत्त्व न देता त्याला म्हणाला.

इतक्यात कुठून तरी एक गोळी येऊन एका ऑफिसरला हिट झाली. तो खाली पडला. ऑफिसर्समध्ये खळबळ माजली. सर्वजण अदृष्य लक्षाचा वेध घेण्याचा पवित्र्यात आले. तोच काही लोकांनी तेथे हल्ला चढवला.

ऑफिसर्स व मर्सिनरीजमध्ये शूट आऊट सुरू झालं... जोश्वा व दोन ऑफिसर्स किशोरला कव्हर करत प्रोटेक्शन देत मर्सिनरीजचा सामना करत होते. अवस्यु देखील कव्हर घेऊन त्यांच्याशी लढण्यात व्यस्त झाला होता.

शेवटी यात अवस्युच्या टीमनेच लीड घेतली. ऑफिसर्स कडून मर्सिनरीजना ठार केलं गेलं. अवस्युने मात्र त्याच्या वाट्याला आलेल्या मर्सिनरीजना जखमी केलं होतं. अवस्यु किशोरकडे वळला.

"जखमी झालेत ते हॉस्पिटलला निघा. हल्लेखोरांच्यात जे जखमी आहेत त्यांना पण उचला." जोश्वाने ऑफिसर्सना ऑर्डर केली.

जखमी ऑफिसर्स निघाले. जे मर्सिनरीज अवस्युकडून जखमी झालेत त्यांनाही सोबत नेले गेले. जोश्वा व दोन ऑफिसर्सकडून किशोरला पुन्हा रोडच्या मध्यभागी आणण्यात आलं.

"तुला काही बोलायचंय?" अवस्युने किशोरला जाग्यावरूनच गन पॉईंटवर घेत विचारलं.

"मी... मी खरं सांगतो... ही माणसं माझी नव्हती... मी... विनय आणि तनयचं काम असणार हे. त्यांना तुमच्या हवाली करण्यासाठीच विनयने नको सांगितलेलं असून मी माझा मोबाईल चालू केला आणि त्यांना गुंतवून ठेवण्यासाठी त्यांच्या ऑफिसरवर आलो..." घडलेला प्रकार पाहून घाबरलेला किशोर म्हणाला.

"खरं?!" अवस्युने अविश्वासाने विचारलं.

"विश्वास ठेवा. ते अजूनही त्यांच्या ऑफिसमध्ये असतील... कदाचित... हा! माझ्या मुलाचा फोन आला होता मला. मी तो सायलेंट करायचा विसरलो होतो. विनयला संशय आला असणार आणि म्हणून ही माणसं त्यानंच पाठवली असणार. तुम्हाला खात्री वाटत नसंल, तर G-41 ला तनयच्या राज फर्टिलायझर्सच्या दुसऱ्या मजल्यावर बघा. तिथंच केबिनमध्ये दोघं आहेत... बाजूलाच विनयची मायक्रोटेक कंपनी पण आहे. या कंपन्यांमधून त्यांचा सगळा धंदा चालतो..." अवस्यु कळकळीने म्हणाला.

"मग त्यांना सोडून तू इथं काय करतोयस?" अवस्युला अजूनही पटत नव्हतं.

"तुमच्याशी डील करण्यासाठी आलोय!" किशोर इम्पोज करत ठामपणे म्हणाला.

अवस्यने मग काही ऑफिसर्सना इशाऱ्याने सांगितलेल्या पत्त्यावर पाठवलं. ऑफिसर्स सावधपणे त्या दिशेने निघून गेले.

"ते बॉम्ब स्फोट तू घडवलेस?" अवस्युने अजूनही गन रोखून किशोरला विचारलं.

"सगळे नाही." किशोर शांत होत म्हणाला.

"दुपारी हायवेवर झालेला?" अवस्युने विचारलं.

"हो!" किशोरने मेनी केलं.

"दुपारी पकडलेल्या माणसांनाही तूच मारलंस?" अवस्युने विचारलं.

"हो!" किशोर.

"आणि डेंटिस्ट?" अवस्यु.

"त्याबद्दल काही माहीत नाही!" किशोर.

"हे सगळं का केलंस?" अवस्यु.

"पैशांची गरज होती. म्हणून." किशोर.

"विनय, तनयसाठी?" अवस्यु

"हो!" किशोरने मान्य केलं.

काही वेळाने - जोश्वाने घड्याळ पाहिलं. त्यानं किशोरला मागून पकडून त्याच्या डोक्यावर गन ताणलेली होती. सगळं शांत होतं. अवस्युच्या वॉकी-टॉकी कर्कश आवाज केला. अवस्युने मेसेज रिसिव्ह केला.

"येस?" अवस्यु वॉकी-टॉकीमध्ये बोलला.

"सर, दोन्ही फॅक्टरीज् पाहिल्या.  इथं कोणी नाही!" पलिकडून ऑफीसर बोलला.

किशोर देखील हे ऐकत होता.

"हे... हे शक्य नाही! ते असायला पाहिजेत तिथं!" किशोर विचलित होत ओरडला.

"जे काय असेल ते ऑफिसला चलून बोल!" आता याच्यावर विश्वास ठेवण्यात अर्थ नाही असं वाटून अवस्यु त्याला म्हणाला.

"नाही! मी नाही येणार!" किशोर बिथरून ओरडला.

आणि त्याच्याही नकळत किशोरने जोश्वाची रिव्हॉल्व्हर हिसकावून जोश्वाला समोर केलं व ती रिव्हॉल्व्हर जोश्वाच्या डोक्याला लावली.

"मला... मला जाऊ द्या! माझ्या भावाला पण सोडा! नाही तर... नाही तर हा गेलाच म्हणून समजा..." किशोर ओरडला.

जोश्वा सुटण्यासाठी धडपड होता. अवस्युने त्याला शांत होण्याची खूण केली. किशोरला संशय येऊ नये म्हणून मग जोश्वाने हळूहळू त्याचे प्रयत्न थांबवले.

विनय, तनयच्या शोधात गेलेले ऑफिसर्स परतले, पण जगदीश सोबत. जगदीशला पाहून किशोर अधिकच विचलित झाला.

"तू... तू इथं कसा जग्या?" तो ओरडला.

"तुम्ही फोन उचलला नाही म्हणून मी आपल्याला शोधत फॅक्ट्रीत गेलतो!" जगदीश आपली चूक लक्षात येऊन म्हणाला.

परिस्थिती हाताबाहेर जात आहे असं लक्षात येऊन किशोरने झीटीने मान झटकली.

"शॉ! तुला मी परत येईन म्हणून सांगितलं होतं! कशाला आलास इथं?" तो जगदीशवर डाफरला व अवस्युला म्हणाला,

"ए... ए एसपी! त्याला सोडायला सांग! जाऊ दे त्याला!" संतापाने त्याचा आवाज कापत होता.

"तू इथं ट्रेड करायला आलायस ना?" अवस्यु त्याला शतपणे म्हणाला.

आणि जगदीशला आपल्या मागे घेण्यास जगदीशला धरलेल्या ऑफिसरला त्याने खुणावलं. न्याची नजर किशोरवरच रोखली होती.

"चल आपण ट्रेड करू! तुझा मुलगा इथून सुखरूप जाईल, पण तुला जोश्वाला सोडायला लागेल! कबूल?" अवस्यु किशोरला म्हणाला.

ऑफिसर जगदीशला घेऊन अवस्युच्या मागे येऊन थांबला.

"आणि माझा भाऊ?" किशोरने विचारलं.

"मी तुला बोललोय, आमच्या सोबत चल. काय ते आपण पाहू!" अवस्यु त्याला पुन्हा शांतपणे म्हणाला.

"नाही! काय असेल तो इथंच निर्णय होईल!" अवस्युचे प्रपोसल रिफ्युज करत किशोर ओरडला.

मागे जगदीशने ऑफिसरच्या सुटण्याचा प्रयत्न केला, म्हणून ऑफिसरने त्याला खाली पाडलं व त्याच्यावर गन रोखली. मागे हालचाल झालेली लक्षात येऊन अवस्युने मागे बघितलं. त्याने ऑफिसरला "नाही" अशी मानेने खूण केली.

"ए एसपी, तुझ्या माणसाला आवर नाही तर!" किशोर मोठ्याने चिडून संतापाने ओरडला.

आणि किशोरने जोश्वाच्या कणपट्टीवर रिव्हॉल्व्हर जोरात दाबली. डोक्यात कळ आल्याने जोश्वाला वेदना असह्य झाल्या. तो ओरडला.

जोश्वाचा आवाज ऐकून अवस्युने त्याच्याकडे पाहिलं. त्याच्या लक्षात आलं, की रागाच्या भरात किशोरच्या हातून अनावधानाने ट्रिगर दाबला जातोय. त्यामुळे क्षणाचाही विचार न

करता अवस्युने फायर केलं! किशोरला उजव्या खांद्यावर अवस्युच्या रिव्हॉल्व्हर मधून सुटलेली गोळी लागली. जोश्वाने प्रसंगावधान ठेऊन किशोरच्या हातून रिव्हॉल्व्हर हिसकावली व त्याच्या डाव्या जबड्यावर कोपर मारलं. किशोर खाली कोसळला. जोश्वा किशोरवर रिव्हॉल्व्हर ताणून उभारला. खाली किशोर उलटी करत, तडफडत मरून गेला. जोश्वाने खाली वाकून त्याच्या मानेची नस चेक केली. अवस्युकडे पाहून त्याने किशोर संपला असल्याची खूण केली आणि अचानक त्याचे डोळे विस्फारले.

***बँग!!!***

अवस्युचा डावा हात जगदीशने चालवलेल्या गोळीच्या फोर्समुळे हवेत उंचावला गेला. हात जखमी झालेला झाला. अवस्युने उजवा हात डाव्या हाताने पकडला व त्याने मागे पाहिलं. घाबरलेल्या व त्याहून जास्त चिडलेल्या जगदीशने त्याच्यावर गन ताणलेली त्याने पहिली. तो आणखी एक फायर करणार तोच त्याच्या जवळीच्या ऑफिसरने त्याच्या हातातील गनची बट जगदीशच्या डोक्यात जोरात मारली. जगदीशकडील गनने पुन्हा फायर झालं, पण यावेळी गोळी रस्त्यावर हिट झाली आणि जगदीश रस्त्यावरच आडवा झाला. त्याच्याकडील गन सुटून बाजूला पडली. ऑफिसरने ती पटकन उचलून घेतली. जगदीशचं डोकं सुजलं. इतक्यात जोश्वा लगबगीने जवळ आल्याचं अवस्युला जाणवलं. त्याने जोश्वाकडे पाहिलं.

अवस्युने आपली जखम दाबून ठेलेली होती. जोश्वाने अवस्युची जखम पहिली. ते पाहून जोश्वा खूप चिडला आणि जगदीशला मारण्यासाठी तो पुढं होऊ लागला. अवस्युने त्याचा हात पकडला. मानेने "नको" म्हणाला. जोश्वाने रागाने अवस्युचा हात झटकला व त्याने ऑफिसर्सना ऑर्डर दिली...

"याला कस्टडीत घ्या! किशोरची बॉडी फॉरेन्सिकला पाठवा आणि एरिया साफ करा."

"तनय, विनय इथंच शंभर मीटरच्या आवारात असले पाहिजेत. कसून शोधा! ते सापडायलाच हवेत!" अवस्यु म्हणाला.

"जा! कामाला लागा!" जोश्वा ओरडला.

जोश्वाने दिलेल्या सूचनेनुसार ऑफिसर्स कामाला लागले. जोश्वा अवस्युला घेऊन गाडीकडे निघाला.

जोश्वा अवस्युला धरून गाडीकडे घेऊन येऊ लागला. विदुषीच्या संरक्षणासाठी थांबलेला ऑफिसर पळत जोश्वा व अवस्युकडे आला. तो अवस्युला सावरू लागला.

"जास्त काही नाही. इतरांना मदत करा. जा." अवस्यु त्याला म्हणाला.

ऑफिसर मान डोलावून घाईने निघून गेला. जखमी अवस्यु व जोश्वाला येताना पाहून विदुषी झटकन गाडीतून उतरली.

"हे... हे काय झालं बाबा..." विचलित होऊन घाबरलेल्या विदुषीने विचारलं.

जोश्वाने पुढील पॅसेंजर सीटचा दरवाजा खोलला व अवस्युला आत बसवू लागला.

"जास्त काही नाही. गोळी स्पर्शून गेलीये. काळजी सारखं काही नाही. गाडीत बस." बसता बसता अवस्यु विदुषीला शांत करण्यासाठी तिला आश्वासित करत म्हणाला.

अवस्युला गाडीत बसवून जोश्वा देखील जाऊन ड्रायव्हींग सीटवर बसला. विदुषी देखील मागील सीटवर बसली. ती अजूनही घाबरलेलीच होती...

जोश्वाने गाडी चालू केली, त्याचवेळी एक ऑफिसर हतकडी लावलेल्या जगदीशला घेऊन तेथून पास होत झाला. जगदीश जळजळीत नजरेनं अवस्युकडे पाहत निघून गेला. पण यामुळे अवस्यु मात्र अंतर्मुख झाला. गाडी वलळी. धावू लागली...

"तू का अडवलंस मला?" गाडी चालवत जोश्वा अवस्युवर ओरडला.

"गृहखात्याकडून स्ट्रिक वॉर्निंग आहे, की अननेसेसरी कॅज्युएल्टीज् नकोत! कारण मग सगळं कव्हर करणं अवघड जाईल." अवस्यु आताही शांतपणे बोलला.

मग बराच वेळ शांत बसून पुढे बोलला,

"मला वाटतंय ही केस मार्गी लागल्यावर रिझाईन करावं..."

त्याच्या या वाक्याने जोश्वाला धक्काचा बसला!

"काय? अचानक काय हे? हाताला गोळी लागल्या डोक्याला नाही! काय बडबडतोयस हे? आणि मघाशी मला थांबवायची काही गरज नव्हती. सापासकट त्याची पिल्लं पण मारायची असतात. नाही तर उद्या तीच मोठी होऊन विष ओकतात!" जोश्वा किंचाळला.

"विदुषी आहे..." एवढं च म्हणत अवस्युने जोश्वाला शांत केलं.

विषय संपवण्याचा हा इशारा आहे हे लक्षात घेऊन जोश्वा पुढं काही बोलला नाही. पण जे झालं ते अजिबात त्याला पटलेलं नव्हतं हे त्याच्या हालचाली व चेहऱ्यावरून स्पष्ट दिसतं होतं पण असहाय्यतेमुळे काहीच न बोलता तो ड्राइव्ह करू लागला...

गाडी धावत होती... अवस्यु बाहेर पहात बसला होता. डोक्यात जे घडलं त्याचा विचार आणि डोळ्यांसमोर जगदीश, आधी घाबरलेला आणि मग रागाने फणणारा! अचानक अवस्युचं

लक्ष विरुद्ध दिशेने येणाऱ्या एका गाडीकडे गेलं. तनय गाडी चालवत असताना त्याला दिसला. त्याच्या बाजूला विनय. अवस्युने  स्ट्रेअरिंग पकडलं.

"विदुषी सीटबेल्ट!" अवस्यु जोरात ओरडला.

आणि त्याने स्टेअरिंग जोरात डाव्या बाजूला वळवलं. त्यांची गाडी विनयच्या गाडीला जोरात थडकली.

"एक्सिलरेट!" अवस्यु पुन्हा ओरडला.

हा संकेत जोश्वासाठी होता. जोश्वाने एक्सिलरेटरवर पाय दाबत गाडीची स्पीड वाढवली व विनयची गाडी स्लाईड करवत भिंतीवर धडकवली. अवस्युने मागे विदुषीकडे पाहिलं. सीटबेल्ट असलेल्या तिने अवस्युची सीट मागून घट्ट पकडलेली होती. भीतीने डोळे घट्ट मिटून घेतले होते. तिला सुखरूप पाहून अवस्यु आपला  सीटबेल्ट काढत घाईने गाडीतून उतरला. जोश्वाने त्यांची गाडी मागे घेतली. अवस्युने धावत जाऊन विनयला त्याच्या गाडीतून बाहेर खेचले. विनयच्या हातात तशीच अंगठी होती, जशी मागे किशोरच्या हातात होती.

जोश्वाने देखील तेथे येऊन तनयला पॅसेंजर सीटच्या बाजूनेच बाहेर खेचले. तनयच्या बाजूने गाडी भिंतीला धडकली असल्याने तनयच्या डोक्याला मात्र मार लागलेला होता व त्याचा उजवा हात देखील गाडी जोरात भिंतीला धडकल्याच्या इम्पक्टने जखमी झालेला होता. जोश्वा त्याला ढकलत एका लाईट पोल पाशी घेऊन गेला. हथकडीने त्याला त्या पोलशी जखडून ठेवलं. अवस्युने देखील विनयला जोश्वाकडे ढकललं व त्याच्याकडील हथकडी जोश्वकडे फेकली. जोश्वाने ती झेलली व विनयलाही लाईट पोलशी लॉक केलं आणि बाजूला होत कॉल करू लागला. इतक्यात जगदीशला घेऊन जाणारी पोलीस कार मागून आली. अवस्यु व जोश्वाला पाहून गाडी थांबली. त्यातून एक ऑफिसर उतरून तिथं पळत आला. गाडीत

जगदीश होता, घामाने थबथबलेला. अवस्युने त्याच्याकडे चोरटी नजर टाकली. घामाने जगदीशचे केस देखील ओले झाले होते. पापणीही न लावता जगदीश सूड भावनेने अवस्युकडे पाहत होता. जगदीशच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते. हतकडी असलेल्या हातांनीच ते त्याने पुसले, पण अवस्युवरची त्याची दाहक नजर काही त्याने हटवली नाही. त्याची ती नजर लक्षात येऊन अवस्युने आपली त्याच्यावरचा नजर हटवून येणाऱ्या ऑफिसरकडे पाहिलं.

"सर!" ऑफिसरने अवस्यु व जोश्वाला सल्युट केला.

"यांना हेडकॉर्टरला घेऊन जा. कसून चौकशी करा. मी एसपी सरांना हॉस्पिटलला घेऊन चाललोय." जोश्वा विनय, तनयला अनलॉक करत ऑफिसरला म्हणाला.

ऑफिसर त्यांच्यावर गन पॉईंट करून दोघांना घेऊन गेला. त्यांना गाडीत मागे कोबलं गेलं. ऑफिसरने दोन्ही साईडने दरवाजे लॉक केला व तो देखील पुढं पॅसेंजर सीटवर बसला. ड्रायव्हिंग सीटवर असलेल्या ऑफिसर गाडीने नेली. ते गेलेलं पाहून जोश्वा अवस्युकडे आला. त्याला गाडीकडे नेण्याच्या हेतून जोश्वाने अनावधानाने अवस्युच्या जखम झालेल्या दंडाला धरले. रक्ताने भिजलेला स्पर्श झाल्याने जोश्वाच्या लक्षात आलं, की एक्सिडेंटच्या इम्पॅक्टमुळे रक्तस्राव वाढलाय. पण अवस्युने त्याला काहीही प्रतिक्रिया न देण्याबद्दल खुणावले आणि दोघे गाडीत जाऊन बसले.

अवस्युने मागे विदुषीकडे पाहिलं. मघाशी घाबरली ती आता थोडी सावरली होती.

"ठीक आहेस ना बाळा?" अवस्युने मागे पाहत विदुषीला विचारलं.

"ह... हो..." विदुषी म्हणाली.

"माफ कर. त्यांना पकडण्यासाठी मला हे करावं लागलं. नक्की ठीक आहेस ना?" अवस्युने त्याची बाजू स्पष्ट केली.

"हो बाबा!" अवस्युला समजून घेत विदुषी त्याला म्हणाला.

जोश्वा गाडी चालू करून चालवू लागला.

"तुला असलं काही करण्याची गरज नव्हती. आपल्या ऑफिसर्सनी सांभाळून घेतलं असतं!" जोश्वाने अवस्युला मैत्रीच्या भावनेतून दरडावलं.

"हो. पण ते समोर दिसत असताना मला ते हातचे जाऊ द्यायचे नव्हते." अवस्यु बोलला.

"अरे पण विदुषीचा तरी विचार करायचास! आपण दोघं असतो, तर गोष्ट वेगळी होती. तिला काही झालं असतं तर?" जोश्वाने काळजी प्रकट केली.

"इट्स ओके काका. बाबा अविचाराने आणि मला इजा होईल असं काही वागणार नाहीत याची मला खात्री आहे." म्हणून विदुषीने जोश्वाच्या काळजी मिटवण्याचा प्रयत्न केला.

"बघ माझी मुलगी किती समजूतदार आहे. हे दोघे सापडले. आता मी रिझाईन करायला मोकळा!" अवस्यु स्मित ओठांवर घेत जोश्वाला म्हणाला.

पण त्याच बोलणं जोश्वाला टोमणा असल्यासारखा लागला,

"तुम्ही एकमेकांना सामील आहात, त्यात मी बिचारा काय बोलणार? करा. आपल्याच मनाचं करा..." आपलं काहीच चालत नाही असं वाटून जोश्वा रागाने म्हणाला.

गाडी वेगाने हायवेवरून हॉस्पिटलच्या दिशेने धावू लागली...

हॉस्पिटलचा स्पेशल वॉर्ड... डॉक्टर अवस्युच्या जखमेवर पट्टी बांधत होता...

"खोल जखम नाही. बरं होईल लगेच." डॉक्टर ट्रीटमेंट करत म्हणाला.

"थँक्स डॉक्टर!" जोश्वाने आभार मानले.

डॉक्टरने स्मित करून औषधं लिहून दिली.

"यांनी बरं वाटेल. एक दिवस इथंच आराम करा." प्रिस्क्रिप्शन जोश्वा समोर धरत डॉक्टर म्हणाले.

जोश्वा ती हाती घेतली.

"आणतो."

"थांब! विदू जा बाळा औषध आण." अवस्यु म्हणाला.

"हो बाबा!" विदुषी जोश्वाकडून प्रिस्क्रिप्शन घेऊन बाहेर गेली. डॉक्टरही तिच्यासोबत वॉर्ड बाहेर पडला. जोश्वाचा फोन वाजला. जरा बाजूला होत त्याने फोन घेतला.

"येस?" जोश्वाने मोबाईलमध्ये विचारलं.

पलिकडून त्याला काही सांगण्यात आलं.

"ओके. बाय!" फोन कट करून जोश्वा परत अवस्युकडे आला.

"काय?" अवस्युने विचारलं.

"विनय, तनय विरोधात ठोस पुरावे देखील सापडले. त्यांच्या फॅक्टरीज सील केल्या आहेत. त्याचं एक युनिट शिरोलीत देखील आढळलंय." जोश्वाने माहिती पुरवली.

"गुड!" अवस्यु रिलॅक्स होत उद्गारला.

"पण तुला कसं समजलं, की ते तिथंच असले पाहिजेत?" जोश्वाने अवस्युला विचारलं.

"इंटेरोगेशन रूममध्ये मेलेल्या लोकांचा मृत्यू झाला तो पोलोनियम-210 च्या सिक्रेशनने. आणि ते त्यांना कम्पार्टमेंट असलेले खोटे दात बसवून दातांमध्ये प्लांट केलेलं होतं. आणि हे रिमोट्ली ऑपरेट होतात असं रिपोर्टमध्ये लिहिलं होतं. त्याची रेंज पन्नास ते शंभर मीटरच्या आसपास असणार असा अंदाज आहे. आणि त्यावेळी हेडकॉर्टरच्या आसपास किशोर घुटमळत होता. त्यामुळे याची पुष्टी होते. आणि तसं त्यानं मान्यही केलंय. किशोर मेला तोही पोलोनियमने. मरतानाचे त्याचे सिम्टम्स् इंटेरोगेशन मधल्या लोकांसारखेच होते. म्हणून मी अंदाज लावला, की किशोर मरत असताना विनय आणि तनय जवळच असले पाहिजेत." अवस्युने त्याच्या ठोस तर्क पुरवला.

"गोळी लागल्यावर तुझ्या डोक्यावर परिणाम झालाय असं मला वाटलं होतं, पण नाही. चालतंय अजून!" अवस्युची चेष्टा करत जोश्वा हसत म्हणाला.

त्याच्या या टिप्पणीवर अवस्युही हसला.

'आणि एक करा. दुपारी शिरोलीत सील केलेल्या केमिकल कंपनीचा विनय, तनयच्या कंपनीशी कनेक्शन नक्की असणार. ते शोधून काढा. एव्हीडेन्स म्हणून कामी येईल." तो पुढे म्हणाला.

"होय!" जोश्वा म्हणाला.

"बरं त्या किशोरच्या मुलावर लगेच काही कारवाई नको. किशोरचे अंत्यसंस्कार रीतसर त्याच्याकडून करून घे. आणि मग त्याला जुवेनाईल कोर्टात उपस्थित कर. त्याला रिमांड होमला पाठवण्याचा निर्णय होण्याचीच शक्यता दाट आहे." आता अवस्यु जर गंभीर झाला.

"तुला त्या मुलाची इतकी काळजी का वाटते?" जोश्वाचाही मूड बदलला.

"कारण तो निर्दोष आहे. आणि..." अवस्यु बोलता बोलता मध्येच थांबला.

"आणि?" जोश्वाने चिडून विचारलं.

"तो विदुषीच्याच वयाचा वाटतोय. म्हणून..." अवस्यु खाली पाहत गंभीर होत म्हणाला.

"म्हणून तुला त्याच्याबद्दल सहानुभूती वाटते?!" जोश्वाने विरोध दर्शवत विचारलं.

अवस्युने खाली पाहतच गंभीरपणे मान डोलावली. यावर जोश्वा अधिकच संतापला.

"आणि तुला तो निर्दोष वाटतो? विसरू नको. त्यानं तुझ्यावर गोळी चालवली आहे!"

"ती त्याची स्वाभाविक प्रतिक्रिया होती. त्याच्यासमोर मी त्याच्या बापावर गोळी चालवली. त्यानं दुसरं काय करणं अपेक्षित होतं?" अवस्युने जगदीशला डिफेन्ड करण्यासाठी त्याचा तर्क प्रकट केला.

"गप्प बसणं!" जोश्वा ओरडला! आणि तो संतापाने पुढे म्हणाला,

"कोणीही साधारण माणूस बंदूक उचलणार नाही! तो मुलगाच सायको असणार! अरे, जे लोक कायदे मोडतात त्यांच्यासाठी आपण कायदे का पाळावेत?"

पण अवस्यु शांत आणि गंभीरच होता.

"कारण आपणच कॉन्स्टिट्युशनला नाकारलं, तर इथं राक्षस राज लागू होईल आणि ते होऊ नये म्हणूनच आपल्याला नियमांचं पालन करावंच लागेल." तो म्हणाला.

जोश्वाला हे पटलेलं नव्हतं. तो काही बोलणार इतक्यात विदुषी आत आली. म्हणून तो गप्पच राहिला. विदुषीच्या हाती औषधांसोबत जेवणाचे पॅकेट पण होते.

"बाबा. औषध! जेवण पण आणलंय. जेवून औषध घ्या." विदुषी अवस्युला म्हणाली.

"आताच्या आत्ता दे. जरा झोपू दे निवांत!" जोश्वा अवस्युवर अजूनही चिडून होता, पण ते न दाखवता तो मस्करीत म्हणाला.

"डॉक्टर म्हणालेत आधी काहीतरी खायला द्या." विदुषी पॅकेट्स बाहेर काढत बोलली.

विदुषीने अवस्युला जेवण वाढून दिलं।

"तुम्ही?" अवस्युने प्लेट घेत विदुषी व जोश्वाला विचारलं.

"आम्ही घेतो सोबत. घे तू? आम्ही आहोत कँटीनमध्ये." जोश्वा अवस्युला म्हणाला व विदुषीला बोलला,

"जाऊ या?"

"हं!" म्हणत विदुषीने अवस्युला त्याचा मोबाईल परत केला व त्याला म्हणाली,

"बाबा, खाऊन झालं, की काकांच्या मोबाईलवर कॉल करा."

"हो!" अवस्यु.

"चलूया?" जोश्वाने विदुषीला विचारलं.

चेहऱ्यावर नाराजी असलेल्या विदुषीने मान डोलावली व दरवाजाकडे वळली. जोश्वा तिच्या सोबत गेला. अवस्युने जेवण चालू केले...

मध्यरात्र झाली होती. अवस्यु हॉस्पिटल बेडवर पडून होता. बाजूला विदुषी स्टूलवर बसून होती. तिचा डोळा लागला होता. ती बेडवर डोकं ठेवून झोपली होती. अवस्युला मध्येच जाग आली. त्याला लक्षात आलं, की विदुषी जवळच आहे. त्यानं प्रेमानं तिच्या डोक्यावरून हात फिरवला व डोक्यावर तसाच हात ठेऊन डोळे मिटून पडून राहिला.

त्याच्या डोळ्यासमोर घाबरला आणि चिडलेला जगदीश अवस्युवर गन ताणून धरलेला. अवस्यु कारमध्ये बसलेला असताना रागीट चेहऱ्याने जगदीश ऑफिसर सोबत अवस्युकडे पाहत तेथून पास झालेला, विनय, तनयला पकडल्यावर अवस्युकडे पाहत असलेला जगदीश. अशा घटना फिरू लागल्या...

चिडलेल्या घामाने ओथंबलेल्या जगदीशने फायर केलेलं त्याला दिसलं.

अवस्यु दचकून जागा झाला. ते स्वप्न व आठवणी होत्या हे लक्षात येऊन सावरला. विदुषी बसलेल्या दिशेने त्याने पाहिलं. बाजूला विदुषी नव्हती. अवस्यु थोडा पॅनिक झाला. त्याने उठून तिला बाल्कनीत पाहिलं. ती तिथंही नव्हती. म्हणून मग काळजीने तिला शोधायला तो वॉर्डमधून बाहेर पडला.

पहाट झाली असल्याने वर्दळ खूपच कमी होती. अवस्यु अगतिक होऊन त्याच्या फ्लोअरभर विदुषीला शोधत वेड्यासारखा फिरला...

अवस्यु विदुषीला शोधत शोधत त्याच्या फ्लोअर वरील ओपन गार्डनमध्ये आला. विदुषी बाहेर पाहत रडत असल्याचं अवस्युला जाणवलं. तो तिच्यापाशी जाऊन उभारला. पण काही बोलला नाही. विदुषीने त्याच्या नकळत तिचे डोळे पुसते. थोडावेळ असाच गेला. खरे तर अवस्युने तो जाऊ दिला. सूर्य दिसत नव्हता, पण आकाश प्रकाशमान होत होतं. उजाडणाऱ्या दिवसाचा अनुभव ते दोघे घेत होते. काहीवेळाने...

"सॉरी बाबा!" दोघांमधली शांतता भंग करत अवस्युकडे न पाहता विदुषी त्याला बोलली.

अवस्युच्या ओठांवर हसू उमटलं. त्यानं रेलिंगवर कोपर ठेऊन विदुषीकडे पाहिलं.

"सॉरी का?" कौतुकाने त्याने विदुषीला विचारलं.

"मी तुमच्या सोबत असून तुमच्या जीवावर बेतलं... मी स्वतःला तुमची लकी मॅस्कॉट समजत होते, पण तसं काही नाही..." विदुषी अपराधीपणे बोलली.

तिच्या डोळ्यांतून पाणी ओघळलं. आणि रडू अनावर होऊन ती रडू लागली...

"अगं ए वेडाबाई; रडतेस काय? अगं खरंच तू आहेसच माझ्यासाठी लकी!" अवस्यु विदुषीला समजावत म्हणाला.

विदुषीने अविश्वासाने अवस्युकडे बघितले. अवस्यु तिला विश्वास देण्यासाठी पुढे म्हणाला,

"खरंच! बघ ना; माझ्या जीवाचं हातावर निभावलं. मी मानतो, तू होतीस म्हणूनच मी वाचलो!"

अवस्युने पुन्हा एक ब्रॉड स्माईल केलं. विदुषीने रडतच त्याला मिठी मारली.

"बाबा..."

अवस्युने प्रेमाने  तिच्या डोक्यावरून हात फिरवला.

"पुन्हा असं अजिबात समजू नको, की तुझ्यामुळं मला काही त्रास होतोय... तूच तर माझ्या जगण्याचं कारण आहेस..." अवस्यु गंभीर होत विदुषीला म्हणाला.

"सॉरी बाबा..." विदुषी त्याला म्हणाली.

"येडं! काय पण विचार करतंय." अवस्यु स्मित करत वातावरण हलकं करण्यासाठी बोलला.

"आणि हा हात असा मोकळा सोडायचा नाही." विदुषी दूर होत म्हणाली.

"येस बॉस!" अवस्यु सल्युट करत एर्जेटिकली तिला म्हणाला.

विदुषीला हसू आलं. तिला हसताना पाहून अवस्यु देखील हसू लागला.

अवस्युचा डावा हात पाऊच आर्म स्लिंगमध्ये होता. हाताला ओढ लागू नये म्हणून विदुषीच्या सांगण्यावर त्याने लगेच अंमल केला होता. तो हॉस्पिटल कँटीनमध्ये जोश्वा सोबत बसला होता. जोश्वाने त्याच्या कंदील पिशवीतून काढून अवस्यु समोर एक कॅन ठेवला.

"कोल्ड कॉफी?" अवस्यु तोंड विचित्र करून उद्गारला.

"पिऊन तर बघ!" जोश्वाने त्याला आग्रह केला.

जोश्वाने स्वतःच्या कॅन वरील स्टिकर थोडं उचकटून अवस्युला दाखवलं. तो बिअर कॅन होता. जोश्वाने पुन्हा ते स्टिकर आहे तसं चिकटवलं व कॅन खोलून पिऊ लागला. अवस्युने देखील त्याला ऑफर केलेला कॅन ओपन करून बिअर टेस्ट केली. आणि चव चाखताच घाटाघट सगळं संपवूनही टाकलं.

"अरे, शिस्तीत... ठसकशील की लेका!" जोश्वा अवस्युला म्हणाला.

"काही नाही होत. आणखी एक दे!" अवस्यु त्याला म्हणाला.

"एक बास! वास आला, तर बाईसाहेब तुझ्या सकट मला पण सोलतील..." जोश्वा त्याला म्हणाला.

"काही नाही होत रे!" म्हणत अवस्युने जोश्वाचा कॅन हिसकावून त्याच अधीरतेने तो कॅनही संपवला.

घोटभर राहील इतकंच त्याने मागे शिल्लक ठेवलं. तेही यासाठी, की त्याचा श्वास संपला होता.

"थँक्स यार याची खूप गरज होती!" कॅन बाजूला करत अवस्यु जोश्वाला म्हणाला.

"मला माहित होतं, तुला लवकर बरं करायला हेच औषध कामी येणार आहे. पण विदुषीच्या लक्षात आलं तर काय करणारायस?" जोश्वा अवस्युला चिडवत म्हणाला.

"तिला सांगेन, हा औषधांचा वास आहे म्हणून." अवस्यु बोलला.

"आणि तिचा विश्वास बसेल असं वाटतंय तुला? तुझी पोरगी आपली पण बाप आहे हे विसरू नको! ती गप्प बसेल, पण फक्त तू पूर्ण बरा होईपर्यंतच. नंतर दोघंही जाऊ बाराच्या भावात..." जोश्वा अवस्युला म्हणाला.

अवस्यु हसला.

"तू उगंच तिला घाबरतोस!" तो जोश्वाला म्हणाला. पण त्याला चिडवणं हा त्याचा हेतू नव्हता.

"का? तू नाहीस घाबरत?" जोश्वाच्या जिव्हारी लागलं होतं.

"नो कमेंट्स."

म्हणत अवस्यु कॅन ओठांकडे नेला तोच...

"विदुषी?" जोश्वाने अवस्युकडून कॅन हिसकावून शेवटचा राहिलेला घोट घेत विदुषी विषयी चौकशी केली.

"घरी गेलीये. येणार आहे थोड्यावेळात." अवस्यु त्याला म्हणाला.

"म्हणजे आज रात्री पण इथंच?" जोश्वाने विचारलं.

"हो उद्या सोडू म्हणालेत डॉक्टर." अवस्युने क्लिअर केलं.

"त्यानांही माहीत असणार आहे तू किती उपद्यापी आहेस ते..." जोश्वा अवस्युला चिडवत म्हणाला.

"विदुषी बाईंचं काम आहे हे." अवस्यु जोश्वाला बोलला.

जोश्वा मोठ्याने हसला.

"ब्लॅक मार्केट मधली तर नाही ना?" अवस्युने रिकाम्या कॅन घेऊन स्टिकर उचकटून पाहत जोश्वाला टोमणा मारला.

"ओ संत! खरेदी केलीये रोख पैसे देऊन! हॉस्पिटलमध्ये आणि तेही विदुषीसमोर घेता येणार नाही म्हणून स्टिकर चिकटवलंय! आणि आता जरा ही बेपर्वाई बंद करा! विदुषी काल रडत होती माझ्याजवळ. किती काळजी वाटते तिला तुझी... काय सांगू..." पुन्हा जोश्वाच्या जिव्हारी लागलं होतं.

"हं! इथून पुढं अजिबातच करणार नाही!" आता मात्र अवस्यु गंभीर होत पुढे बोलला.

"तू अजूनही सीरियस आहेस नोकरी सोडण्याबद्दल?" जोश्वानेही गंभीर होत विचारलं.

"हो!" अवस्यु ठामपणे म्हणाला.

"आणि करणार काय आहेस?" जोश्वाने त्याला दरडावत विचारलं.

"अजून ठरवलं नाही. पण आता बास असं वाटतंय. खूप जणांना मरताना पाहिलंय. आता सहन नाही होत..." अवस्यु अप्राधिपणे म्हणाला.

"हे काय नवीन आहे का आपल्यासाठी? कारवाईत आपल्याकडून कोणी मरतं किंवा आपल्यातंल कोणी मरतं. हा आपल्या कामाचा एक भागच तर आहे!" जोश्वाने विरोध केला.

"आणि तेच आता पहावत नाही..." अवस्युने त्याचा विरोध मोडीत काढला.

"समजलं! अजून पण त्याच मुलाचा विचार चालू आहे तर तुझ्या डोक्यात! तुला त्याच्याबद्दल अपराधी का वाटतंय मला समजना झालंय..." जोश्वा म्हणाला.

"त्याच्या समोर त्याचा बाप मेला..." अवस्युने पुन्हा जगदीशची बाजू घेतली.

"पण ही तुझी चूक नव्हती! फॉरेन्सिकने क्लिअर केलंय. त्याचा पण मृत्यू तुझ्या अंदाजानुसार रेडिओएक्टिव्ह पोईसनमुळंच झालाय!" जोश्वा अवस्युला अपराध भावनेतून बाहेर काढण्यासाठी बोलला.

"हो पण त्याला असं वाटतंय ना, की मीच त्याच्या वडलांना मारलंय. म्हणून तर त्या रागातून त्यानं माझ्यावर गोळी चालवली! मी... मी एक गुन्हेगार तयार केलाय..." अवस्यु अजूनही स्वतःला अपराधी मानत होता.

"वेडा झालायस का? हे काय डोक्यात घेऊन बसलायस तू? थांब विदुषी येऊ दे. तीच तुला सरळ करू शकते!" जोश्वा ओरडला.

"मी स्वतःच तिच्या कानावर घालणार आहे. मला नाही वाटत ती माझ्या निर्णयाच्या पुढं काही बोलेल. ती समंजस आहे. समजून घेईल. आता आपल्याकडून कोणाला काही त्रास होऊ

नये असं काही तरी काम करावं म्हणतोय. त्यातून जमेल तशी समाजसेवाही करीन..." अवस्युने आपला निर्णय सुनावला.

तू ऐकणार नाहीयेस तर?" जोश्वाने त्याला निर्वाणीचं विचारलं.

अवस्यु काही बोलला नाही. आता याला बोलून काहीच उपयोग नाही हे लक्षात येऊन जोश्वाने मुड बदलला.

"बरं ते जाऊ दे. विनय आणि तनयला आज कोर्टात उभं केलेलं. सर्व पुरावे सादर केल्यावर काही पर्याय नाही हे पाहून तनयनं सगळे आरोप आपल्यावर घेतले आहेत. विनयचा बॉम्ब स्फोट प्रकरणाशी काही संबंध नसल्याचं त्यानं सांगितलंय. त्याला अंधारात ठेऊन त्याचा व त्याच्या कंपनीचा उपयोग त्यानं करून घेतला असं त्यानं कोर्टाला सांगितलंय. वर्ल्ड मार्केटमध्ये एक्सप्लोसिव्ह्सची मागणी पाहून आपण त्या बिझनेसमध्ये काही करू असा विचार करून हे काम चालू केलं होतं आणि सुरुवातीला बनवलेल्या बॉम्ब्सचे टेस्टिंग म्हणून त्याने ब्लास्ट्स घडवून आणल्याचं सांगितलं. आता हा तनय जाईलच, पण त्यानं सगळं आपल्या अंगावर घेतल्यामुळं विनय मात्र वाचणार असं दिसतंय." शेवटचं वाक्य तो नाराजीच्या सुरात म्हणाला.

"त्याच्यावर लक्ष ठेऊन रहा. यांना मदत करणाऱ्या सगळ्या माणसांना शोधून आत टाका. यांचे सहकारी कॅप्चर झाल्याशिवाय ही केस संपणार नाही!" अवस्युने जोश्वाला सूचना केली.

"ते तर करावंच लागेल. पण नोकरी सोडण्याबद्दल तू पुन्हा विचार करावास असं मला वाटतं!" जोश्वानेही अवस्युला सूचना केली.

अवस्युने न ऐकल्यासारखं केलं. जोश्वाने असहाय्यतेने कॅन तोंडाला लावला, पण तो रिकामा असल्याचं त्याला जाणवलं. त्यानं कॅन बाजूला केला.

दुसऱ्या दिवशी सकाळी, अवस्यु, जोश्वा, विदुषी गाडीपाशी आले.

"गाडीत बस." अवस्यु विदुषीला म्हणाला.

विदुषी जाऊन गाडीत बसली. अवस्यु जोश्वाला म्हणाला,

"जोश्वा, एक विनंती करायची होती..."

"बोल." जोश्वा.

"मी रिझाईन केल्यानंतर प्लिज डिपार्टमेंट मधलं कोणीच माझ्याशी काही संबंध ठेऊ नका." अवस्युने आग्रह केला.

"अव..." जोश्वा वैतागणे बोलणार तोच अवस्युच त्याला थांबवत मध्येच बोलला,

"तुमच्या कुणाबद्दल माझ्या मनात आकस आहे असं प्लिज समजू नको. फक्त मला माझ्या पूर्व आयुष्याचं सावट माझ्या नवीन आयुष्यावर नाही पडू द्यायचंय इतकंच. बस गाडीत." अवस्युने आपली बाजू मांडली.

"सगळं ठरवलंच आहेस ना? मग उद्यापासून कशाला आज पासूनच संबंध तोडूयात!" जोश्वा नाराजीने चिडून म्हणाला.

आणि असं म्हणून जोश्वा दुसऱ्या गाडीत जाऊन बसला.

"चला!" जोश्वा ड्राआयव्हरला मोठ्याने ओरडलेलं अवस्युला ऐकू आलं.

तो अधिकच नाराज झाला. जोश्वा जाऊन बसलेली गाडी निघून गेली. अवस्युने गंभीरपणे काहीवेळ विचार केला व त्याने गाडीत बसून दार ओढून घेतलं!

## ६. सांप्रत...

अवस्युच्या घराचा दरवाजा उघडला गेला. अवस्यु लंगडत आत आला. सुमेध येऊन गेलेल्या दिवसापासून सगळं तसंच अस्ताव्यस्त पडलेलं होतं. पंचनाम्याचे मार्किंग्स दिसत होते. तो जरा पुढं झाला व त्याने जाग्यावरून सगळीकडं नजर फिरवली. गेले बरेच दिवस घराला कुणाचा सहवास नाही हे दिसून येत होतं. मागे दार बंद झालं. अवस्यु त्याला व विदुषीला बांधून ठेवलेल्या जागेकडे गेला. त्याने खाली पाहिलं. खाली रक्ताचं वाळलेलं थारोळं... मार्किंग्स... अवस्युचा कंठ दाटून आला. विदुषीच्या वाळलेल्या रक्ताकडे त्याने हात पुढे नेला... बॅग्राऊंडला विदुषीचं मंद आवाजात गाणं चालू झालं... बहुदा अवस्युच्या डोक्यात... अवस्युच्या बोटांचा विदुषीच्या रक्ताला स्पर्श झाला आणि...

"बाबा!" विदुषीचा आवाज घरातील शांत वातावरणात घुमला.

विदुषीची ही हाक खोलीभर घुमली. आणि या हाकेसोबतच अवस्युच्या आठवणींमध्ये चालू असलेलं गाणं झटक्यात बंद झालं. अवस्युने आवाजाच्या दिशेने मागे बघितलं व उठून उभा राहिला. त्या दिशेने वळला. आणि त्याला समोर विदुषी दिसली! काहीवेळ स्थिर. मग...

"विदुषी!" अवस्यु गहिवरून डोळ्यांत आसवं घेऊन उद्गारला.

अवस्यु खूपच भावूक झाला होता. डोळ्यांतून अश्रू वाहू लागले होते...

"बाळा..." अवस्यु दाटलेल्या कंठाने पुन्हा म्हणाला.

तो तिच्या दिशेने चालू लागला. विदुषीच्या चेहऱ्यावर निरागस हसू होतं...

सगळे म्हणतात तू..." अवस्यु तिच्याकडे चालत गहिवरला भरात म्हणाला.

"यावेळी अवस्युला थांबवत विदुषी बोलतली...

"होय!"

"विदुषी?..." अवस्युच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले. अविश्वासाने तो उद्गारला.

"होय बाबा! मी नाही या जगात... " विदुषी चेहऱ्यावरचं गोड हसू स्थिर ठेऊन म्हणाली.

"पण मग मला... कशी...?" अवस्युला हा धक्का होता.

"कारण तुमचं माझ्यावर प्रेम आहे. मी अजून तुमच्यामध्ये जिवंत आहे! मला काही हवंय बाबा तुमच्याकडून. द्याल?" विदुषी अमित करत म्हणाली.

अवस्यु: हो! हो बाळा तू बोल! बोल तू!

"माझ्या मृत्यूचा बदला घ्याल? ज्यानं माझ्या स्वप्नांना मारलं, त्याला माराल? त्याला संपवाल; ज्याने मला तुमच्यापासून दूर केलं...?" विदुषीने अवस्युला अनपेक्षित मागणी केली.

"नक्कीच! नक्कीच! तू... तू अजिबात काळजी करू नको बाळा... अजिबात काळजी करू नको...!" दाटलेल्या कंठाने अवस्यु ठाम निर्धाराने म्हणाला.

अवस्युने लॉनमधून चालत येऊन मेनडोअरची बेल वाजवली. जयेशने येऊन दार उघडलं.

"या ना काका आत." जयेश चेहऱ्यावर स्मित आणत म्हणाला.

"इथंच बसूया?" अवस्युने रुक्ष चेहऱ्याने विनंती केली.

"चालेल. थोडा चहा करून आणू?" जयेश मान डोलावून म्हणाला.

"नको बस." अवस्यु म्हणाला.

दोघे पायरीवर बसले. अवस्युने काहीवेळ असाच जाऊ दिला. कदाचित वाक्यं जुळवत असावा. लॉन व त्यात असलेली झाडं निहाळत राहिला फक्त. आणि काहीवेळाने...

"ही झाडं तुझ्या बायकोनं लावलीएत ना?" अवस्युने सरळ मुद्द्याला हात न घालता जयेशला विचारलं.

"हो. आता ती मी वाढवतोय."

नजर फिरवत असताना अवस्युचं लक्ष लॉनवर मध्येच कुठेतरी उभ्या खेळण्यातील बाईकवर पडलं. तो पुन्हा अंतर्मुख झाला. हे जयेशच्या लक्षात आलं. अवस्यु पुन्हा शांत होऊ नये त्याला बोलत ठेवावं म्हणून,

"माझ्या मुलाची आहे. शेवटच्या दिवशी खूप खेळला होता त्याच्यासोबत. उतरतच नव्हता त्याच्यावरून. बहुदा शेवटचं मनसोक्त खेळायचं असावं त्याला..." जयेश अवस्युला म्हणाला.

पण हे बोलत बोलतानाही त्याच्या चेहऱ्यावर दुःख कुठंच नव्हतं. अवस्युला मात्र याच खूप आश्चर्य वाटलं.

"तू इतका शांत कसा राहू शकतोस?" अवस्युने जयेशला विचारलं.

"जे झालं ते झालं. दुःख करून ते थोडीच बदलणार आहे? एक्सेप्टन्स् इस द ग्रेट मेडिसिन आफ्टर ऑल. हे दोघेही माझ्या सतत सोबतच असतात. माझ्या आठवणीत. आजही माझ्या

आयुष्याचा अविभाज्य भाग आहेत. मला अजिबात त्यांची कमी वाटत नाही..." जयेशने जगण्याकडे बघण्याचा त्याचा दृष्टिकोन बोलून दाखवला.

"धाडसी आहेस." अवस्यु त्याच कौतुक कर म्हणाला.

जयेश नुसतंच हसला.

"प्रत्येकाचा दृष्टीकोन असतो इतकंच." तो अवस्युला म्हणाला.

"हे ज्यानं केलं तो सापडला?" अवस्युने आता मुद्द्यावर येत विचारलं.

वातावरण हलकं करण्यासाठी त्याने सुरवातीला वेगळा विषय काढला होता, पण ते तसं होण्याऐवजी ते अधिकच गंभीर झालं होतं. आणि ते असह्य होऊन अवस्युने सुमेध विषयी चौकशी केली.

"नाही. पोलीस शोधताहेत अजून. जोश्वा मॅथ्यूज हे बदली घेऊन आलेले नवीन एसपी आपली केस पाहताहेत. हा गुन्हेगार इतका परफेक्ट आहे, की त्याने काहीच क्लू मागे सोडला नाहीये!" जयेशने चित्र स्पष्ट केलं.

"या जगात काहीच परफेक्ट नाही!" अवस्यु ठामपणे म्हणाला व त्याने जयेशकडे पाहिलं.

"मी तुझी गाडी घेऊन जाऊ? माझ्या गाडीची किल्ली कुठंय मी विसरलोय." अवस्युने जयेशला विचारलं.

"हो काहीच प्रोब्लेम नाही. एक मिनिट, मी किल्ली आणतो." जयेश स्माईल करून म्हणाला.

आणि तो आत जाऊन किल्ली घेऊन आला. त्यानं अवस्युला देऊ केली.

"प्लिज माझ्या गाडीची डुप्लिकेट किल्ली करू घे." जाण्यासाठी उठता उठता अवस्यु जयेशला म्हणाला.

"हो." जयेशने मान्य केलं.

"टाकी पण फुल करून घे. थँक्स!" म्हणून अवस्यु चालू लागला. आणि काही तरी आठवून तो थांबला. जयेशकडे वळला.

"आणि प्लिज; स्टेटमेंट्स मागं घे!" अवस्युने जयेशला सूचना केली.

अवस्युला नेमकं काय म्हणायचं आहे ते जयेश समजला व गंभीर होत त्याने होकारार्थी मान हलवली. अवस्यु जयेशच्या गाडीकडे चालू लागला...

अवस्युने गाडीत बसून दरवाजा ओढून घेतला. गाडी सुरू केली. डॅशबोर्डवर काही कॅसेट्स पडलेली होती. अवस्युचं लक्ष त्याच्याकडे गेलं. त्यात विदुषीच्या गाण्यांची कॅसेट होती. अवस्युने प्लेअरमध्ये कॅसेट इन्सर्ट करून ती प्ले केली. आणि अचानक त्याला काही जाणवलं. त्याने बाजूला पॅसेंजर सीटकडे पाहिलं. तिथं त्याला विदुषी बसलेली दिसली.

"सीटबेल्ट!" अवस्यु विदुषीला म्हणाला.

"आता गरज नाही!" विदुषी गोड स्मित करून म्हणाली.

अवस्युने दुःखी होऊन खाली पाहलं व मग काही तरी ठरव◌ून समोर पाहत गाडी चालू लागला...

## ७. भ्रमंती...

अवस्युने एसपीच्या निवासस्थानी येऊन गाडी पार्क केली.

"गाडीतच बस." अवस्यु त्याला दिसत असलेल्या विदुषीला म्हणाला.

विदुषीने फक्त स्मित केलं. अवस्यु सीटबेल्ट काढून गाडीतून उतरला.

आजूबाजूला असलेले त्याला पाहून आश्चर्य व आनंद या संमिश्र भावनेने भरून गेले होते. एक ऑफिसर उत्सुकतेने त्याच्या जवळ आला. त्यानं अवस्युला सल्युट केलं. अवस्युला पाहून त्याच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडत होता.

"सर!" तो उत्साहाने उद्गारला.

"तुम्ही...?" त्याला न ओळखून अवस्युने त्या ऑफिसरला विचारलं.

"प्रभात वाळुंज सर." ऑफिसरने ओळख करून दिली.

"नवीन?" अवस्युने विचारलं.

"पाच महिने झाले. मी... मी खूप मोठा फॅन आहे सर तुमचा... आपण सॉल्व्ह केलेल्या केसेस दंतकथा असल्या सारख्या ऐकल्यायत मी!" ऑफिसर अजूनही उत्साहातच होता.

अवस्युच्या ओठांवर स्मित उमटतं, पण चेहरा कोरडा.

"आपली काही मदत करू शकतो सर?" ऑफिसरने अवस्युला विचारलं.

"एसपींना भेटायचं होतं." अवस्यु तोच करडा चेहरा ठेऊन त्याला म्हणाला.

"हो सर ऑफिस मध्येच आहेत चला ना!" ऑफिसर एसपी ऑफीसकडे हात करत म्हणाला.

"त्यांना इथंच बोलवाल?" अवस्युने विनंती केली.

"ओके. थांबा बोलावतो." उत्साही ऑफिसरने पुन्हा सल्युट केलं.

"हे करण्याची आवश्यकता नाही. मी आता सामान्य माणूस आहे." आता मात्र अवस्युने त्याला थांबवलं.

"आमच्यासाठी तर इन्स्पिरेशन आहात. सर, एकदा आपल्याशी हात मिळवू शकतो?" ऑफिसर कृतज्ञातापूर्वक म्हणाला.

अवस्युने हात पुढं केला. ऑफिसरने हर्षित होऊन अवस्युशी हस्तांदोलन केलं.

"थँक्स सर. सरांना पाठवतो. बाय." ऑफिसर आनंदाने म्हणाला.

अवस्युला पाहून तो इतका आनंदित झाला होता, की अवस्यु सोबत काय झालंय हे त्याच्या साफ लक्षातून गेलं होतं...

अवस्युने फक्त मान डोलावली. आणि ऑफिसर एसपी ऑफीसकडे निघून गेला. अवस्यु तेथेच उभा राहिला, त्याच्या कर्मस्थळाकडे पाहत. त्या एसपी ऑफीसच्या बिल्डिंगकडे पाहत; जिथे त्याने माहीत नाही किती केसेस सॉल्व्ह केल्या असतील. ती जागा, जिच्या शिवाय कदाचित त्याने आपलं आयुष्य कधी कल्पिलं नसेल, पण जगदीशच्या एका केसमुळं त्याला त्याचं हे कर्मस्थान सोडावं लागलं होतं... आणि आज त्याच मुलामुळे त्याला पुन्हा या ठिकाणी परतावं लागलं होतं...

काही वेळाने जोश्वा रस्ता क्रॉस करत आनंदाने पळत आला. गाड्या ये-जा करताहेत याचं देखील त्याला भान राहिलं नव्हतं. तो अवस्युपाशी आला व त्याने स्वतःला अक्षरशः अवस्युवर झोकून दिलं

"कुठं होतास इतकी वर्षं! साल्या, नोकरी सोडलीस ते सोडलीस, पण काही संबंध पण ठेवला नाहीस! विदुषी भेटायची कधीतरी कार्यक्रमानिमित्त, पण तू तिला ताकीत देऊन ठेवलेलीस म्हणे, की तुझा पत्ता कोणाला द्यायचा नाही..." जोश्वा अवस्युला दहा वर्षांनंतर पहिल्यांदा पाहून आनंदाने बोलून गेला.

अवस्यु खिन्न होता. आणि मग जोश्वाला त्याची  चूक लक्षात येते.

"सॉरी..." तो मग पुढं इतकंच म्हणाला.

"डोन्ट बी! ती अजून आहे माझ्यासोबत." अवस्यु त्याला म्हणाला.

"कुठं?" जोश्वाने गोंधळून विचारलं"

"गाडीत." गाडीकडे पाहत अवस्यु जोश्वाला म्हणाला.

जोश्वानेही गोंधळून गाडीकडे पाहिलं. पण आतापर्यंत गाडीत असलेली विदुषी आता मात्र तेथे नव्हती. विदुषीच्या जाण्याने अवस्युला खूपच मोठा मानसिक धक्का बसलाय असं वाटून जोश्वा दुःखी झाला.

"चल." जोश्वाने अवस्युला घरात चालण्यास सांगितलं.

दोघे निवासस्थानाकडे चालू लागले. अवस्यु लंगडत होता.

"अजून पूर्ण बरा झाला नाहीस वाटतं?" दरवाजा खोलून आत येत जोश्वाने अवस्युला विचारलं.

"गुडघ्यात प्लेट्स बसवलेत." अवस्यु त्याला म्हणाला.

हे ऐकून जोश्वाला अवस्युबद्दल सहानुभूती वाटली. तो त्याला आधार देऊ लागला.

"नाही ठीक आहे." अवस्यु त्याला म्हणाला.

जोश्वा बाजूला झाला.  जोश्वासोबत अवस्यु आत आला.

"एकटाच आहे. ये." अवस्युला जोश्वाने आत येण्यास सांगितलं.

दोघे येऊन लहान डायनिंग टेबलजवळ बसले.

"तुझ्या आवडीचा ब्रँड आहे. घेणार?" अवस्युला रिलॅक्स करण्यासाठी जोश्वाने विचारलं.

अचानक अवस्युला त्याच्या समोर विदुषी दिसली.

"मी तुला गाडीतच बसायला सागितलं होतं ना?" अवस्यु विदुषीला म्हणाला.

"कोणाशी बोलतोयस?" जोश्वाने विचारलं.

अवस्युने जोश्वाकडे पाहिलं. आणि पुन्हा विदुषी बसलेल्या ठिकाणी बघितलं, तर तिथं कोणीच नव्हतं. तो परत दुःखी झाला.

"नाही! काही नको." अवस्युने जोश्वाची ऑफर नाकारली.

"विदुषीबद्दल ऐकून खूप वाईट वाटलं... तिचं पोस्टमार्टम मी होऊ दिलं नाही. तिची विटंबना मी कशी पाहू शकणार होतो... तसेच तिचे अंत्यसंस्कार केले... पण तू सुखरूप आहेस हे पाहून बरं वाटलं हे पण तितकंच खरं आहे. तुला पहायला खूपदा हॉस्पिटलला येऊन गेलो. पण तू कोमात होतास..." जोश्वा गंभीर होत म्हणला.

"केसचं काय झालं?" अवस्यु त्याच्या बोलण्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करत जोश्वाला विचारलं.

अवस्युला याबद्दल बोलायचं नाहीए हे लक्षात घेऊन जोश्वा देखील मुद्द्यावर आला. म्हणून मग जोश्वा देखील मुद्द्यावर आला,

"मी प्रायोरिटी याच केसला दिली आहे, पण खूप मागोवा घेऊन देखील खुनी सापडला नाही! स्पीड मोनेटरिंग सिस्टीम, वेहिकल ट्रॅकींग सिस्टीम, जेवढं उपलब्ध आहे, त्या सगळ्याचं सहाय्य घेतलं. पण तो माणूस काही ट्रॅक झाला नाही. लोकेशन राहूच दे, पण त्याची नंबर प्लेट देखील रजिस्टर होऊ शकली नाही. रस्त्यांवर नवीन इंस्टोल केलेल्या रिमोट सेन्सिंग टेक्नॉलॉजीचा पण आधार घेतला. खुनीच्या गाडीचं पियुसी टेस्टिंग करून डिव्हाईसचा कॅमेरा नंबरप्लेट डाटाबेसवरून त्याच्या गाडीचं मॉडेल, फ्युल टाईप इत्यादी माहिती मिळेल असं वाटलं होतं, पण तेही व्यर्थ गेलं. सगळी डिव्हाईसेस हॅक्ड् झाली होती. तुझ्या एरियात सीसीटीव्ही कॅमेराज् तर ती घटना घडायच्या एक तास आधी लॉक झाले होते. आणि घटनेनंतर एका तासाने ते पुन्हा व्यवस्थित चालू झाले. देअर इज नो एव्हीडेन्स लेफ्ट बाय कल्प्रिट... तुझा काय प्लॅन आहे?" त्यानं अवस्युला विचारलं.

"माझं अर्धवट राहिलेलं लास्ट असाईंमेंट पूर्ण करणाराय!" अवस्युने निर्णय सुनावला.

जोश्वाला अवस्युच्या बोलण्याचा रोख कळला नाही.

"म्हणजे?" अवस्युने गोंधळून विचारलं.

ज्या राक्षसाला मी जन्माला घातलं, त्याचा अंतही मीच करणार! आय हॅव टू डू एव्हरीथिंग दॅट कॅन पोसिबल!" अवस्यु कोल्डली बोलला.

अजूनही जोश्वाला हिशोब लागला नव्हता. त्याच्या चेहऱ्यावरचं प्रश्नचिन्ह ओळखून अवस्युने त्याच्या कोटाच्या खिशातून एक छोटी डिकम्पोसेंबल प्लास्टिकची बॅग काढून टेबलवर ठेवली.

"ही राऊंड्स्  लीगली, इल्लीगली कोण-कोण वापरतं ते शोधून काढ. त्यांचे पत्ते, नंबर, फोटो सगळी माहिती मिळवं. कोण खरेदी करतं, कोण विकतं, कोठून येतं अगदी सगळं!" तो जोश्वाला म्हणाला.

"ही राऊंड्स्?" जोश्वाने ती पिशवी हातात घेऊन ती नीट पाहत त्याने विचारलं.

"माझ्या शरीरातून काढलेले आहेत." अवस्यु पुन्हा शतपणे म्हणाला.

"ठीक आहे. रीतसर स्टेटमेंट दे. मी शोध घेतो." जोश्वा त्याला म्हणाला.

"मला पोलिसांची मदत नको आहे. मला माझ्या मित्राची मदत हवी आहे! ही लढाई माझी आहे, आणि ती मीच लढणार!" अवस्यु जोश्वाला कठोरपणे बोलला.

"अवस्यु! मी इथं तुझी मदतच करायला बदली घेऊन आलोय. पण मी तुला कायदा हातात घेऊ देणार नाही! तू ऑफिशयल होतास तेव्हा ठीक होतं, पण आता नाही!" जोश्वाने प्रोटेस्ट केला.

"येतो मी." अवस्यु जोश्वाच्या हातून प्लॅस्टिक बॅग घेऊन उठत म्हणाला.

जोश्वाने त्याला थांबण्यासाठी त्याचा हात पकडला.

"बस इथं!" तो म्हणाला.

अवस्युने त्याच्याकडे पाहलंही नाही. जोश्वा रागाने ओरडला,

"इथं बस!"

मग अवस्युच्या हातून प्लॅस्टिक बॅग हिसकावून जोश्वा तिरिमिरीत बाहेर निघून गेला...

जोश्वा येईपर्यंत तासभर अवस्यु डोळे झाकून मागे डोके टेकवून बसला होता. त्याच्या डोक्यात विदुषीचं गाणं घुमतं होतं. जणू विदुषी त्याच्या बाजूलाच बसून गाणं म्हणत होती, इतकं त्याला ते प्रकर्षाने ऐकू येत होतं. जोश्वा अवस्युजवळ आला व कागदांचा गठ्ठा त्याच्या समोर टेबलवर त्याने आदळला. त्या आवाजाने अवस्युची तंद्री भंग पावली. त्याने जोश्वाकडे पाहिलं.

"तुला हवी असलेली माहिती!" जोश्वा बेमनाने म्हणाला.

आपल्या अंगातील बुलेटप्रूफ व्हेस्ट काढून त्याने अवस्यु समोर टाकलं. ते खाली पडेल तसं अवस्युच्या बाजूला खुर्चीत असलेली विदुषी अदृश्य होत गेली...

"मला माहित आहे, तू थांबणार नाहीस! तुझ्या चेहऱ्यावरच दिसतंय! पण मी प्रयत्न करणार आहे!" जोश्वा अवस्युला ठामपणे म्हणाला.

अवस्युने ते कागद हातात घेऊन पाहिले. अवस्युच्या घरातील पंचनाम्याची कागदपत्रे सुरुवातीला होती. खालील पानांवर विनयला त्याच्या बिझनेसमध्ये मदत करणाऱ्या लोकांची व अवस्यु व विदुषीला मारण्यासाठी वापरलेले राऊंड्स् वापरणाऱ्यांची माहिती होती. शेवटच्या दोन कागदांवर अनुक्रमे विनय व सुमेधची माहिती. त्याचे ते दोन फोटो व माहिती अवस्युने काळजीपूर्वक पाहिलं.

"मोठ्या कष्टाने तू याचं साम्राज्य उभं होण्याआधीच उलथवून लावलंस! पण तू रिझाईन केल्यावर नंतर आलेल्या अधिकाऱ्यांनी ते खतपाणी खालून वाढवलं! बघितलंस? या ज्या तुला गोळ्या घातल्या ना? त्यांचं मॅन्युफॅक्चरिंग आणि डिलिंग हा विनयच करतोय! हे तू तुझ्या कर्तव्याकडं दुर्लक्ष केल्यामुळं झालंय! पण माझं कधी ऐकलंयस तू? आणि तो पोरगा, त्याला

त्याचवेळी संपव म्हणालो होतो तुला, पण त्यावेळी ऐकलं नाहीस माझं! शेवटी त्यानं दाखवली ना औकात?! तेव्हाच माझं ऐकलं असतंस, तर आज आपली विदुषी जिवंत असती!" जोश्वा कळकळीने अवस्युला म्हणाला.

पण अवस्युने त्याच्याकडे लक्ष न देता ते कागद फाडून टाकले आणि उठून जाऊ लागला. जोश्वाने त्याला ढकलून खुर्चीत पाडलं.

"आज पण काही बोलणार नाहीस का?" जोश्वा अवस्युला चिडून म्हणाला.

"तेव्हा माझा कॉन्स्टिट्युशनवर विश्वास होता!" अवस्यु शांतपणे म्हणाला.

"आणि आत्ता?" जोश्वाने चिडून विचारलं.

"अजूनही आहे!" अवस्यु तितक्याच शांतपणे म्हणाला.

त्याच्या शांतते मागं किती मोठं वादळ दडलंय हे जोश्वा ओळखून होता.

"मग न सांगता कुठं जातोयस?" जोश्वाने त्याला विचारलं.

अवस्यु निर्धाराने पुन्हा उभारला.

"हनुमंतांनी रावणाची लंका जाळली, तेव्हा त्याची अर्धी ताकद नष्ट झाली होती. म्हणून भगवान राम यांना त्याच्याशी युद्ध करणं सोपं गेलं होतं!" अवस्यु कोड्यात बोलल्यासारखा जोश्वाला बोलला.

"म्हणजे?" जोश्वाने विचारलं.

"मी आधी सुमेध आणि विनयची सपोर्ट सिस्टीम नष्ट करणार!" अवस्युने त्याचं प्लॅनिंग स्पष्ट केलं.

"म्हणजे आजही तू मनमानीच करणार आहेस तर?" जोश्वा रागाने म्हणाला.

"तुझा प्रॉब्लेम काय आहे? त्यावेळी तू मला यांना संपवायला सांगत होतास आणि आत्ता मी तेच करायला जातोय तर तूच मला अडवतोयस? का? एसपी झालास म्हणून कायद्याने तुझेही हात बांधले?" यावेळी आपली शांतता त्यागून अवस्यु ओरडला.

"टू हेल विथ ज्यूडिशियल सिस्टीम! मी तुला अडवतोय कारण मला तुझी काळजी वाटतीये! तू आता एक नॉर्मल सिटीझन आहेस! आता जर तू कायदा हातात घेतलास, तर त्याचे परिणाम काय होऊ शकतात हे तू देखील चांगलंच जाणून आहेस!" जोश्वाचा ही पारा चढला.

पण स्वतः शांत होत अवस्युला समजावण्याच्या स्वरात तो पुढं म्हणाला,

"हे... हे बघ. जे असेल ते मी करेन! मी वचन देतो, ज्यांनी विदुषीला आपल्यापासून हिरावलंय त्यांना मी जिवंत सोडणार नाही. पण तू शांत रहा. प्लिज..."

जोश्वाने अवस्युला विनंती केली व अवस्युला रोखण्यासाठी अवस्युच्या छातीवर हात ठेवला. अवस्यु तो हात बाजूला सारतो.

"भांडत बसायला मला वेळ नाही! सहकार्याबद्दल धन्यवाद!" अवस्यु कठोर निर्धाराने कठोर वाणीने जोश्वाला म्हणाला.

पण अवस्यु जोश्वकडे लक्ष न देता टेबलवरील बुलेटप्रूफ व्हेस्ट ओढून घेऊन निघून गेला.

अवस्यु गाडीत येऊन बसला. बाजूला पाहिलं. त्याला विदुषी दिसली.

"चलायचं?" त्यांनी रिला विचारलं.

विदुषी स्मित करत "हो!" म्हणाली.

अवस्यु गाडी चालू करून निघून गेला. जोश्वा बाहेर येऊन त्या जाणाऱ्या गाडीकडे पाहत उभा राहिला.

संध्याकाळचं सुमेध रम्य अशा रंकाळ्याकडे पाहत उभा होता. विदुषीचं गाणं ऐकत तो वाफळलेली कॉफी घेत होता. त्याची तंद्री भंग करण्यासाठी त्याचा मोबाईल वाजला.

"बोला." सुमेध मोबाईलमध्ये बोलला.

"अवस्यु जिवंत आहे!" विनयने पलिकडून माहिती पुरवली.

"आपल्याला माहीत नाही का ते? न्यूजमध्ये बऱ्याचदा येऊन गेलंय." सुमेध शांतपणे म्हणाला.

"तू त्याला डोक्यात गोळी घालायला पाहिजे होतीस!" विनय पलिकडून इनसिस्ट करत बोलला.

"त्याच्या मरणाची पूर्ण व्यवस्था मी केली होती. त्याचा शेजारी तिथं आला त्यात माझी चूक नाही!" सुमेध म्हणाला.

"जाऊ दे! एसपी ऑफिसपाशी अवस्यु स्पॉट झालाय. त्याला संपवायला हवं! नाही तर आपल्याला जड जाऊ शकतं..." विनयने सुमेधला आदेशच दिला.

"डोन्ट वरी. मी आहे!" सुमेध त्याला फक्त एवढंच म्हणाला.

आणि त्याने फोन कट करून मोबाईल खिशात सारतो. पुन्हा रंकाळ्याचा अनुभव घेत कॉफी घेतली.

अवस्यु गाडीतून उतरतो. तो जयेशच्या दरवाज्याकडे गेला. बेल वाजवली. जयेशने दार उघडलं. अवस्युने त्याला त्याच्या गाडीची किल्ली परत केली. जयेशने ती किल्ली घेतली व खिशातून अवस्युच्या गाडीची किल्ली काढून त्याच्या समोर धरली.

"ही तुमच्या कारची चावी." जयेश म्हणाला

अवस्यु किल्ली घेतली.

"थँक्स!" अवस्यु कोरडेपणानेच म्हणाला.

तो जाण्यासाठी वळला. तोच...

"काका!" जयेशने अवस्युला हाक मारली.

अवस्युने पुन्हा त्याच्याकडे पाहिलं. जयेशने त्याचा मोबाईल खिशातून काढून अवस्यु समोर धरला.

"हा मोबाईल ठेवा! आपल्याला संपर्कात रहायला मदत होईल. आता आपणच एकमेकांना आहोत. यात विदुषीची गाणी पण आहेत. आपल्याला एकटं नाही वाटणार..." जयेश अवस्युला म्हणाला.

हे बोलत असताना जयेशच्या चेहऱ्यावर स्मितहास्य होतं. हे पाहून अवस्यु अधिकच गंभीर व अंतर्मुख झाला. मोबाईल घेऊन काहीच न बोलता तो निघून गेला. जयेश काही काळ त्याला पाहत उभारला व आत जाऊन त्यानं दार लावून घेतलं.

अवस्युच्या खोलीत, मंद प्रकाश. अवस्युने जयेशने दिलेल्या मोबाईलवर विदुषीचं गाणं प्ले केलं व मोबाईल खिशात टाकून त्याच्या स्टडी टेबलचा ड्रॉव्हर उघडला. ड्रॉव्हर मोकळा होता. अवस्युने त्याचा बेस उचकटला. ड्रॉव्हरमध्ये खाली छुप्या कप्प्यात त्याची "कोल्ट पायथन .357 मॅगनम 2.5 इंच." रिव्हॉल्व्हर होती. बाजूला काही गोळ्या पडल्या होत्या. आणि एक स्पीडलोडर जे गोळ्यांनी भरले होतं. अवस्युने रिव्हॉल्व्हर उचलली. रिकाम्या तीन राखण्यात त्याने गोळ्या भरल्या. सिलेंडर रोल केलं व हॅमर खेचला. त्याने बाजूला पाहिलं. विदुषी जवळच उभी होती. रिव्हॉल्व्हर मागे खोचून गोळ्यांनी भरलेलं स्पीडलोडर पण त्याने खिशात ठेऊन घेतलं. आणि त्याच्या उजवीकडे वळला, जिथे विदुषी उभी होती. अवस्युने तिच्याकडे बघितलं. मग तो कपाटाकडे गेला. नोटांची पाच बंडल्स काढून त्याने ते खिशात ठेऊन घेतले.

"चल!" अवस्यु विदुषीला म्हणाला.

व अवस्यु खोली बाहेर पडला. मागे उभी विदुषी अदृश्य झाली.

अवस्यु गेट खोलून जयेशच्या बंद असलेल्या मुख्य दरवाजाकडे आला. दोन बंडल्स त्याने दरवाज्याच्या फटीतून आत सरकवली. ही अवस्युची जयेशने त्याच्यावर केलेल्या आजपर्यंतच्या खर्चाची तुटपुंजी का होईना पण परतफेड होती.

काही वेळाने मग अवस्यु एका शेड समोर उभा होता. त्या पत्र्याच्या शेडचं दार त्याने वाजवलं. त्याच्या बाजूला विदुषी उभी होती. मोबाईलबर विदुषीचं गाणं चालू होतंच.  एका वृद्ध स्त्रीने येऊन दार उघडलं. अवस्युला त्याच्या मागे नीलिमाचा फोटो टांगलेला दिसला. दुःखी होऊन अपराधी भावनेने अवस्यु काहीवेळ खाली पाहत उभारला आणि मग स्वतःला सावरून

त्याने काही न बोलता पैशांची तीन बंडल्स त्या स्त्री समोर धरली. आपण न केलेल्या अपराधाचं पण त्याला वाटत असणारं ओझं या कृतीने अवस्यु करू पाहत होता. हे न ओळखून तिच्या चेहऱ्यावर होतं ते एक मोठं प्रश्नचिन्ह. त्याने तिच्या हातावर पैसे टेकवले... नीलिमाला आपण वाचवू शकलो नाही याबद्दल त्याला अपराधी वाटत होतं. आणि त्याची ही कृती त्याच्या मनावरील ते ओझं कमी करण्यासाठी होती. जी तशाने कमी होणार नाही हे त्यालाही माहीत होतं... पण हा त्याचा प्रयत्न होता.

"सॉरी..." अवस्यु अपराधीपणे त्या स्त्रीला म्हणाला, जी कदाचित नीलिमाची आई असावी.

तो निघून गेला.  स्त्री त्याच्याकडे बघत राहिली. तो विदुषी पासून पास होईल तशी त्याच्याकडे पाहत स्मित करणारी विदुषी अदृश्य होत गेली...

अवस्युची गाडी कोल्हापूरातील एका 'सुशेन शूटिंग रेंज' नांवाच्या शूटिंग झोनपाशी येऊन थांबली. तो गाडीतून उतरला व आत गेला.

कम्प्युटरवर काम करत असलेला शूटिंग रेंजचा मालक काम मध्येच सोडून अवस्युकडे आला.

"सर, दुकान बंद झालंय." मालक समोट करत अवस्युला म्हणाला.

"फ्यु शॉट्स!" अवस्यु त्याच्या छातीवर पैसे दाबत बोलला.

मालकाने हावऱ्यासारखे पैसे घेतले व म्हणाला,

"इकडे सर."

पैसे पॅन्टच्या खिशात कोंबून तो चालू लागला. अवस्यु देखील इकडे तिकडे पाहत मागून चालत झाला.

मालक अवस्युला रेंजपाशी घेवून आला. एक पिस्टल उचलून लोड करून त्याने त्याला देऊ केली. दरम्यान विदुषीचं गाणंअवस्युच्या मोबाईलवर मंद आवाजात सुरू होतंच.

"माझ्याकडे आहे." अवस्यु त्याची रिव्हॉल्व्हर बाहेर काढत म्हणाला.

त्याने सिलेंडर रिलीज करून समोरील रेंजवर रिव्हॉल्व्हर रोखली. पण अचानक वळून त्याच्या डाव्या बाजूला थोडं लांब असलेल्या व रेंजवर शूट करत असलेल्या माणसाला फायर करून ठार केलं.

***बँग!!!***

अवस्युच्या या कृतीने मालक चिडला व त्याच्याकडील पिस्टलने अवस्युवर फायर करण्यासाठी त्याने पिस्टल उगारली, पण तोच अवस्युने त्याचा हात पकडून फायर करून त्याला देखील ठार केलं.

फायरींगचा आवाज ऐकून काहीजण अवस्यु आलेल्या व दुसऱ्या बाजूला असलेल्या दरवाजांतून पळत आले. ते अवस्युला मारण्याचा प्रयत्न करू लागले. अवस्युही त्यांच्याशी लढू लागला...

त्याच्या रिव्हॉल्व्हरमधील बुलेट्स संपले, मग त्याने स्पीडलोडरमधील बुलेट्स फाईट करतच रिव्हॉल्व्हरमध्ये रिप्लेस केले. अवस्युने सर्वांना मारून टाकलं. या दरम्यान त्याच्याकडील सर्व बुलेट्स संपले होते.

अवस्यु लंगडत मालकापाशी आला. मालकाला त्याने दिलेले पैसे मालकाच्या खिशातून काढून घेतले व बाहेर गेला.

अवस्यु काऊंटरपाशी आला. चालू असलेल्या कम्प्युटरपाशी. त्याने कम्प्युटर एक्सेस करून त्याच्यावरची माहिती पहिली.

या शूटिंग रेंज मधून सप्लाय होत असणाऱ्या खऱ्या गन्स् व अम्युनेशन्सच्या शिपमेंट्सबद्दल माहिती ती माहिती होती. काही वेळातच एक मोठी शिपमेंट रेल्वे स्टेशनवरून रवाना होणार होती.

अवस्युची नजर बाजूला एका खुर्चीवर पडलेल्या कापडी ट्रॅव्हल बॅगवर पडली. ती मोकळी बॅग त्याने उचलली व पुन्हा आत गेला.

तिथं असलेल्या काही वेगवेगळ्या गन्स व गोळ्या त्याने त्या बागेत भरल्या व निघून बाहेर पडला.

अवस्युने शूटिंग रेंज बाहेरून लॉक केली. बॅग गाडीत टाकली व गाडीत बसून निघून गेला...

रात्र झाली होती. सुमेध त्याच्या रूममध्ये वर्कआऊट करत होता. अवस्युशी लवकरच सामना करावा लागणार आहे हे तो ओळखून होता आणि त्यासाठी तो स्वतः तयार करत होता. विनय फणकाऱ्याने दार जोरात ढकलून आत आला आणि त्याने शूटिंग रेंजच्या सीसीटीव्ही कॅमेराजनी कॅप्चर केलेले एनलार्जड् फोटोज सुमेध समोर आदळले.

"अवस्युने त्याचा खेळ चालू केला! तुला आधीच त्याला शोधायला सांगितलं होतं! तो वाचल्याची बातमी आल्यापासून तुला सांगत होतो, तू ऐकलं नाहीस!" विनय ओरडला.

"मी वाट बघतोय!" सुमेध शांतपणे म्हणाला.

"कशाची? माझी वाट लागायची?" विनय वैतागून पुन्हा ओरडला.

"त्याने मला शोधायची! लेट हिम फाईंड मी! देन आय विल हंट हिम!" सुमेध पुशअप्स मारायचे थांबला व म्हणाला.

"का?" वैतागून विनयने विचारलं.

"स्वतःची इच्छा पूर्ण करण्यासाठी तो किती जणांची आयुष्यं विध्वंस करू शकतो हे पहायचंय मला! तो करत असलेलं नुकसान हा तुझा प्रॉब्लेम आहे माझा नाही! आपली डील फक्त अवस्यु पुरती आहे!" सुमेधचे पुन्हा शतपणे उत्तर.

'चर्चा बंद करा' हे दर्शवण्यासाठी सुमेधने पुन्हा पुशअप्स चालू केले. सुमेधचं उत्तर ऐकून विनय तिरिमिरीत निघून गेला.

सुमेधच्या खोलीतून बाहेर येऊन अवस्युने फोन कॉल केला.

"अवस्युला संपवा! जोश्वाचा पाठलाग करा. तो नक्कीच कधी ना कधी त्याला भेटेल! आणि आपल्या सगळ्या ठिकाणांवर माणसं वाढवा! अवस्यु मेलाच पाहिजे!" विनयने पलिकडील व्यक्तीला इन्स्ट्रक्शन्स दिले.

व फोन कट करून सुमेधच्या खोलीकडे नजर टाकून त्याने जागा सोडली.

रात्रीच्या रहदारीत अवस्युची गाडी ट्रॅफिकमधून धावत होती... 'छत्रपती शाहू महाराज टर्मिनस'च्या बॅकसाईडला व्यापारी पेठकडे अवस्युची गाडी वळली व एका बोळात थांबली.

अवस्यु गाडीतून उतरला. त्याने बॅग काढून घेतली. गाडीत विदुषी होतीच. अवस्यु दार झाकून चालू लागला. विदुषीचे गाणे अवस्युच्या मोबाईलवर चालूच होते...

रेल्वे इंजिन दुरुस्ती विभाग. काही रेल्वे इंजिन्स तिथे उभी होती. काही लोकांची मोठाले बॉक्सेस ट्रक्समधून उतरवून ते बॉक्सेस नीट पॅक करण्याची व ते नीट लावण्याची लगबग चालू होती. एक माणूस त्यांच्यावर लक्ष ठेवून मोबाईलवर बोलत होता. त्याने मोबाईल खाली घेतला.

"अर्ध्या तासात रेल्वे येईल. माल लोड करायचाय! घाई करा!" ओरडून काम करणाऱ्या लोकांना म्हणाला.

अवस्यु तिथं आला. त्याने मागून त्या माणसाच्या खांद्यावर हात ठेवला. माणसाने मागे वळून बघितलं.

"काय आहे?" माणूस थोडं रागाने त्याला विचारलं.

कारण तिथं कोणी यावेळेला येणं अपेक्षितच नव्हतं.

"काही नवीन सॅम्पल्स पाठवलेत. ठीक वाटले, तर आताच्या शिपमेंट सोबत पाठवून देऊ असं बॉसनी सांगितलंय!" अवस्यु त्या माणसाला म्हणाला.

"तुला आधी तर कधी पाहिला नाही!" तो माणूस शंका घेत म्हणाला.

अवस्युने बॅग खोलून त्याच्या पायात टाकली. गन्स पाहून अवस्यु खरं बोलतोय अशी त्याला खात्री पटली. तो बॅगमधून गन घेण्यासाठी खाली वाकला. तोच अवस्युने वरून त्याच्या डोक्यात गोळी मारली. सगळे अलर्ट झाले. आणि त्यांच्यात फाईट चालू होते... अवस्युने यांच्यावर देखील काही दया दाखवली नाही.

सगळे मेल्याची खात्री झाल्यावर अवस्युने जोश्वाला आत्ताचं लोकेशन पाठवलं.

अवस्युने बॅगची चेन ओढून ती उचलली आणि तो तेथून निघून गाडीकडे गेला.

विदुषी गाडीपाशी बाहेरच उभी होती. अवस्यु ड्रायव्हिंग सीटकडे गेला.

"बस!" विदुषी दार उघडून गाडीत बसत तो विदुषीला म्हणाला आणि पुन्हा तिच्याकडे नजर टाकली, तर विदुषी तेथे नव्हती.

अवस्यु गाडीत बसला. पॅसेंजर सीटवर त्याला विदुषी बसलेली आढळली. मग त्याने गाडी वळली व तेथून निघून गेला.

अवस्युची गाडी रस्त्यावर जोरात धावते होती. विदुषीचं गाणं मध्येच थांबलं, कारण अवस्युला जोश्वाचा फोन आला होता. त्याच्या मोबाईलची रिंग वाजली...

अवस्युने गाडीच्या प्लेअरवर विदुषीचं गाणं हळू आवाजात लावून मोबाईल मधील प्लेअर बंद केला व कॉल रिसिव्ह केला. त्याच्या बाजूला विदुषी होतीच.

"बोल!" अवस्यु पलिकडील जोश्वाला म्हणाला.

"कसलं लोकेशन आहे?" जोश्वाने पलिकडून विचारलं.

"आर्म्स आणि एक्सप्लोसिव्हची शिपमेंट होत होती. माणसं पाठवून ते जप्त कर. आणि त्यांना कोणी इतकं मोकळं रान दिलं त्याची पण चौकशी कर! सुशेन शूटिंग रेंजला पण एक टीम पाठव." अवस्युने स्पष्ट केलं.

"ओके. तू आत्ता कुठं आहेस?" जोश्वाने विचारलं.

अवस्युने उत्तर न देता फोन कट केला. पुन्हा रिंग वाजली. अवस्युने फोन उचलला.

"आता का उचललास?" जोश्वाने वैतागून विचारलं.

"मला कोणत्या प्रश्नाचं उत्तर तुला द्यायचं नाहीये ते तुला कळावं म्हणून कट केला होता! बोल!" अवस्यु त्याला म्हणाला.

"तुला थांबवायला नाही विचारत आहे मी. बोल कुठं आहेस." जोश्वा त्याला आश्वस्त करत म्हणाला,

"आणि तू सांगितलं नाहीस तर मी तुला शोधू शकत नाही असं समजू नको!" म्हणत त्याने अधिकारवादी धमकी दिली.

जोश्वा रेस्टॉरंट जेवत होता. समोर अवस्यु बसला होता. त्याने पुन्हा मोबाईलवर विदुषीचं गाणं प्ले करून मोबाईल टेबलवर ठेवला. त्याच्याही समोर ताट होतं, पण तो काही खात नव्हता.

"गप्प खा!" जोश्वाने त्याला दरडावले.

आणि जोश्वा त्याला अजून वाढू लागला,

"माझं ना त्या बायकोसारखं झालंय, जी आपल्या नवऱ्याचं पटत नाही म्हणून त्याच्या बरोबर भांडभांड भांडते, पण शेवटी करते तेच जे नवऱ्याला हवं असतं! आणि तुझं त्या टीनेजर सारखं झालंय ज्याला करू नको म्हंटलेलंच आधी करायचं असतं, अंगातली रंग जिरवण्यासाठी! गपचूप खा आता!" लहान मुलाला ओरडावं तसं जोश्वा अवस्युला ओरडला.

पात्र बाजूला ठेऊन जोश्वा पुन्हा जेवू लागला,

"डॉक्टरकडून तुझी औषधं पण आणली आहेत. ती पण घायची आहेत! पेन किलर पण आणलंय. जसा तू वागतोय, त्याची तुला गरज पडणारच आहे!" जेवण करत जोश्वा बोलला.

हे दृश्य पाहून तिथेच बसलेल्या विदुषीने स्मित केलं. विदुषीचं गाणं बॅकग्राऊंडला चालूच होतं.

जेवण झाल्यावर अवस्युने औषधे गपचूप औषधे घेतली व पेन किलरचे इंजेक्शन दंडात इजेक्ट केले.

अवस्यु व जोश्वा रेस्टॉरंट बाहेर आले. गाडीत बसत असताना काहीजणांनी त्यांच्यावर हल्ला केला. जोश्वा व अवस्यु त्यांच्याशी लढू लागले. एकजण अवस्युवर हल्ला करत होता. पण त्यांच्यामध्ये अवस्युला विदुषी दिसत होती. तो माणूस विदुषीवरच हल्ला करतोय असं

अवस्युला भासलं. आणि त्यामुळे एका माणसाला जखडून ठेवलेल्या अवस्युचे डोळे विस्फारले. धरलेल्या व्यक्तीला मारून अवस्युने विदुषीवर होणारा वास्तविक त्याच्यावर होणारा हल्ला वाचवला. तो त्या माणसाला मारणार इतक्यात जोश्वा त्याला आडवलं. जोश्वानेही एकाला गच्च पकडून धरलेलं होतं.

"नाही अवस्यु! पब्लिक एरिया आहे!" जोश्वा ओरडला.

मग अवस्यु व जोश्वाने त्यांना फक्त जखमी केलं.

"अवस्यु, तू निघ! मला टीमला बोलवायला लागेल!" जोश्वा अवस्युला म्हणाला.

अवस्‌युने जोश्वाकडे पाहून होकारार्थी मान हलवली.

"फॉलो कर, पण माझ्यापासून एक पाऊल मागे रहा." अवस्यु त्याला म्हणाला.

जोश्वा देखील मान हलऊन दुजोरा दिला. अवस्युने पकडलेल्या माणसाला ढकलून खाली पाडलं आणि त्याच्या गाडीत बसून तो निघून गेला. या सगळ्या दरम्यान तेथे लोकांची गर्दी झालेली होती. जोश्वाने हाताशी असलेल्या माणसाला गच्च धरून खिशातून फोन काढला व कॉल लावला. त्या गर्दीमध्ये असलेल्या एकाने जवळील माणसाच्या छातीवर टॅप केलं. त्याला इशारा कळला. तो त्याच्या मागून गेला. अजून चार जणांनी त्यांना फॉलो केलं.

अवस्यु शहरातील मध्य हायवेवर गाडी चालवत होता. गाडीच्या प्लेअरवर विदुषीचं गाणं चालू असल्याने अवस्युने कोटच्या आतील खिशातून मोबाईल काढून त्यावर प्ले होणारं गाणं बंद केलं व मोबाईल पुन्हा कोटच्या आतल्या खिशात ठेवला. त्याच्या बाजूची खिडकी उघडी होती. काहीवेळाने एक ब्लॅक हेल्मेट घातलेला बाईकर त्या खिडकीतून दिसू लागला. त्याने त्याची "MAC-10" ही सबमशीनगन उंचावली आणि फायर करू लागला. अवस्यु अलर्ट

झाला. त्याने आपली सीट मागे केली व बाईकरचा हात धरून आपल्या छतीवर आदळून मागे वळवला. विदुषी पॅसेंजर सीटवर होती. तिच्या आरपार गोळ्या खिडकीला व गाडीत इतरत्र हिट होऊ लागल्या. फायर होऊन गाडीच्या काचा फुटल्या. अवस्युने बाईकरची गन हिसकावून घेतली. त्याला आत खेचून दोन पायांच्या मध्ये सीटवर त्याला दाबून त्याच्या हेल्मेटवर अवस्यु फायर करू लागला. हेल्मेट फुटून बाईकरचं डोकं उडेपर्यंत त्याने फायरींग चालू ठेवली. बाईकर मेलाय हे कन्फर्म झाल्यावर अवस्यु त्याला बाहेर ढकलून दिलं. तोच दुसऱ्या म्हणजे विदुषीच्या बाजूने एक बाईकरने अवस्युवर गन रोखली. अवस्युने गाडी त्याला धडकवली.

अवस्युची गाडी बाईकरच्या बाईकला धडकली व ती जाऊन डिवायडरवर आदळली. बाईकर बाईकवरून उडून पलीकडून येणाऱ्या गाडीच्या बॉनेटवर जोरात आदळला आणि रोडवर आपटला. ती गाडी त्याच्यावरून पास झाली...

अवस्युने सुरक्षिततेसाठी त्याच्या बाजूला व विदुषीच्या बाजूला असलेल्या काचा वर केल्या.

तोच आणखी एक बाईकर अवस्युच्या गाडीवर मागून फायर करू लागला.

मागील उरलेली काच तोडून काही गोळ्या आत आल्या. एक गोळी अवस्युच्या सीटला मागे हिट झाली. त्या फोर्सने अवस्युचे डोके बाऊन्स झाले. त्याचसोबत गाडीतील प्लेअर सुद्धा

गोळ्या लागल्याने फुटला व विदुषीचं चालू असलेलं गाणं बंद होतं आणि गाण्यासोबत विदुषीही अदृश्य झाली. समोरील काच देखील गोळ्या लागल्याने फुटली. चिडून अवस्युने रिव्हर्स गिअर टाकला.

अवस्युची गाडी रिव्हर्स जाऊन त्या बाईकरला थडकली. अवस्युने न थांबता बाईक व बाईकरच्या अंगावरून गाडी मागे नेली व पुन्हा गाडी पुढं घेतली आणि पुन्हा बाईकरच्या अंगावरून गाडी चालवली व गाडी स्पीडने पळवू लागला.

मोकळ्या रस्त्याला दोन व डिव्हाईडरच्या बाजूला एक असे बाईकर अवस्युच्या गाडीवर फायर करतच होते. त्यामुळे अवस्युने वर केलेल्या काचाही फुटल्या. गाडी देखील बरीच डॅमेज झालेली होती. डिव्हाईडरच्या साईडच्या बाईकरला अवस्युने गाडी धडकवून डिव्हाईडरला घासत नेलं. तो बाईकर बाईक सोडून अवस्युच्या गाडीच्या रूफवर चढला व गन काढून अवस्युच्या बाजूने खिडकीतून आत फायर करू लागला. अवस्युने त्याचा हात पकडला व त्याला खाली ओढलं. बाईकर अवस्युच्या हाताला लटकत राहिला. त्याचे पाय रस्त्यावर घासत होते. तरी त्याचं फायरींग चालूच होतं. अवस्युने मग त्याच्याकडील MAC-10 ने बाईकरच्या डोक्यात रॅपिड फायर केलं. हेल्मेट फुटून बाईकरच्या डोक्यात गोळी लागली. अवस्युने त्याला सोडून दिलं. बाईकर मागे रोल होत दुसऱ्या बाईकरच्या समोर आला. त्या रस्त्यावर गडगडणाऱ्या बाईकरवरून बाईक हवेत उडवली, पण त्याच्या मागील बाईकरच्या अचानक लक्षात न आल्याने त्याच्या बाईक खाली पडलेला बाईकर आलाच. अवस्युने त्याच्या गाडीचा स्पीड वाढवला. दोन्ही बाईकरही स्पीड वाढवून अवस्युच्या गाडीजवळ पोहोचण्याचा प्रयत्न करू लागले.

इतक्या फायरिंगमुळे अवस्युच्या गाडीचा मागील टायर फुटला होता. त्याची राम रस्त्यावर घासत ठिणग्या सोडत होती. पण याच भान अवस्युला नव्हतं. तो गाडीला लिमिटच्या वर पुश करत होता...

एकजण अवस्युच्या खिडकीजवळ पोहोचला. तो अवस्युवर फायर करणार, इतक्यात अवस्युने त्याला धडकवून बाजूला केलं. तशातही बाईकर फायरींग चालू केलंच. स्पीडने अवस्युची गाडी पुढं जात होती. त्यामुळे गोळ्या मागे हिट होत मागील दारवाजाच्या लॉकवर आदळल्या. लॉक तुटून अवस्युच्या गाडीचा दरवाजा उघडला गेला. मग बाईकरने त्याची बाईक सोडून मागील दारवाजातून अवस्युच्या गाडीत उडी मारली.

मागील सीटवर स्थिरावून बाईकरने MAC-10 काढून अवस्युच्या कनपट्टीवर लावली. तो ट्रिगर दाबणार, इतक्यात अवस्युने उजव्या हाताने त्याचा हात बाजूला केला. तरी गन मधून फायर झालंच. काही बुलेट्स खिडकीतून बाहेर गेल्या, तर काही रूफवर हिट झाल्या. अवस्युने बाईकरच्या हेल्मेटवर डाव्या हाताच्या कोपराने हिट केलं. बाईकरची गनवरील ग्रीप सैल झाली. अवस्युने त्याची गन घेऊन मागे त्याच्या हेल्मेटवर फायर केलं. बाईकर मागे टेकला गेला. ती संधी साधून अवस्युने बाईकरच्या छातीत गोळ्या घातल्या. दरम्यान मागील बाईकरकडून फायरींग चालूच होतं... अवस्युने रागाने हँडब्रेक खेचून गाडी जोरात वळवली.

गाडी 360° फिरली. वेगामुळे आत असलेली बाईकरची डेडबॉडी बाहेर रस्त्यावर फेकली गेली. अवस्युने गाडी न थांबवता स्पीडने पुढे घेतली. बाईकर फायरींग करत त्याच्या दिशेने येत होता. अवस्युने त्याची गाडी बाईकरच्या बाईकला  जोरात धडकवली. बाईक गाडी खाली आली, पण त्या आधीच बाईकरने अवस्युच्या गाडीच्या बॉनेटवर उडी घेतलेली होती. तो

ग्रीप घेऊन बोनेटवर स्थिरावला व आपली मॅक-10 गन अवस्युवर उंचावली. तो फायर करणार, तोच अवस्युने वायपर चालू केला. वायपर बाईकरच्या हाताला जोरात हिट झाला. रॅपिड फायर झालं, पण जरा बाजूला. तेवढ्यात अवस्युने त्याच्या हातातील मॅक-10 मशीन गनने बेभानपणे बाईकरच्या हेल्मेटवर शूट केलं. हेल्मेट फुटतं. सोबत बाईकरचं डोकंही. आणि तो अवस्युच्या गाडी खाली आला. थोडं अंतर जाऊन अवस्युने पुन्हा गाडी वळवली आणि त्याच्या ठरलेल्या मार्गाने तो गाडी घेऊन गेला...

## ८. गंतव्य...

वाटेत कुठंतरी निर्जन ठिकाणी थांबून अवस्युने फुटलेला टायर बदलला आणि तो आपल्या निर्धारित गंतव्याकडे निघाला...

दहा वर्षांपूर्वी ज्या एमआयडीसी एरियातून या सगळ्याचा सुरवात झाली होती, त्या ठिकाणी अवस्यु गाडी आली. सर्व शांत होतं. विनयच्या फॅक्टरीपाशी गाडी येऊन थांबली. अवस्युने मंद आवाजात विदुषीचं गाणं त्याच्या मोबाईलवर लावलं आणि मोबाईल खिशात टाकला. अवस्यु गाडीतून उतरला. शांतता असल्याने दरवाजा झाकल्याचा जोरात आवाज झाला. अवस्युने बॅगेतून त्याला हवी ती वेपन्स, एमोस् व काही ग्रेनेड्स घेऊन बेल्टला लावली.

अवस्यु राज फर्टिलायझर्स या फॅक्टरीकडे चालत आला. बेल्टला लावलेला एक ग्रनेड त्याने त्या फॅक्टरीत टाकला व गन काढून कम्पाऊंड वॉलला सटून उभारला. ग्रनेड एक्सप्लोड झाला. अवस्यु आत जाण्यास वळला, तोच आतील केमिकल्स मुळे त्या फॅक्टरीत खूप मोठा स्फोट झाला. अवस्युने जमिनीवर उडी मारली व डोके झाकून घेतले. त्याच्या अंगावर धूळ व काही सिमेंट-विटांचे तुकडे येऊन पडले.

सगळं पूर्ववत शांत झाल्यावर मग अवस्यु स्वतःला सावरत उठून समोर असलेल्या फॅक्टरीकडे पळला. या एक्सप्लोजनमुळे तेथील गार्ड्स व कामगार अलर्ट झाले होते. त्यांनी त्यांच्या गन्सनी अवस्युवर फायरींग चालू केलं. पण अवस्यु त्यांच्या बुलेट्स डॉज करून व त्यांना मारून विनयच्या मायक्रोटेक कंपनीत शिरला.

अवस्यु त्याच्यावर फायरींग करणाऱ्या लोकांना ठार करत फॅक्टरी मध्ये आत आत घुसू लागला...

अवस्यु केबिनपाशी आला. दारावर फायर करून लाथ मारून त्याने दार तोडलं व आत गेला. कम्प्युटरवर काम करत बसलेला एक माणूस अवस्युला पाहून गन घेऊन उभारला. त्याच्या चेहऱ्यावर कमालीची शांतता होती. अवस्युची त्याला अजिबात कसली ते भीती वाटत नव्हती. अवस्युने चालवलेली गोळी त्याने जरासं तिरकं होत चुकवली व अवस्युवर बॅक फायर केलं. अवस्युच्या रिबच्या ठिकाणी गोळी लागली, पण बुलेट प्रूफ व्हेस्टमुळे अवस्युला इजा झाली नाही. अवस्युने त्याचार पुन्हा फायर केलं. त्या माणसाने पुन्हा डॉज केलं व गन अवस्युवर पॉईंट केली. तो फायर करणार, इतक्यात अवस्युने त्याच्या बेल्टच्या मूनक्लिप होल्डरला असलेल्या गोव्या काढल्या व त्या समोरील माणसावर भिरकावल्या. त्यामुळं गोंधळून त्या व्यक्तीला कुठं फायर करायचं लवकर लक्षात आलं नाही. तरी तो एमलेस फायर करतोच. अवस्यु ती संधी साधून त्याच्याजवळ पोहोचला व गन असलेला त्याचा हात पकडून त्याला पाठीवर लिफ्ट करून खाली आदळलं. आपल्या गनने रिव्हॉल्व्हरने अवस्यु त्याच्यावर फायर करतो, पण... ***क्लिक!*** अवस्युच्या रिव्हॉल्व्ह रमधील बुलेट्स संपल्या होत्या. अवस्युने स्पीडलोडरने त्याची रिव्हॉल्व्हर लोड करू लागला, त्याचवेळी त्या माणसाने त्याच्या हातावर किक मारली. अवस्युची रिव्हॉल्व्हर व स्पीडलोडर सहित बुलेट्स विखुरलेल्या गेल्या. तो माणूस अवस्युची ग्रीप सोडवून उठला. दोघे समोरसमोर आले. दोघांमध्ये तुंबळ मुष्टियुद्ध झालं... अवस्यु त्याच्यावर भारी पडू लागला. त्या माणसाच्या हाती त्याची गन लागली. अवस्युने ती हिसकावली व त्याच्या दोन्ही भुव्यांमध्ये फायर केलं. तो माणूस मागे झुकला गेला. त्याच्या कॉलला पकडलेल्या अवस्युने त्याला सोडून दिलं. माणूस खाली कोसळला. पडण्यापूर्वीच तो मेला होता. अवस्यु चालू असलेल्या कम्प्युटरकडे गेला.

अवस्यु या आधी गेलेल्या ठिकाणांची फुटेजेस स्क्रिनवर दिसली. अवस्युने मग कम्प्युटर संपूर्ण ब्राऊस केला. त्याला दहा वर्षांपूर्वीचे काही पोलीस रेकॉर्ड्स सापडले, ज्यात किशोरच्या मृत्यूची सगळी माहिती होती. शिवाय केस संदर्भात इतर काही महत्त्वाची माहिती. विनय, तनयची देखील...

अवस्युने त्याच्यातील फाईलमधील काही फाईल्सच्या प्रिंट आऊट्स घेतल्या. ते बुलेट प्रूफ व्हेस्टमध्ये ठेवले व सोबत त्या कम्प्युटरची हार्डडिस्क काढून घेतली आणि बाहेर पडला.

अवस्युची डॅमेज्ड् गाडी रस्त्यावर धावत होती. खूपच रात्र होऊन गेल्याने ट्राफिक थोडं कमी... बॅकग्राऊंडला फक्त विदुषीचं गाणं...

अवस्युची गाडी त्याच्या शेवटच्या मुक्कामी येऊन थांबली. विदुषीचं गाणं चालूच होतं... अवस्यु गाडीतून उतरला. विनयचे गार्ड्स सावध झाले व त्यांनी अवस्युवर गन रोखली.

विनय त्याच्या सर्व्हीलीयन्स रूममध्ये स्क्रिनसवर नजर ठेवून होता. मधील मोठ्या स्क्रिनवर त्याला अवस्यु घराबाहेर असल्याचं दिसलं. अवस्युने त्याचा हात आपल्या रिव्हॉल्व्हरकडे नेला त्याने पाहिला. आणि बाजूच्या सर्व स्क्रीन्सवर अवस्युने आतापर्यंत केलेला विध्वंस स्क्रिनवर झळकत होता. शूटिंग रेंज, रेल्वे वेअरहाऊस एरिया, त्याच्या दोन्ही फॅक्टरीज मधील हानी सगळं विनयला दिसतं होतं. त्याच्या चेहऱ्यावर असिमीत संताप जाणवत होता,

पण तो स्वतःला शांत ठेवायचा प्रयत्न करत होता... अवस्युच्या मोबाईलमध्ये वाजणारं विदुषीचं गाणं त्यालाही ऐकू येत होतं.

"येऊ द्या त्याला! सुमेधच्या खोलीपर्यंत लीड करा. शेवटी जो वाचेल, त्याला मी स्वतः संपवेन!" विनय कोल्डली वायरलेसमध्ये बोलला.

विनयच्या घराबाहेर, गन ताणलेले गार्ड्स तसेच मागे सरकले. अवस्यु आपल्या रिव्हॉल्व्हरवर हात ठेवून सावधपणे आत शिरला. बॅकग्राऊंडला विदुषीचं गाणं चालूच...

आतील लोक देखील अवस्युवर गन ताणून उभे होते, पण कोणी फायर करणार नाही हे अवस्युच्या लक्षात आलं होतं. त्यांच्यातील काही सुमेधच्या खोलीकडे वर पाहतात. हे पाहून अवस्युला कोणत्या दिशेला जायचंय हे समजलं. आपल्या रिव्हॉल्व्हरवर तसाच हात ठेवून त्याने पायऱ्या सर केल्या.

अवस्यु दार खोलून आत आला. सुमेध गन घेऊन त्याच्या समोर तयारीत उभाच होता. अवस्युने रिव्हॉल्व्हर वरील हात बाजूला घेतला. आपण इथं लढायला आलो नाही हे त्याने त्यातून दर्शवलं. पण त्याचा संकेत न अंजून आपल्याच धुदीत असलेल्या सुमेधने हे पाहून कुटील स्मित केलं व हातातली गन बाजूला फेकून दिली. सुमेध अवस्युवर हल्ला केला. दोघांच्यात घमासान युद्ध सुरू झालं...

सुमेधने अवस्युच्या जखमी झालेल्या अवयवांवर वार करून त्याला पुन्हा रक्तबंबाळ करून टाकलं, पण अवस्युने देखील सुमेधला जखमी करून सोडलं. शेवटी अनुभवी अवस्युने सुमेधवर विजय मिळवलाच!

# ९. सत्य...

सुमेध खाली पडलेला होता. तो मागे सरकून बसला. चेहरा सुजलेला. डोळे काळे-निळे झालेले. ओठही सुजले व त्यातून रक्त वाहत होतं. उजवा हात निकामी झाला होता. पायांत त्राण राहिले नव्हते. अशा परिस्थितीत देखील त्याच्या चेहऱ्यावर स्मित होतं. त्याची नजर खाली. दीर्घ श्वासोच्छ्वास... अवस्यु मात्र खूप चिडला होता. त्याने त्याची रिव्हॉल्व्हर बाहेर खेचतलो व सुमेधच्या डोक्यावर नेम धरला. बेफामपणे ट्रिगर दाबला. चार क्लिक्स रिकाम्या गेल्या. पाचव्या क्लिकला अवस्यु ट्रिगरवर ग्रीप आवळू लागला, इतक्यात... विदुषी तिथे दृश्य झाली!

"थांबा बाबा! हे तुम्ही नाही आहात. प्लिज शूट नका करू... मी तुम्हाला त्याच्यातला असुर मारण्यासाठी सांगितलं होतं... त्याच्यातला माणूस नाही..."

विदुषीची विनंती ऐकून अवस्युची ट्रिगरवरील ग्रीप सैल झाली. त्याने गन खाली घेतली.

"आता तुझं खेळून झालं असेल, तर जरा बोलूया?" अवस्यु सुमेधला म्हणाला.

व तो वळून टेबलकडे जाऊ लागला. जाता-जाता मोबाईल खिशातून काढून चालू असलेलं विदुषीचं गाणं बंद केलं. अवस्युच्या या मिशनमध्ये पूर्णवेळ चालू असलेलं विदुषीचं गाणं बंद झालं. अवस्यु टेबलकडे जाऊन सुमेधकडे बघत खुर्चीवर बसला. दिरध श्वास घेत... दम खात...

सुमेधही मग स्वतःला सावरत उठला व लंगडत अवस्युच्या समोर खुर्चीवर बसला. अवस्यु त्याच्याकडे वळला. आपली रिव्हॉल्व्हर रिलोड केली. पाचव्या सहाव्या रखाण्यात बुलेट्स शिल्लक होत्या. रिकाम्या खाचेत चार बुलेट्स लोड करून हॅमर रिलीज करून अवस्युने रिव्हॉल्व्हर टेबलवर ठेवली.

"तुझी मुलगी... खरंच खूप सूंदर गायची!" सुमेधला हरल्याची अनुभूती त्याला झाली आहे. तो खाली पाहत बोलला.

"तरी तू तिला मारलंस!" अवस्यु शांतपणे त्याला गुन्हेगार ठरवत म्हणाला.

"तू नाही माझ्या बापाला मारलंस?!" अवस्युने त्याला तितक्याच शांतपणे प्रश्न केला.

"नाही!" अवस्यु म्हणाला.

"हं! खोटं! मी स्वतः तुला माझ्या वडिलांवर गोळी चालवताना पाहिलंय..." अवस्यु त्याला मग्रुरीने म्हणाला.

"मी गोळी चालवली होती, पण तुझे वडील माझ्या गोळीने नाही, तर पॉयजनमुळं मेलेत! आणि ते तुझ्या वडिलांना विनयनं दिलं होतं!" अवस्युने त्याला सत्य सांगण्याचा प्रयत्न केला.

पण सुमेधला अवस्यु स्वतःला निर्दोष सिद्ध करायला खोटं बोलतोय असं वाटलं.

"पुन्हा खोटं!" तो ओरडला.

"अजिबात नाही! किशोर पोलोनियम-210 या रेडिओएक्टिव्ह एलिमेंटमुळं मेलाय, ज्याचा वापर विनयच्या कम्प्युटर चिप्स बनवणाऱ्या मायक्रोटेक कंपनीत होत होता. विनयने तुझ्या गैरसमजाला पोषण देऊन माझ्या विरुद्ध तुला युज केलंय आणि हेच सत्य आहे! मी डिपार्टमेंटमधून पाय उतार झालो होतो, म्हणून त्याला माझा बदला घ्यायची काही घाई नव्हती. शिवाय त्याला आपला व्यवसाय पुन्हा उभा करायचा होता! म्हणून त्याने वाट पाहिली; तू तयार होण्याची! ही युज्ड् यु एज ए वेपेन अंगेंस्ट मी! अँड दट्स द ट्रूथ!" अवस्युने सत्य कथन केलं.

"खोटं! खोटं!!!" असह्य होत सुमेध ओरडला.

"मी तुझ्या वडिलांना मारलं असं तुला वाटतं म्हणून तू मला मारू इच्छितोस! पण तुला कोण शिक्षा देणार? तू पण तर माझ्या वरचा राग बाकीच्या अनेक निष्पाप लोकांवर काढलास! तू मला राक्षस समजतोस! पण तू कोण आहेस? जस्टीस की अनजस्ट?" सुमेध जिकता उद्विग्न होत जातं होता तितकाच अवस्यु शांत होत जातं होता...

"बास!" सुमेध सहन न होऊन जोरात रागाने ओरडला.

अवस्युने त्याच्या बुलेट प्रूफ व्हेस्टमध्ये ठेवलेले प्रिंटेड कागद काढून अवस्यु समोर टाकले. तो पुढे म्हणाले,

"यात पोलिसांनी त्यावेळी तयार केलेला सगळा रिपोर्ट आहे. चेक कर. माहीत नाही कसं, पण हे सगळं विनयच्या फॅक्टरीच्या कम्प्युटरवर सेव्ह होतं!"

अवस्युने सोबत आणलेली हार्डडिस्क देखील त्याच्या समोर टाकली.

"अजून पुरावे हवे असतील, तर ते या हार्डडिस्कमध्ये आहेत! आणि अजून तुला मी खोटाच वाटत असेन, तर ती रिव्हॉल्व्हर! एकदा गोळी चालवली आहेस, पुन्हा चालवायला संकोच करू नको!" अवस्यु त्याला म्हणाला.

सुमेधने पटकन रिव्हॉल्व्हर उचलली व अवस्युवर रोखली. पण... काही तरी विचार करून त्याने ती अवस्युला परत केली. अवस्यु उठून दरवाज्याकडे चालू लागला. आणि अकस्मितपणे सुमेधने त्याच्याकडील लपवलेली गन बाहेर खेचली. त्याने पाठमोऱ्या अवस्युवर नेम धरला.

अवस्युला सुमेधची हालचाल जाणवली. मागे न वळता तो सुमेधला म्हणाला,

"तूला तुझं आयुष्य योग्य मार्गाने जगता यावं यासाठी मी तुला त्यावेळी मारलं नाही! मी तसं केलं असतं, तरी मला कोणी शिक्षा दिली नसती! स्वतःच्या रक्षणासाठी मी तुला मारलं असल्यानं मी मुक्तच राहिलो असतो. पण मी तसं केलं नाही. मी तुला जीवदान दिलं. कारण

तू अजून हे जग नीट पाहिलं देखील नव्हतंस आणि तुझ्या जगण्याचा अधिकार मला तुझ्यापासून हिरावून घ्यायचा नव्हता. गुन्हेगारी पासून तू दूर राहावंसं असं मला मनापासून वाटत होतं. तू एक सूंदर आयुष्य जगावं अशी माझी इच्छा होती, पण तू चुकीच्या मार्गाला गेलास! आशा आहे, आत्ता तरी तू योग्य निर्णय घेशील!

अवस्युच्या बोलण्याने सुमेध अंतर्मुख झाला. अवस्युवर रोखलेली पिस्टल तशीच उंचावलेली राहिली, पण त्यातून गोळी काही सुटली नाही. अवस्युने मग बेल्टला असलेला ग्रेनेड हातात घेतला व त्याच्या पिनमध्ये बोट खोचून तो बाहेर चालून गेला...

अवस्यु विनयचे घर सोडत असताना गार्ड्स अवस्युवर गन्स रोखूनच होते, पण अवस्युच्या हातात ग्रेनेड असल्याने कोणी गोळी चालवण्याची हिंमत केली नाही. सगळे मागे सरकू लागले व गोळी चालवण्याच्या पवित्र्यात संधीची वाट पाहू लागले. पण अवस्यु सुखरूप बाहेर निघून गेला.

अवस्यु त्याच्या गाडीकडे आला. अवस्यु मागून ते गार्ड्स देखील बाहेर आलेले होते, पण कम्पाऊंडच्या बाहेर कोणी आलं नाही. बाहेर असलेले गार्ड्स देखील अवस्युवर नेम धरून मागे होत गेट मधून आत गेलं. कारण, अवस्युच्या हातातील ग्रेनेड. अवस्युने पिन ओढून रिलीज केली व ग्रेनेड घरात फेकून दिला. सगळ्या गार्ड्सनी घाबरून त्या दिशेने पाहिलं. अवस्यु पटकन गाडीत बसला. ग्रेनेड आत पडला व एक्सप्लोड झाला. त्या स्फोटाने गार्ड्स देखील बाजूला उडून पडले. अवस्युच्या गाडी देखील ग्रेनेडच्या फोर्सने एका साईडला कळली व पुन्हा पूर्वपदावर आली. अवस्युने पडलेल्या घराकडे पाहत जोश्वाला कॉल केला.

"जोश्वा, मला जे करायचं होतं, ते केलं. नाऊ क्लीन अप द मेस!" तो जोश्वाला म्हणाला.

"तू आता कुठं जाणार आहेस?" जोश्वाने त्याला काळजीने विचारलं.

पण अवस्युने त्याला उत्तर न देताच फोन कट केला  व ड्राइव्ह करून निघून गेला. पण जायचं कुठं हे त्याचंच अजून ठरलं नव्हतं...

आत सुमेध आपली गन घेऊन सर्व्हीलीयन्स रूमकडे चालला. त्याच्या दुसऱ्या हाती अवस्युने दिलेले कागद होते. त्याने दार उघडला.

सुमेध विनयकडे चालू लागळा. विनय खुर्चीत बसला होता.

"सगळं मुसळ केरात!" विनय सुमेधला गन घेऊन आपल्याकडे येताना पाहून सुमेधला चिडवत म्हणाला.

अवस्यु व सुमेधच्या संवादाचे व्हिडिओ क्लिप्स विनयच्या सर्व स्क्रिन्सवर सुमेधला दिसतात. सुमेध थोडा गोंधळून काही काळ त्या स्क्रिन्सकडे पाहू लागला. त्याच्यावर पाळत ठेवली जात होती, हे त्याच्यासाठी धक्कादायक होतं. पण काहीकाळच! सुमेधने स्वतःला सावरलं व गन विनयवर एम केली.

"मला तेव्हाच संशय यायला हवा होता जेव्हा हाराची केस रजिस्टर झाली नाही हे मी न सांगून तुला माहीत झालं होतं... पण माझा तुझ्यावर विश्वास होता! तू फसवलंस मला!" सुमेध विनयला म्हणाला.

"अवस्युला मारणं ही तुझी चॉईस होती, मी फक्त मदत केली!" वियनने सुमेधचा आरोप धुडकवला.

"तुझ्या फायद्यासाठी!" सुमेध रागाने म्हणाला.

"आपल्या!" विनय शांतपणे म्हणाला.

"अवस्युनं मला राक्षस बनवलं नाही! तो तू आहेस!" सुमेध चिडून ओरडला.

"हे तुझ्या परसेप्शनवर आहे. तू या सगळ्याकडं कसं बघतोयस यावर सत्य अवलंबून आहे! ज्याने तुला राक्षस बनवलं, तो तू स्वतः आहेस!" विनय थंडच होता.

सुमेधने चिडून अवस्युने दिलेले कागद विनय समोर टेबलवर टाकले.

"हा डेटा तुझ्याकडे कसा आला?" सुमेधने विनयला जाब विचारला.

"या जगात तू एकटाच नाहीस जो हॅकर आहे! तुझ्या प्रोग्रॅम फिल्टर केला जात होता. तुझी सिस्टीम तुला तीच माहिती पुरवत होतं, जी मला तुझ्यापर्यंत पोहोचवायची होती!" विनय पुढं होतो. मग्रुरीने स्मित करत म्हणाला.

"म्हणजे माझ्या वडिलांना तूच मारलंस!" सुमेध ओरडला.

"हं! दॅट वॉज अ मिअर सॅक्रिफाईज! अशा त्यागांवरच आज हे साम्राज्य उभं राहिलं आहे! विसरू नको, माझ्या भावाने सुद्धा त्याग केलाय!" विनय गुर्मीतच होता.

"ही चूक कुणाची होती?" सुमेधने पुन्हा आरोप केला.

"मला नाही वाटत ही चूक होती! अवस्यु मधे आला नसता, तर सगळं सुरळीत चाललं असतं! माझ्या भावानं जेलमधलं टॉर्चर असह्य होऊन आत्महत्या केली! याला जबाबदार कोण?

अवस्युच ना?! तुझ्या वडिलांच्या मृत्यूला पण तोच जबाबदार! विसरू नको आपला शत्रू एकच आहे आणि तू... तू त्याला जाऊ दिलास! पुन्हा!" विनयने उलट सुमेधवरच आरोप केला.

स‌ुमेधची मानसिक दृष्ट्या दिशाभूल करण्यासाठी विनयने खेळी खेळली.

"पण या सगळ्याची सुरवात तर तूच केलीस!" पण यावेळी सुमेध यात अडकणार नव्हता.

दहा वर्षांपूर्वीची एक घटना, विनयची पहिली भेट सुमेधला आठवली. जेव्हा तो जगदीश म्हणून आपल्या वडिलांसोबत किशोर सोबत रहात होता...

किशोर एका कट्ट्यावर उदास बसला होता. काय करावं याची चिंता त्याच्या चेहऱ्यावर दिसते होती. जगदीश त्याच्यापाशी आला.

"पप्पा! जेवून घ्या. चला..." जगदीश किशोरला म्हणाला.

"भूक नाही. जा!" किशोर त्याच्याकडे न बघताच त्याला बोलला.

"पप्पा..." जगदीश त्याला समजावण्याच्या सुरात उद्गारला.

किशोरला उठवण्यासाठी जगदीशने किशोरचा हात धरला. किशोरने रागाने त्याचा हात झटकला! आणि त्याला ढकललं.

"निघ इथून!" किशोर ओरडला.

जगदीश न जाता तिथंच उभा राहिला. किशोरच्या लक्षात आलं, की आपण चूक केली आहे. त्याने जगदीशला घट्ट मिठी मारली. जगदीशने त्याची सांत्वना करण्यासाठी त्याला थोपटलं. त्याचवेळी विनयची गाडी आली. विनय गाडीतून उतरला. किशोर व जगदीश बाजूला

झाले. विनय त्यांच्यापाशी आला. विनयच्या चेहऱ्यावर मित्राला खूप दिवसांनी भेटल्याचं हसू होतं.

"किशोर; मित्रा!" म्हणत विनयने किशोरला मिठी मारली. काही काळ तसाच राहून मग तो बाजूला झाला.

"तुझ्या कंडिशनबद्दल समजलं. म्हणून तुला भेटायला आलो. चार महिने नोकरी नाही. दोन महिन्याचा पगार तटलाय. माहितेय मला." विनय पुढं म्हणाला.

"होय..." खजीलपणे किशोर म्हणाला.

"तुझा पगार तुला मिळेल. तुझ्या फॅक्टरीचा मालक माझ्या ओळखीचा आहे." विनयने किशोरला आश्वस्त केलं.

"खरंच असं होईल?" आशाळभूत डोळ्यांनी किशोरने विनयला विचारलं.

"होय. पण मी तुझ्याकडं वेगळ्या कामासाठी आलोय. माझाही चालू बिझनेस लॉसमध्ये आ.हे म्हणून मी नवीन बिझनेस चालू करतोय! खूप प्रॉफिट आहे. मी तुला त्या कंपनीत हायर करतोय. तुझ्या केमिकल इंजियरिंगचा त्यात खूप उपयोग होणार आहे!" किशोर त्याला आश्वस्त करत आणि नवीन आशा देत म्हणाला.

"काम काय आहे?" किशोरने तातडीने विचारलं.

"वि आर गोइंग टू रुल द वर्ल्ड!" विनय हासत म्हणाला.

किशोरला काही समजलं नाही. तो गोंधळून विण्यकडे पाहत राहिला.

"नाऊ ऑन, वि आर सेलिंग दि हेट्रेड!"

"म्हणजे?" किशोरला अजूनही त्याचं बोलणं गोंधळात पाडणारं ठरलं होतं.

"बॉम्ब्स्!" विनय हसत म्हणाला.

किशोरच्या चेहऱ्यावरील प्रश्न गडद झाल्याचं जाणवून विनयने त्याच्या खांद्यावर हात ठेवला.

"किशोर, या जगात माणूसच माणसाचा सर्वांत मोठा शत्रू आहे. आणि म्हणूनच ही सर्वांत मोठी बिझनेस अपॉर्च्युनीटी आहे. मागणी मोठी आहे, पुरवठा आपण करायचाय! आपण फक्त भारत जरी कॅप्चर केला, तरी आपण बिलीयन्समध्ये खेळू!" किशोरचा गोंधळ मिटवण्यासाठी विनय स्पष्ट बोलला.

"मी हे नाही करू शकत!" विनयने घाबरून झटक्यात आपला निर्णय सुनावला.

"इट्स अ बिग अपॉर्च्युनीटी! टेक इट ऑर लिव्ह इट! बट रिमेंबर, वि नीलिमा अप ऑफ आवर डिसीजन्स! आपलं आयुष्य बनवण्याची शक्ती ही फक्त आपल्यात असते. तूझा मुलगा मेहनती आहे, पण माझी खात्री आहे या वयात तो जे काही तुरळक का होईना कमवून आणतोय, त्यावर जगणं हे तुला लाजिरवाणं वाटतंय!" विनय म्हणाला.

"नाही?!" आणि कुटील स्मित करून त्यानं विचारलं.

विनयचं हे शेवटचं वाक्य किशोरच्या जिव्हारी लागलं!

"ओके!" किशोरनं मग विचारही न करता मान्य केलं.

"पप्पा, तुम्हाला हे करण्याची गरज नाही!" जगडीशने किशोरला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला.

पण तो बधल ा नाही.

"माझा निर्णय झालाय!" किशोर ठामपणे ओरडला.

आपण यशस्वी झालोय हे लक्षात येऊन पुन्हा विनयच्या ओठांवर कुटील स्मित तरळलं...

"माझ्यासोबत येण्याचा निर्णय तुझ्या वडिलांचा होता. यात माझी चूक कशी?" विनयने सुमेधला उद्धट प्रश्न केला.

"पण पॉयजन तर तूच दिलंस ना? पोलीस रिपोर्टनुसार पप्पांच्या दातात जे पॉयजन होतं, ते तुझ्या भावाच्या हातात असलेल्या अंगठीच्या ट्रिगरने रिलीज झालंय. मला खात्री आहे, तुझ्या भावाने जेव्हा सगळं त्याच्यावर घेतलं असेल, त्यावेळी तू यात अडकू नयेस म्हणून ती अंगठी देखील तुझ्याकडून घेऊन त्यावरील तुझे फिंगरप्रिंट्स मिटवले असतील! मला माहित आहे अवस्युने तुला पकडलं त्यावेळी ती तुझ्या बोटात होती! अशीच अंगठी तू पप्पांना पण दिली होतीस अवस्युने पकडलेल्या तुझ्या पार्टनर्सना मारण्यासाठी! पप्पांनी तोंड उघडू नये म्हणून तूच त्यांना मारलंस ना?" सुमेध ओरडून बोलला.

सुमेधच्या वाक्याने विनय देखील थोडा खिन्न होऊन काही काळ  भूतकाळात गेला...

त्याला दिसू लागला तो गडद अंधार. जरासा पुसटसा उजेड कोठडीत डोकावत होता. तनयने विनयच्या बोटातली अंगठी काढून घेतली व ती आपल्या शर्टला काठाला व्यवस्थित पुसून आपल्या बोटात सरकवली. या दरम्यान विनयच्या डोळ्यांत पाणी डबडबलं होते...

"सो यु फिगर्ड् इट आऊट..." कोऱ्या चेहऱ्याने पण चेहऱ्यावर स्मित घेऊन विनय भूतकाळाच्या त्या अंधाऱ्या कोठडीतून बाहेर येत सुमेधला म्हणाला.

आणि आणखी एका आठवणीत शिरला. ती त्याची आणि किशोरची शेवटची भेट होती...

विनय, तनय व किशोर राज फर्टिलायझर्समध्ये तनयच्या केबिनमध्ये बसले होते. त्यांच्यात गंभीर चर्चा चालू होती. अवस्यु व त्याच्या टीमपासून यांचं नवनिर्वाचित उभं राहतं असलेलं साम्राज्य कसं वाचवायचा याच्यावर ते उवापोह करत होते. इतक्यात किशोरच्या हाती असलेल्या मोबाईलची लाईट लागली. जगदीशने किशोरला केलेला कॉल होता तो. नंदूला पोलिसांनी पकडलंय हे समजल्यावरच किशोरला मोबाईल बंद ठेवण्याची ताकीद केलेली असून देखील किशोरचा मोबाईल चालू आहे हे लक्षात येऊन विनयने  कुटील स्मित केलं. किशोरने डबल क्रॉस केलंय हे विनयच्या लक्षात आलं होतं.

"हं! माझ्या ऑफिसमध्येच किशोरला संपवणार होतो. पण मग विचार केला, का नाही याचा गेम यांच्यावरच उलटवाव? म्हणून मी पोलीस येण्याची वाट बघितली. आणि मर्सिनरीज करवी त्यांच्यावर हल्ला चढवला!" वर्तमानात परतत विनय सुमेधला सूडाच्या भाषेत बोलला.

आणि ते दहा वर्षांपूर्वीचं चित्र विनयच्या डोळ्यांसमोर पुन्हा जिवंत झालं...

एका लेनमध्ये दूरवरून गाडीतून विनय व तनय अवस्यु व त्याच्या टीमला त्यांनी पाठवलेल्या मर्सिनरीजशी लढताना पाहत होते. तनय ड्रायव्हिंग सीटवर. विनय बाजूला. किशोरला जोश्वा व दोन ऑफिसर्स प्रोटेक्ट करत होते. परिस्थिती हाताबाहेर जात आहे, किशोर जोश्वाला अनावधानाने गोळी घालणार आहे हे लक्षात येऊन अवस्युने किशोरवर गोळी चालवली होती. पण त्याला ठार करण्याऐवजी अवस्युने त्याला फक्त जखमी केलंय हे लक्षात येऊन किशोरला जीवे मारण्यासाठी त्याचक्षणी किशोरच्या डेन्चर्समधील पोलोनियम रिलीज

करण्यासाठी विनयने त्याच्या बोटातल्या रेडिओ फ्रिक्वेन्सी प्रसारित करणाऱ्या अंगठीवरील स्विच प्रेस केला. आणि पुढं काय होतंय ते तो व तनय पाहत थांबले काहीवेळ... किशोर मृत झालेला, जगदीशने अवस्युवर गोळी चालवलेली व त्यावरील जोश्वाची प्रतिक्रिया हेअगळ त्यांनी पाहिलं आणि मग आता थांबणं धोक्याचं आहे हे लक्षात घेऊन तनयने गाडी सुरू केली.

"यात त्यांच्याकडून पोलिसांसोबत किशोर देखील मारला जाईल. आणि तसं झालं नाहीच, तरी किशोर मुख्य आरोपी होईल असा माझा प्लॅन होता!" विनय सुमेधला ते करण्यामागील कोऱ्या चेहऱ्याने प्लॅनिंग एक्सल्पेन करत होता...

"पण अवस्यु आणि त्याच्या टीमने पुन्हा माझा खेळ उधळवून लावला! किशोर त्यांच्या हाताला लागला होता आणि माझी सगळी इन्फॉर्मेशन आता त्यांना मिळणार होती! म्हणून मग मी त्याच्या तोंडातलं पोईसन रिलीज करून किशोरला मारून टाकलं!" विनय चिडून बोलला आणि स्मित करत पुढं म्हणाला,

"तू खरंच हुशार आहेस! म्हणूनच मी म्हणतो, तुझ्यात केलेली इन्व्हर्नमेंट वाया गेली नाही! पण माझ्या तुझ्याबद्दलच्या अपेक्षा तू वाया घालवलास!"

"गप्प बस! गप्प बस!!!" विनयचं बोलणं असह्य होऊन सुमेध ओरडला.

"यु आर क्लेव्हर, येट स्टुपिड!" न थांबता विनयने सुमेधचा उपहास चालूच ठेवला.

सुमेधची कुचेष्टा करणारं स्मित करत तो पुढं म्हणाला,

"कोणीही तुला मॅनिप्युलेट करू शकतो! तुझा बाप पण असाच होता! इडियट्स्!" आणि तो कुत्सित हसला.

हे सगळं अगदीच असह्य झाल्याने जोरात ओरडून सुमेधने विनयवर गोळी चालवली. छातीत उजव्या बाजूला गोळी लागूनही विनयने अजूनही त्याच्या ओठांवरच स्मित हरवलेलं नव्हतं. विजेच्या गतीने त्याने एक चौकोनी बॉक्स ज्याला वर रुपया एवढा लाल एलईडी बल्ब होता, तो सुमेधच्या छातीत घुसवला. त्या बॉक्सने सुमेधच्या छातीत आपली पकड मजबूत केली. सुमेधचं रक्त वाहू लागलं.

सुमेध विनयला खुर्चीतून खेचून पिलरवर भरकावून दिलं. विनय जमीन8वर आदळला, पण नंतर सावरून पिलरला टेकून बसला. त्याला वेदनेने उभारवत नव्हतं. सुमेध त्याच्याकडे लंगडत चालत आला. त्याने विनयच्या डोक्यावर गन ताणली. तेव्हाच अचानक सुमेधच्या छातीवर असलेल्या बॉक्सवरील बल्बची लाईट ब्लिंक होऊ लागली आणि हे इंडिकेशन लक्षात येऊन खाली जमिनीवर निष्क्रिय व शक्तीहीन पडलेल्या विनयच्या ओठांवर पुन्हा कुटील स्मित तरळलं. टाईमिंग पूर्ण झाल्याने सुमेधच्या छातीवर असलेला बॉम्ब एक्टिव्हेट झालेला होता. विनयने कष्टाने मान वर करून सुमेधकडे पाहलं व विजयी क्रूर स्मित केलं. सुमेध समजला विनयने काय केलंय...

## १०. साक्षात्कार आणि निर्वाण...

सुमेधने अतीव रागाने विनयच्या डोक्यात गोळी घालून त्याला ठार केलं! निराश सुमेध मागे वळला.  चालत बाहेर सर्व्हीलीयन्स रूम बाहेर गेला. त्यानंतर फक्त एक लाल उजेड पसरला व त्यासोबत रक्ताचे भले मोठे शिंतोडे व मांसाचे तुकडे विखुरलेले बाहेरच्या खोलीभर पसरले.

पहाट नवीन दिवसाच्या दारावर दत्तक देत होती. अवस्यु रंकाळ्याच्या शेजारी एका निर्जन ठिकाणी बसून होता. तो बसलेल्या बाकावर मोबाईल. त्यावर विदुषीचं मंद आवाजात गाणं सुरू होतं. आणि विदुषीची आठवण शेवटची काढत अवस्युने त्याची रिव्हॉल्व्हर हनुवटीवर ठेवली होती. रिव्हॉल्व्हरचा ट्रिगर दाबण्याची हिंमत गोळा करण्यासाठी अवस्युचे डोळे घट्ट मिटलेले होते. डोळ्यांतून पाणी ओघळलं होतं. ओघळत होतं. पापण्या पाण्याने ओथंबल्या होत्या. त्याचं बोट ट्रिगरवरील दाब वाढवत होतं! इतक्यात...

"हार मानलीत?" विदुषीने मूर्त रूप घेत गोड हसत अवस्युला पृच्छा केली.

विदुषीचा आवाज ऐकून अवस्युने रिव्हॉल्व्हर चालू केली.

"नाही... पण जगण्यासारखं आता काही राहिलं नाही..." अवस्यु विदुषीकडे पाहत म्हणाला.

"असं का?" विदुषीने त्याला विचारलं.

"तूच तर माझ्या जगण्याची प्रेरणा होतीस, तूच नाहीस तर आता जगऊन काय करू? मी तुझ्या खुनाचा बदला घ्यायचा या विचारानं पेटून उठलो. पण बाळा, हे फक्त तुझ्यासाठी कधीच नव्हतं. हे होतं समाजासाठी! इथं लॉ अँड ओर्डर प्रस्थापित करण्यासाठी मी हे केलं. या बॉम्स, या वेपन्सचा उपयोग आपल्या देशात गृहकलह, अंतरकलह वाढवण्यासाठी केला जात होता. द्वेष विकून पैसा कमावला जात होता, पण यात आपलाच देशबांधव मरतोय हे कोणी लक्षात घेत नव्हतं! पुरावे समोर होते आणि हे कोण करतंय हे माहीत असून मी गप्प बसणं मला योग्य वाटलं नाही! त्यांना संपवायचं ठरवलं. आणि म्हणूनच काही वेळ मी माझी तत्त्व बाजूला सारली! संपूर्ण विध्वंसानंतरच नवनिर्मिती होते हा नियम आहे!" अवस्यु खिन्न होत विदुषीला म्हणाला.

"पण मग आता तुमच्या तत्त्वांचं काय?" विदुषीने त्याला विचारलं.

"अजूनही मी त्यावर ठाम आहे! अजूनही मी संविधानावर आणि न्याय व्यवस्थेवर विश्वास ठेवून आहे! अजूनही माझा कायद्यावर विश्वास आहे!" अवस्युने त्याची भूमिका स्पष्ट केली.

आणि सुमेधला आणि विनयला न मारून तुम्ही त्याची प्रचिती दिलीत!" विदुषी स्मित करत म्हणाली.

"पण त्यांना शिक्षा होणं हे गरजेचं होतं! आणि ती त्यांनीच एकमेकांना दिली... माणूस आपल्या कर्माने मरतो म्हणतात ते असं! संविधानाचे पालन करत एकदा या लोकांना नव्याने आयुष्य सुरू करायची संधी मी दिली होती! पण त्यांनी न सुधारता पुन्हा तीच चूक... नव्हे, गुन्हा केला. आणि यावेळी जर मी यांना सोडलं असतं, तर तो माझा मूर्खपणा ठरला असता! यात सामान्य आणि निर्दोष लोकांना इजा होऊ नये म्हणून मी पूरेपुर काळजी घेतली आहे आणि संपवलं त्याच लोकांना, ज्यांचा गुन्हेगार असल्याचा सबळ पुरावा माझ्याकडे होता. हा... त्यांना शिक्षा करण्याचा मला अधिकार नाही. त्या गोष्टीची मी पायमल्ली केली, पण त्यावेळी तेच मला योग्य वाटलं. कारण माझ्याच चुकीमुळे ज्याची सुरवात झाली, त्याचा शेवट मलाच करायचा होता! यात मी वाहत जाण्याची शक्यता होती, म्हणून माझ्यावर अंकुश ठेवायला तू मला सोबत

हवी होतीस. शिवाय माझी हिंमत कायम रहावी म्हणून मी तुला माझ्या विचारांत जिवंत ठेवलं... तुझ्या गाण्यांनी मला त्यासाठी मदत केली. समाज विघातक लोकांना मी मारलंय. मी या समाजाचाच एक भाग आहे. या नियमानं या लोकांना मारून मी स्वतःचं रक्षण केलंय! आणि स्वतःचं रक्षण करणं हा काही गुन्हा नाही! याच विचारानं मी काही काळ मी तत्त्वांशी तडजोड केली... पण यासाठी मला स्वतःला सावरायला लागणार होतं. म्हणून मी तुला क्रिएट केलं; माझ्या डोक्यात! पण... पण वास्तविक जगणं हा प्रत्येकाचा मूलभूत अधिकार आहे, आणि आपण त्याचं उल्लंघन नाही करू शकतं... जे मी केलं... शिक्षा देण्याचं काम आपलं नाही. पोलीस म्हणून देखील मला तो अधिकार कधीच नव्हता! म्हणून तर मी त्या क्षेत्रात असून कधी कोणाला जीवे मारलं नाही! गुन्हेगाराला शिक्षा देण्याचं काम न्यायप्रक्रियेचं आहे आणि आपल्या त्यावर विश्वास ठेवायलाच हवा! थँक्स टू यू! तू मला शेवटच्या क्षणी त्याची आठवण करून दिलीस! मला जे करायचं होतं ते मी केलं... आता हे संपवायची वेळ आली आहे...! अवस्यु ठाम निर्धाराने म्हणाला.

त्याने पुन्हा हनुवटीवर रिव्हॉल्व्हर ठेवली.

"आपल्याला कोणाचा जीव घेण्याचा अधिकार नाही! तर आपण स्वतःचा जीव कसा घेऊ शकतो बाबा? तोही गुन्हाच! नाही का?! तुम्ही जगावं; निदान तुमच्या विदुषीसाठी तरी...!" विदुषी चेहऱ्यावरील स्मित न लोपवता अवस्युला म्हणाली.

आणि ही अवस्युच्या उत्कट भावनांनी मूर्त रूप घेतलेली विदुषी अदृश्य झाली, बहुदा कायमचीच...!

"कारण ती सतत तुमच्या सोबत आहे, तुमच्या हृदयात..." विदुषी गोड हसत अवस्युला म्हणाली.

अवस्युच्या चेहऱ्यावर निर्मळ आणि मनमोकळं स्मित उमटलं. त्याने रिव्हॉल्व्हर खाली घेतली. तो पाण्याकडे चालत गेला. ती रिव्हॉल्व्हर त्याने उभ्यानेच पाण्यात अर्पण केली. आणि तो तिथंच उभा राहतो, उगवत्या दिवसाची साक्ष घेत...

**समाप्त!!!**

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं. सुरज गाताडे यांचं ई साहित्यवरचं हे दहावं पुस्तक.**

सत्तावीस महिन्यांत नऊ पुस्तकं. प्रत्येक पुस्तक वेगळं. प्रत्येक पुस्तकाचा वेगळा विषय, वेगळा बाज, वेगळी मांडणी. प्रत्येक पुस्तक सुपरहिट. आता तर त्यांचा स्वतःचा असा एक फॅन ग्रुप हजारांच्या घरात गेलेला आहे. पंधरा मे २०१७ ला जेव्हा त्यांनी आपलं पहिलं पुस्तक प्रकाशनासाठी पाठवलं तेव्हा "प्लीज किमान एकदा वाचून घ्या!!!" अशी विनंती केलेली होती. लेखक प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांची पुस्तकं विकली जात नाहीत. त्यामुळे त्यांना प्रकाशक त्यांची पुस्तकं छापत नाहीत. कधीकधी तर न वाचताच परत करतात. आणि प्रकाशन झालेच नाही तर हे नवीन लेखक प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात अनेक प्रतिभा गर्भातच मारल्या जातात. अगदी "मृत्युंजय"कार शिवाजी सावंतांचं पुस्तक तीन वर्षं कोणी प्रकाशक वाचूनही पहात नव्हता. तेव्हा सूरज यांची ही विनंती साहजिक होती. त्यांना या दुष्टचक्रातून बाहेर पडायचं होतं. अशा लेखकांना बळ देण्यासाठी आपण सर्व वाचक आणि ई साहित्यची संपूर्ण टीम आता कटीबद्ध आहे. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य.

ई साहित्य प्रतिष्ठान

लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत. नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे. वाचकांनी त्यांना मनात स्थान द्यावे. त्यांच्या सादेला प्रतिसाद द्यावी.

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात.

प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ वागळे असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे, आत्मविश्वासाने भारलेले तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

## बस्स. अजून काय पाहिजे?

www.esahity.com
esahity@gmail.com